सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, २७ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २१४ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अखेर भाजपाची दुसरी यादी जाहीर, धुळ्यापासून जतपर्यंत २२ उमेदवाराची घोषणा, मुंबईचा सस्पेन्स कायम

मुंबई : पहिल्या यादीत ९९ उमेदवारांच्या नावाची घोषणा केल्यानंतर भाजपाने आज दुसरी यादी जाहीर केली आहे. २० ऑक्टोबरला भाजपाने आपली पहिली यादी जाहीर केली होती. यानंतर ६ दिवसांनी भाजपाने दुसरी यादी जाहीर केली असून,यात २२ जणांना स्थान देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे यामध्ये मुंबईतील वर्सोवा, घाटकोपर पूर्व यांचा समावेश करण्यात आला असून सस्पेन्स कायम ठेवण्यात आला आहे. दरम्यान जतमधून गोपीचंद पडळकर यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**भाजपाच्या दुसऱ्या यादीतील २२ नावे** – धुळे ग्रामीण – राम भदाणे, मलकापूर – चैनसुख मदनलाल संचेती, अकोट – प्रकाश गुणवंतराव भारसाकले, अकोला पश्चिम – विजय अग्रवाल, वाशिम (अजा) – श्याम रामचरणी खोडे, मेळघाट (अजजा) – केवलराम काले, गडचिरोली – मिलिंद नरोटे, राजुरा – देवराव भोंगले, ब्रह्मपुरी – कृष्णलाल सहारे, वरोरा – करण देवतले, नाशिक मध्य – देवयानी फरांदे, विक्रमगढ (अजजा) – हरिश्चंद्र भोये, उल्हासनगर – कुमार आयलानी, पेण – रवींद्र पाटील, खडकवासला – भिमराव तापकीर, पुणे छावनी (अजा) – सुनील कांबळे,

कसबा पेठ – हेमंत रासने, लातूर ग्रामीण – रमेश कराड, सोलापूर शहर मध्य – देवेंद्र कोठे, पंढरपूर – समाधाना आवताडे, शिराळा – सत्यजीत देशमुख, जत – गोपीचंद पडळकर, पहिल्या यादीतील ९९ नावं नागपूर पश्चिम – देवेंद्र फडणवीस, कामठी –चंद्रशेखर बावनकुळे, शहादा – राजेश पाडवी, नंदूरबार– विजयकुमार गावीत, धुळे शहर –अनुप अग्रवाल, सिंदखेडा – जयकुमार रावल, शिरपूर – काशीराम पावरा, रावेर – अमोल जावले, भुसावळ – संजय सावकारे , जळगाव शहर – सुरेश भोळे , चाळीसगाव – मंगेश चव्हाण, जामनेर –गिरीश महाजन , चिखली –श्वेता महाले , खामगाव – आकाश फुंडकर, जळगाव (जामोद) – संजय कुटे, अकोला पूर्व – रणधीर सावरकर, धामगाव रेल्वे – प्रताप अडसद, अचलपूर – प्रवीण तायडे, देवली – राजेश बकाने, हिंगणघाट – समीर कुणावार, वर्धा – पंकज भोयर, हिंगना – समीर मेघे,

नागपूर दक्षिण – मोहन माते, नागपूर पूर्व – कृष्ण खोपडे,तिरोरा – विजय रहांगडाले , गोंदिया – विनोद अग्रवाल, अमगांव – संजय पुरम, आर्मोली – कृष्णा गजबे , बल्लारपूर – सुधीर मुनगंटीवार , चिमूर – बंटी भांगडिया , वाणी – संजीवरेड्डी बोडकुरवार , रालेगाव – अशोक उडके ,

यवतमाळ – मदन येरवर , किनवट – भीमराव केरम, भोकर – क्षीजया चव्हाण, नायगाव – राजेश पवार, मुखेड – तुषार राठोड, हिंगोली – तानाजी मुटकुले, जिंतूर – मेघना बोर्डीकर, परतूर – बबनराव लोणीकर, बदनापूर –नारायण कुचे, भोकरदन –संतोष दानवे, फुलंब्री – अनुराधा चव्हाण, औरंगाबाद पूर्व – अतुल सावे, गंगापूर – प्रशांत बंब, बगलान – दिलीप बोरसे, चंदवड – राहुल अहेर,नाशिक पुर्व – राहुल ढिकाले, नाशिक पश्चिम – सीमाताई हिरे, नालासोपारा – राजन नाईक, भिवंडी पश्चिम – महेश चौघुले,मुरबाड – किसन कथोरे, कल्याम पूर्व – सुलभा गायकवाड, डोंबिवली – रवींद्र चव्हाण, ठाणे – संजय केळकर, ऐरोली – गणेश नाईक,बेलापूर – मंदा म्हात्रे, दहिसर – मनीषा चौधरी, मुलुंड – मिहिर कोटेचा, कांदिवली पूर्व – अतुल भातखलकर, चारकोप – योगेश सागर, मालाड पश्चिम – विनोद शेलार,गोरेगाव – विद्या ठाकूर, अंधेरी पश्चिम – अमित साटम, विले पार्ले – पराग अलवणी, घाटकोपर पश्चिम – राम कदम, वांद्रे पश्चिम – आशिष शेलार,सायन कोलीवाडा– तमिल सेल्वन, वडाळा – कालिदास कोळंबकर, मलबार हिल – मंगलप्रभात लोढा, कुलाबा – राहुल नार्वेकर, पनवेल – प्रशांत ठाकूर, उरन – महेश बाल्दी, दौंड– राहुल कुल, चिंचवड – शंकर जगताप, भोसली –महेश लांडगे, शिवाजीनगर – सिद्धार्थ शिरोले, कोथरुड – चंद्रकांत पाटील, पर्वती – माधुरी मिसाळ, शिर्डी – राधाकृष्ण विखे पाटील, शेवगाव – मोनिका राजले, राहुरी शिवाजीराव कर्डिले, श्रीगोंदा – प्रतिभा पाचपुते, कर्जत जामखेड – राम शिंदे, केज – नमिता मुंदडा, निलंगा– संभाजी पाटील निलंगेकर, औसा – अभिमन्यू पवार, तुळजापूर – राणा जगजितसिंह पाटील, सोलापूर शहर उत्तर – विजयकुमार देशमुख,अक्कलकोट – सचिन कल्याणशेट्टी, सोलापूर दक्षिण – सुभाष देशमुख, मान –जयकुमार गोरे, कराड दक्षिण – अतुल भोसले, सातारा – शिवेंद्रराजे भोसले, कणकवली – नितेश राणे, कोल्हापूर दक्षिण – अमल महाडिक, इचलकरंजी – राहुल आवाडे, मिरज – सुरेश खाडे, सांगली – सुधीर गाडगीळ.

## जागा वाटपावर राहुल गांधींना प्रचंड राग!
### CECच्या बैठकीतून घेतला काढता पाय



नवी दिल्ली : विधानसभेचा रणसंग्राम सुरु झाला असून राज्यात पुन्हा सरकार स्थापन करण्यासाठी सर्व प्रमुख नेते जोर लावताना दिसत आहेत. सर्व राजकीय पक्षांच्या जागावाटप जाहीर होत आहेत. मात्र मविआच्या जागावाटपाबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नाराजीचा सूर मारला आहे.

मविआच्या जागावाटपाबाबत दिल्लीमध्ये काल झालेल्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत अनेक उमेदवारांच्या नावांवर चर्चा झाली. यामध्ये विदर्भ, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जागा उबाठा गटाला दिल्यामुळे राहुल गांधींना प्रचंड राग आला. 'काँग्रेसच्या नेत्यांनी योग्यपद्धतीने वाटाघाटी केल्या नाहीत', अशा शब्दांत राहुल गांधींनी मत व्यक्त करुन त्यांनी सुरु बैठकीतून काढता पाय घेतला.

दरम्यान, राहुल गांधी बैठकीतून गेल्यानंतरही पुढे तासभर मीटिंग सुरू होती. मुंबई व विदर्भामधील काही जागा शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या आग्रहामुळे काँग्रेसला सोडून द्याव्या लागल्या. महाराष्ट्रातील काही उमेदवारांच्या नावांवर राहुल गांधी यांनी आक्षेप व्यक्त केला.

## सिल्लोड विधानसभा मतदार संघ निवडणूक प्रशिक्षण

सिल्लोड : १०४–सिल्लोड विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने निवडणूक तयारीनिमित्त सिल्लोड विधानसभा क्षेत्रातील सर्व

मतदान केंद्राध्यक्ष मतदान अधिकारी यांचे निवडणूक प्रशिक्षण दि २७/१०/२०२४ रोजी सिल्लोड शहरातील जळगाव रोडवरील स्वामी विवेकानंद शाळेत ठेवण्यात आलेले आहे. हे प्रशिक्षण दोन सत्रामध्ये आयोजित केले जाणार आहे, प्रथम सत्र सकाळी ९ ते १ या वेळेत मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी क्रमांक एक यांचे प्रशिक्षण होणार आहेत तर द्वितीय सत्रात दुपारी २ ते ५ या वेळेत इतर सर्व अधिकारी यांचे प्रशिक्षण होणार आहे. प्रशिक्षणाला येतांना टपाली मतदानासाठी सिल्लोड विधानसभा मतदारसंघातील अधिकारी व कर्मचारी यांनी निवडणूक आदेशासोबत दिलेला(फॉर्म १२ व १२–) सोबत आणून प्रशिक्षण स्थळी जमा करणे आवश्यक आहे, त्याशिवाय आपणास उपस्थिती नोंदविता येणार नाही. या प्रशिक्षणा साठी सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्री लतिफ पठाण यांनी केले आहे.

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची दुसरी यादी जाहीर, २२ उमेदवारांच्या नावाची घोषणा

मुंबई : शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसेच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी दुसऱ्या यादीत २२ नावांची घोषणा केली आहे. दुसऱ्या यादीत उल्हासनगरमधून ओमी कलाणी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर माळशिरसमधून उत्तम जानकर, सिन्नरमधून उदय सांगळे, आरवीमधून मयुरी काळे, येवल्यातून माणिकराव शिंदे, दिंडोरीतून सुनीता चारोसकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ६७ नावांची नावं राष्ट्रवादीने जाहीर केली आहे. उमेदवारांची तिसरी यादी रविवारी जाहीर केली जाणार आहे.



**राष्ट्रवादी काँग्रेसची दुसरी यादी –** १. एरंडोल – सतीश अण्णा पाटील, २. गंगापूर – सतीश चव्हाण, ३. शहापूर – पांडुरंग बरोरा, ४. परांडा – राहुल मोटे, ५. बीड – संदीप क्षीरसागर, ६. आर्वी – मयुरा काळे, ७. बागलान – दीपिका चव्हाण, ८. येवला – माणिकराव शिंदे, ९. सिन्नर – उदय सांगळे, १०. दिंडोरी – सुनीता चारोस्कर, ११. नाशिक पूर्व – गणेश गीते, १२. उल्हासनगर – ओमी कलानी, १३. जुन्नर – सत्यशील शेरकर, १४. पिंपरी – सुलक्षणा शीलवंत, १५. खडकवासला – सचिन दोडके, १६. पर्वती – अश्विनीताई कदम, १७. अकोले – अमित भांगरे, १८. अहिल्या नगर शहर –अभिषेक कळमकर, १९. माळशिरस – उत्तमराव जानकर, २०. फलटण – दीपक चव्हाण, २१. चंदगड – नंदिनीताई भाबुळकर कुपेकर, २२. इचलकरंजी – मदन कारंडे,

**आप प्रचार करणार**

दरम्यान, आपकडून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा प्रचार केला जाणार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल मविआ उमेवारांच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात येणार आहेत. आप नेते संजय सिह यांनी ट्वीट करत ही माहिती दिली आहे.

## संजय राऊत यांच्या शिक्षेला न्यायालयाची स्थगिती; ५० हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२५ ऑक्टोबर:

मानहानीप्रकरणी दाखल दाव्यात १५ दिवसाच्या कोठडीची शिक्षा झालेल्या उध्दव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना मश्रझगाव जिल्हा सत्र न्यायालयाने शुक्रवारी दिलासा दिला. ५० हजाराच्या जात मुचलक्यवर जामीन मंजूर करत त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली.

यावेळी संजय राऊत हे आपले भाऊ सुनील राऊत यांच्यासह कोर्टात हजर होते. तर याचिकाकर्त्यां मेधा सोमय्या यांचे पती आणि भाजपाचे नेते किरीट सोमय्या हेही उपस्थित होते

मेधा सोमय्या चालवित असलेल्या एका संस्थेने मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालयांच्या बांधकाम आणि देखभालीच्या शंभर कोटींचा निधी मेधा सोमय्या गुंतल्याचा आरोप करणारे वृत्त १५ आणि १६ एप्रिल २०२२ ला'सामना'मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्या विरोधात मेधा सोमय्या यांनी राऊत यांच्या विरोधात मानाने चा दावा दाखल केला होता त्याबाबत न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी गेल्या महिन्यात राऊत यांना पंधरा दिवसाची कैदी व रोख दंड भरण्याची शिक्षा दिली होती. शिक्षेच्या विरोधात अपील करण्यासाठीं ३० दिवसाची मुदत दिली होती. त्यानुसार राऊत यांनी गुरुवार सत्र न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र काल सूनावणी न झाल्याने ती आज घेण्यात आली. कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यातर अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.पी. पिंगळे यांनी अपील दाखल करून घेत राऊत यांच्या शिक्षेला स्थगिती दिली. याप्रकरणाची पुढील सुनावणी ३१ जानेवारी २०२५ होणार आहे. राऊत हे काल स्वतः कोर्टात उपस्थित नव्हते. हा मुद्दा उपस्थित करत सोमेय्या यांच्या वकिलानी याचिकेला विरोध केला होता. मात्र कोर्टाने ती अमान्य करीत ५० हजाराच्या हमीपत्रावर शिक्षेला स्थगिती देत जामीन मंजूर केला.

## ज्येष्ठांना 10 नोव्हेंबरपासून घरातूनच करता येईल मतदान

सोलापूर: विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षांवरील ज्येष्ठांना घरबसल्या मतदान करता येणार आहे, पण त्यासाठी त्यांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे एक अर्ज द्यावा लागतो. तो अर्ज देण्याची मुदत २२ ते २६ ऑक्टोबरपर्यंत आहे. घरबसल्या मतदान करण्याचा पर्याय निवडलेल्या ज्येष्ठांना १० नोव्हेंबरपासून मतदान करता येणार आहे. त्यासाठी चौघांचे पथक त्यांच्या घरी जाईल. सोलापूर जिल्ह्यात ८५ वर्षांवरील ५२ हजार ७९६ मतदार



आहेत.२०१९च्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, माळशिरस, करमाळा, बार्शी या चार मतदारसंघातील आमदार अवघ्या पाच हजारापेक्षा कमी मताने विजयी झाले होते. त्या निवडणुकीतील बहुतेक विजयी उमेदवारांचे मताधिक्य पाहता यंदाच्या निवडणुकीत ज्या विधानसभा मतदारसंघातील लढती काठावरील आहेत, त्या उमेदवारांसाठी ८५ वर्षांवरील ज्येष्ठांचे मतदान निर्णायक ठरणार आहे.

करमाळा, माढा, बार्शी, मोहोळ, पंढरपूर या पाच मतदारसंघातील ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या पाच ते सहा हजारांपर्यंत आहे. त्यामुळे या मतदारांची यादी घेऊन उमेदवार त्यांच्यापर्यंत पोचण्याचा निश्चितपणे प्रयत्न करतील. यंदाच्या निवडणुकीत उमेदवारांची संख्या, बंडखोरी पाहता ज्येष्ठांच्या मताला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे.

## खालापूर टोलनाक्यावर आठ कोटींची चांदी जप्त

खोपोली : पिकअप टेम्पोंमधून जवळपास आठ कोटी चांदी एक्सप्रेसवेवरील खालापूर टोलनाक्यावर खालापूर पोलीस आणि भरारी पथकाने जप्त केली. ही घटना शुक्रवारी पहाटे साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. विधानसभेच्या निवडणुकीत पोलिसांनी केलेल्या या धडाकेबाज कारवाईने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.



एक्सप्रेसवरून एका गाडीतून मौल्यवान वस्तू घेऊन जात असल्याची गुप्त माहिती खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांना मिळाल्यावर खालापूर टोलनाक्यावर संशयित पिकअप टेम्पो एमएच.०१.ईएम.८७७५ क्रमांकाच्या टेम्पोची तपासणी केली असता या टेम्पोमध्ये १७१ कुरिअर बॅगमध्ये जवळपास ८ कोटी रुपयांची चांदी जप्त करण्यात आली.

## विकृत देशमुखासह सुजय विखेंवर कडक कारवाई करा : नाना पटोले यांची मागणी

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २६ ऑक्टोबर : लाडकी बहीण म्हणून मतांसाठी १५०० रुपये देण्याचा गवगवा करणाऱ्या भारतीय जनता पक्ष युतीची माता भगिनींबद्दलची खरी मानसिकता काय आहे हे सर्वांनी ऐकले आहे. भाजपाचा माजी खासदार सुजय विखेच्या संगमनेरमधील सभेत वसंत देशमुख या भाजपा पदाधिकाऱ्याने काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांची कन्या डॉ. जयश्रीबद्दल अत्यंत हिन, निर्लज्ज व पातळी सोडून भाषा वापरली. देशमुखांनी वापरलेली भाषा हिच भाजपाची महिलांबद्दलची खरी मानसिकता दाखवते, अशा विकृत मानसिकतेला माता भगिनीच त्यांची जागा दाखवतील, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शनिवारी दिला..

भाजपाचा समाचार घेत ते म्हणाले की, संगमनेरच्या सभेत विखेच्या कार्यकर्त्याने, निवडणुकीच्या काळात आम्ही मैदानात उतरलो तर तुमची मुलगी घराबाहेर पडू शकणार नाही, अशी थेट धमकी देत तिच्या चारित्र्यावरही शिंतोंडे उडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी सुजय विखे व्यासपीठावरच होते. अशी वक्तव्य करणारा व्यक्ती वयाने ज्येष्ठ दिसतो. महिलांबद्दल अशी भाषा भाजपावालेच बोलू शकतात, हीच त्यांची संस्कृती असून ब्रिजभूषणपासून गल्ली बोळातल्या पदाधिकाऱ्यांनी ते दाखवून दिले आहे. हा केवळ डॉ. जयश्री थोरात यांचा अपमान नाही तर राज्यातील सर्व महिलांचा अपमान आहे. राज्यातील माता भगिनी या अपमानाचा व्याजासह निवडणुकीत बदला घेतील असे सांगून ते म्हणाले,' संगमनेर प्रकरणी भाजपाकडून आता सारवासारव केली जात आहे पण यामुळे त्यांची मानसिकता बदलणार नाही. पोलीस महासंचालकांनीही पक्षपाती न करता कायदा सुव्यवस्था राखण्याचे काम करावे. वसंत देशमुख या विकृत व्यक्तीला तात्काळ बेड्या ठोकाव्यात. निवडणूक आयागानेही या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वसंत देशमुख व सुजय विखेवर कारवाई केली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

## आयरलँड निवडणूक आयोगाच्या शिष्टमंडळाचा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांशी संवाद

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २५ ऑक्टोबर : आयरलँड देशाच्या निवडणूक आयोगातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने शुक्रवारी मंत्रालयातील राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाला भेट दिली. यावेळी परिषद सभागृह येथे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याशी त्यांनी संवाद साधला.

जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत देशाची ओळख आहे. भारत निवडणूक आयोगाच्या अंतर्गत राज्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची प्रक्रिया काटेकोरपणे, नियोजनबद्धरित्या पार पाडत आहे. राज्यातील एकूण मतदार, मतदारांसाठी केलेल्या सोयीसुविधा, मतदार जनजागृती आदींची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी भेटी दरम्यान शिष्टमंडळाला दिली.

यावेळी आयरलँड निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अध्यक्ष न्यायमूर्ती मॅरी बेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आर्ट ओ'लॅरी, महावाणिज्यदूत श्रीमती अनिता केली, आयरलँड दूतावासाचे अरमान श्रीवास्तव, राज्याच्या निवडणूक विभागाचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी.प्रदीप, सहमुख्य निवडणूक अधिकारी डॉ. विजय राठोड तसेच उपसचिव के. सूर्यकृष्णमुर्ती यावेळी उपस्थित होते. मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी भारत निवडणूक आणि राज्यातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांचे अधिकार व चालणारे कामकाज याविषयी माहिती दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगामार्फत स्वतंत्रपणे घेण्यात येतात. राज्याची लोकसंख्या, विधानसभा मतदार संघ, एकूण मतदान केंद्र, निवडणूक प्रक्रिया, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यंत्र, बॅलेट युनिट ,कायदा व सुव्यवस्था, राजकीय पक्ष आणि आचारसंहिता, मतदान वाढवण्यासाठी राबवण्यात आलेले उपक्रम, आधुनिक तंत्रज्ञानाचा निवडणूक प्रक्रियेत उपयोग करून विविध प आणि पोर्टल आयोगाने विकसित केलेले आहेत याबाबत सविस्तर माहिती त्यांनी दिली.

## निवडणूक कालावधीत ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. २५ ऑक्टोबर : भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने १३ नोव्हेंबर सकाळी सात ते २० नोव्हेंबर सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूकच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुंबई शहर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

## महायुती सरकारच्या कल्याणकारी योजना 'एलएडी व्हॅन'द्वारे प्रचाराला प्रारंभ!

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई दि. २६ ऑक्टोबर – राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते एलएडी व्हॅनला राष्ट्रवादीचा झेंडा दाखवून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात शनिवारपासून करण्यात आला. पक्षाचे उमेदवार ज्या ज्या मतदारसंघात उभे आहेत त्या ठिकाणी ही व्हॅन कार्यान्वित करण्यात आली आहे.

या एलएडी व्हॅनच्या माध्यमातून महायुती सरकारने केलेल्या लोककल्याणकारी योजना... लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिलांना दिलेला लाभ... शेतकऱ्यांना शेतीसाठी दिलेली



वीज माफी... मोफत तीन गॅस सिलेंडरची योजना... मुलींच्या शिक्षणाचा शंभर टक्के खर्च उचलण्याचा क्रांतीकारी निर्णय., आदी मतदारापर्यंत पोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे,, असे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी सांगितले

यावेळी पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी, सरचिटणीस लतिफ तांबोळी, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष महेंद्र पानसरे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पाच वर्षे काडीचेही काम न करणाऱ्या विद्यमान लोकप्रतिनिधीकडून माझ्या कामांचे श्रेय घेण्याचा प्रयत्न : शिवाजीराव कर्डिले

## भाजपचे उमेदवार शिवाजीराव कर्डिले यांचा राहुरी तालुक्यात प्रचार दौरा

नगर: राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघात आमदार असताना विकासाची गंगोत्री आणण्यात यश आले होते. सिंचनापासून अनेक प्रश्नांची सोडवणूक केली. सत्तेत असलो नसलो तरी विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला नाही. दुर्दैवाने मागील पाच वर्षांत मतदारसंघात काडीचेही काम झाले नाही. विकासकामांना खीळ बसली. मी आमदार असताना केलेल्या विकासकामांचे श्रेय घेण्याचे काम करीत विद्यमान लोकप्रतिनिधी केवळ नारळ फोडत बसले. भावनिक मुद्द्यांवर त्यांना एकदा यश आले मात्र आता जनतेच्या भावना बदलल्या असून यावेळी मतदारसंघात परिवर्तन अटळ आहेत. महायुती सरकारच्या कामगिरीवर जनता खूष असून त्याचे प्रत्यंतर निकालात दिसेल असे प्रतिपादन राहुरी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे उमेदवार माजी मंत्री



शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातून भाजपची उमेदवारी जाहीर होताच माजी मंत्री कर्डिले यांनी मतदारसंघात प्रचाराला वेग दिला आहे. त्यांनी राहुरी तालुक्यातील डिग्रस, मुळानगर, वरवंडी, बाभुळगाव, धामोरी बुद्रुक, धामोरी खुर्द, खडांबे बुद्रुक, खडांबे खुर्द, वांबोरी स्टेशन, सडे, वाघाचा आखाडा, राहुरी स्टेशन, गावठाण तांदूळवाडी, कोंढवड, शिलेगाव, करपेवाडी, केदळ बुद्रुक, केंद्र खुर्द, चंडकापूर, पिंप्री वळण, वळण, मानोरी, आडगाव या गावांना भेटी देत मतदारांशी संवाद साधला. प्रत्येक गावांत मतदारांनी प्रचंड उत्साहात ढोल ताशाच्या गजरात कर्डिले यांचे स्वागत केले. मतदारांशी संवाद साधताना कर्डिले यांनी मतदारसंघाची झालेली दुर्दशा बदलण्याची ग्वाही देत यंदा परिवर्तनासाठी साथ देण्याचे आवाहन केले.

कर्डिले म्हणाले, संपूर्ण देशाचा विकास केल्यामुळे नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाले आहेत. केंद्र व राज्यात एका विचाराचे सरकार असल्याने सर्वसामान्यांना लाभ होत आहे.

### आता दुग्धविकास मंत्री होवून शेतकऱ्यांना न्याय द्या

गावागावांत कर्डिले यांचे स्वागत करताना विविध पदाधिकारी, कार्यकर्ते अतिशय उत्साहात होते. शिवाजीराव कर्डिले हे जनतेच्या सुखदु:खात सहभागी होतात. त्यांच्याशी थेट संपर्क साधता येतो. अहमदनगर जिल्हा बँक थेट शेतकऱ्यांच्या दारात नेण्याचे काम त्यांनी केले. दूध धंदा वाढावा, शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे पडावेत यासाठी त्यांनी गायी म्हशी खरेदीसाठी सहज कर्ज उपलब्ध करून दिले. राज्यात आगामी काळात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आहे. राहुरी मतदारसंघातील जनता कर्डिले यांनाच आमदार करणार असून आगामी सरकारमध्ये दुग्धविकास मंत्री बनून त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम करावे, असे आवाहन वक्त्यांनी यावेळी केले.

प्रधानमंत्री पीक विमा योजना, शेतकऱ्यांसाठी मोफत वीज, कृषी सन्मान योजना, लाडकी बहिण योजना, विद्यार्थीनींना मोफत उच्च शिक्षण, दुधाला प्रतिलिटर ७ रूपये अनुदान असे अनेक कल्याणकारी निर्णय घेतल्याने जनतेच्या मनात महायुतीबद्दल आपुलकीची भावना आहे. प्रचारा दरम्यान मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद परिवर्तनाची नांदी ठरत आहे.

या प्रचार दौऱ्यावेळी सुरेश बानकर, शरद पेरणे, लिलाबाई तनपुरे, विश्वास तनपुरे, लक्ष्मण तनपुरे, तानाजी धुमाळ, विनीत धुमाळ, उत्तम म्हसे, कडू आप्पा म्हसे, रविंद्र म्हसे, कुंडलिक खिलारी, सुभाष गायकवाड, गोरक्षनाथ तारडे, नाना मानगुडे, विजया मानगुडे, सुरेश गायकवाड, लक्ष्मण आढाव, अनिल आढाव, जालिंदर आढाव, गोविंद आढाव, सुभाष आढाव, राजेंद्र आढाव उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांची राहुरी येथे भेट



अहिल्यानगर दि. २५- राहुरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक विषयक तयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी राहुरीला भेट दिली.

यावेळी त्यांनी मतदान यंत्रे ठेवण्यासाठी तयार केलेल्या सुरक्षा कक्षाचा व मतमोजणी स्थळाच्या नियोजनाचा आढावा घेतला. राहुरी विधानसभा मतदारसंघाकरिता रामदास पाटील धुमाळ महाविद्यालयामध्ये सुरक्षा कक्ष तयार करण्यात आला असून मतमोजणीदेखील तेथेच होणार आहे.

मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, टपाली मतदानाची तयारी, मतदार नोंदणी, मतदान जनजागृती आदी विषयांचाही यावेळी आढावा घेण्यात आला. राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी सालीमठ यांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी शाहूराज मोरे, तहसीलदार नामदेव पाटील, अपर पोलीस अधीक्षक कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, नायब तहसीलदार विशाल सदनापूर, सचिन औटी आदी उपस्थित होते.

## 'बादल पे पांव है' मालिकेत गौरव शर्माची एंट्री

सोनी सबवरील 'बादल पे पांव है' या मालिकेत बानी (अमनदीप सिद्धू) या महत्त्वाकांक्षी आणि दृढनिश्चयी तरुणीची गोष्ट सांगितली आहे, जी आर्थिक अडचणींना तोंड देऊन आपल्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्यासाठी सतत झटत असते. मालिकेत अलीकडेच प्रेक्षकांनी पाहिले की, बानीचा पती रजत (आकाश आहुजा) याला अटक झाल्यामुळे बानी कठीण प्रसंगात अडकली आहे. त्याच्या जामिनासाठी पैसे उभे करण्यासाठी एका बेकायदेशीर व्यवहारात सामील होण्यावाचून दुसरा कोणताच पर्याय तिच्यापाशी शिल्लक राहात नाही.या सगळ्या गदारोळात एक रहस्यमय नवीन माणूस तिच्या परिचयात येतो.

### दिवाळीसाठीवेगवेगळे प्लान करताहेत सोनी सबवरील कलाकार

दिवाळी हा दिव्यांचा सण. सगळ्यांनी एकत्र येण्याचा, आनंद साजरा करण्याचा सण. यावर्षी, सोनी सबवरील लोकांचे लाडके कलाकार केवळ आपल्या मालिकांमधूनच नाही, तर सेट्सवर देखील या उत्सवाचा आनंद साजरा करण्यास उत्सुक आहेत. त्यांचे वेळापत्रक इतके व्यस्त असते की, ते आपल्या सह-कलाकारांसोबत आणि क्रूसोबतच दिवाळी साजरी करतात. आणि सगळ्यांना त्या उत्सवात सामील करून घेतात.

## जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांची अकोले स्ट्रॉंगरूमला भेट

अकोले,दि.२६ -* जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी अकोले येथील शासकीय धान्य गोदाम (जुने) येथे स्थापन केलेल्या स्ट्रॉंगरूमला भेट देऊन तेथील सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला.

यावेळी मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था,ईव्हीएम यंत्राचे वाटप व मत मोजणीच्या दिवशी जागेचे नियोजन याविषयी जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर माहिती घेतली. प्रशासनाच्या सर्व विभागांच्या निवडणूकविषयक तयारीचा आढावा व कामकाजाची पाहणी करून



निवडणूक आचारसंहितेच्यादृष्टीने त्यांनी सूचना दिल्या. निवडणूक आयोगाच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पोलिस अधीक्षक ओला यांनी ईव्हीएम सुरक्षिततेच्या दृष्टीने स्ट्रॉंगरूमचे ठिकाण व परिसराची पाहणी केली.

यावेळी अकोले विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, गटविकास अधिकारी विकास चौरे, नगरपंचायत मुख्याधिकारीपंकज गोसावी, निवासी नायब तहसीलदार किसान लोहारे, महसूल नायब तहसीलदार प्रमोद सावंत आदी उपस्थित होते.

## कलापथकाद्वारे मतदान व एच.आय.व्ही. एड्स जनजागृती

अ. नगर : जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागामार्फत अहिल्यानगर, राहुरी , श्रीरामपूर, कोपरगाव व राहता या तालुक्यातील सार्वजनिक ठिकाणी कलापथकाद्वारे मतदान व एच.आय.व्ही. एड्सबाबत जनजागृती करण्यात आली. कलापथकाद्वारे एच.आय.व्ही. संसर्गाची कारणे, प्रतिबंधात्मक उपाय, समज-गैरसमज, लक्षणे, भेदभाव, एच. आय. व्ही. एड्स प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७, गुप्तरोग, मोफत एच.आय.व्ही. तपासणी सुविधा, आयसीटीसी केंद्राचे महत्त्व व १०९७ या टोल फ्री क्रमांकाची माहिती नागरिकांना देण्यात आली. तसेच नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती व्हावी यासाठी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात आली.

## महिला इलेक्ट्रिशियन प्रशिक्षण उपक्रम सुरू

नाशिक : क्रॉम्प्टन ग्रीव्ह्ज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लि.ला अग्रगण्य उपक्रम 'सक्षम'च्या दुसऱ्या बॅचच्या लॉंचची घोषणा करताना अभिमान वाटत आहे. या उपक्रमाचा महिलांना इलेक्ट्रिकल उद्योगामध्ये सक्षम करण्याचा मनसुबा आहे. टाटा स्ट्राइव्हसोबत सहयोगाने हा अद्वितीय उपक्रम वंचित समुदायांमधील तरूण महिलांना असमकालीन एसटीईएम पदांमध्ये प्रशिक्षण देत सक्षम करतो, ज्यामुळे अधिक सर्वसमावेशक भविष्यासाठी मार्ग सुकर झाला आहे, जेथे महिला प्रगती करू शकतील. पहिल्या बॅचच्या यशाला अधिक पुढे घेऊन जात क्रॉम्प्टनचा सक्षम उपक्रम इलेक्ट्रिकल उद्योगामधील लैंगिक तफावतीला दूर करत राहिल, ज्यासाठी महिलांना टेक्निकल पदांमध्ये निपुण होण्याकरिता आवश्यक कौशल्ये व प्रमाणन देत आहे.

## संशयित काकूला मिळाला सशर्त जामीन; पुतण्याला विहिरीत ढकलण्याचा आरोप

छत्रपती संभाजीनगर : माटेगाव येथे झालेल्या खून प्रकरणी संशयित काकूला न्यायालयाने सशर्त जामीन दिला. शेती स्वतःच्या मुलांना मिळावी, या हव्यासापोटी अवघ्या चार वर्षांचा पुतण्या सार्थक सागर जाधव याला विहिरीत ढकलून त्याचा खून केला. या आरोपाखाली न्यायालयीन कोठडीत असलेली सुनीता गणेश जाधव हिला ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर सशर्त जामिनावर मुक्त करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. एस.जी. मेहरे यांनी दिला.

माटेगाव (ता. कन्नड) येथील शेतवस्तीवरील विहिरीत सार्थक या चिमुकल्याचा मृतदेह आढळला होता. त्या शेतवस्तीवर गणेश आणि सागर जाधव कुटुंबासह राहत होते. गणेशला दोन मुले आणि सागरला सार्थक व एक मुलगी आहे. खेळताना सार्थकने गणेशच्या मुलाच्या डोळ्यांत चुना टाकल्यामुळे त्याचा डोळा पूर्णपणे निकामी झाला होता. या घटनेपासून सुनीताच्या मनात सार्थकबद्दल राग होता. सागरच्या पत्नीची गर्भपिशवी काढल्यामुळे भविष्यात तिला मुलगा होणार नाही, याची जाणीव सुनीताला होती.

त्यामुळे सार्थकला संपविले तर बदलाही पूर्ण होईल व सर्व शेती आपल्या मुलांना मिळेल, या हेतूने तिने खून केल्याचा आरोप आहे. तिच्यावर देवगारव रंगारी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद आहे. सुनीताला १० ऑगस्ट २०२४ ला पोलिसांनी अटक केली होती. पोलिस कोठडीनंतर तिची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. तिने ॲड. भरत साहेबराव डोईफोडे यांच्यामार्फत खंडपीठात जामीन अर्ज दाखल केला होता. सरकारतर्फे ॲड. एस.बी. पुलकुंडवार आणि मूळ फिर्यादीतर्फे ॲड. शेख सोहेल यांनी बाजू मांडली.

## विधानसभा निवडणुकीत निष्ठेने मित्र पक्षाचे काम करून महायुतीलाच विजयी करा

### खा.अनिल जैन यांचे भाजपच्या पदाधिकाऱ्यांना आवाहन

नगर - भारतीय जनता पार्टीने मोठ्या विचारपूर्वक अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाल बरोबर घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांनी ही विधानसभा निवडणूक आपलीच असल्याचे समजून मतभेद बाजूला ठेवून महायुतीचेच काम करायचे आहे. देशाच्या व राज्याच्या उज्वल भवितव्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे राज्यात पुन्हा मह्युतीचेच राज्य येण्यासाठी ही लढाई आपल्याला जिंकायची आहे. लोकसभा निवडणुकीत



कमी झालेल्या जागांचे शल्य पुसून काढायचे आहे. पक्ष निष्ठा हीच भाजपची शिकवण आहे. त्यामुळे सर्व पदाधिकाऱ्यांनी निष्ठेने पक्षादेशाचे पालन करून विधानसभा निवडणुकीत मित्र पक्षाचे काम करून महायुतीलाच विजयी करा. अहिल्यानगर मधील सर्व भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी आपली शक्ती जागृत करा. तुमच्या शक्तीपुढे कोणताही शत्रू टिकू शकणार नाही, असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे केंद्रीय निरीक्षक व प्रभारी खासदार अनिल जैन यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुजरथ येथील राज्यसभेचे खासदार अनिल जैन यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर शहर भारतीय जनता पार्टीची महत्वपूर्ण बैठक लक्ष्मी कारंजा चौकातील पक्ष कार्यालयात झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर होते. यावेळी श्रीगोंदा तालुक्याचे प्रभारी जगदीश पटेल, सरचिटणीस सचिन पारखी, प्रशांत मुथा, पंडित वाघमारे वसंत लोढा, सुनील रामदासी, प्रिया जानवे, रवींद्र बाकलीवाल, बाबासाहेब वाकळे, सागर शिंदे, साहील शेख, रवींद्र बारस्कर, सुजित खरमाळे, पियुष जग्गी, संतोष शिरसाठ, रामदास आंधळे, अविनाश वाणी, राजू वाडेकर, सचिन पावले, ज्ञानेश्वर धिरडे, सुनील सकट, सुनील उमाप, मीरा सरोदे, चंदन बारटक्के, गोपाल वर्मा, सीए.ज्ञानेश्वर काळे, हर्षल बोरा, महावीर लोढा, पियु संचती, मयूर ताठे, अरुण शिंदे, बंटी डापसे, संजय ढोणे, करण कराळे, मनोज दुल्लम, आदिसांह पदाधिकारी उपस्थित होते.

## किनवट विधानसभा निवडणुक रणधुमाळी शुक्रवार पर्यंत एकूण ८ उमेदवारांचे ९ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**

**माहुर ,दि. २६ ऑक्टोबर** : ८३ किनवट विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याच्या दि.२२ऑक्टोबर पासून दि.२५ऑक्टोबर पर्यंत ८ उमेदवारांनी एकूण ९ नामनिर्देशन पत्र उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट येथे सहायक जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी मेघना कावली यांच्या कडे दाखल केले आहेत. विशेष म्हणजे, या निवडणुकीत उभे राहण्यासाठी इच्छुक असलेल्यापैकी सर्वात आधी वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवारी जाहीर झालेले प्रा.विजय खुपसे यांनी आपला नामनिर्देशन अर्ज आणखीसुद्धा भरलेला नसल्याने अनेकांच्या भुवया ताणल्या गेल्या आहेत.

शनिविर, रविवार असे सलग दोन दिवस शासकीय सुट्या असल्याने आता नामनिर्देशन दाखल करण्यासाठी उरलेल्या दोन दिवसात आणखी किती उमेदवार आपले नामनिर्देशन अर्ज भरतात याकडे राजकीय रसिकांचे डोळे लागलेले असून, सोमवारी २८ रोजी भाजपाचे उमेदवार आ.भीमराव केराम हे आपला दुसरा नावनोंदणी अर्ज मोठे शक्तिप्रदर्शन करीत भरणार असून, मंगळवारी २९ या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ( श.प.) उमेदवार प्रदीप जाधव नाईक हे सुद्धा शक्तिप्रदर्शन करीत दाखल करणार असल्याचे समजते.

शुक्रवार दि.२५रोजी आज रोजी विक्री करण्यात आलेली नामनिर्देशन पत्रे ५ असून नामनिर्देशन पत्रे घेऊन जाणारे अर्जदार ४ आहेत.२५ ऑक्टोबर पर्यंत किनवट विधानसभेसाठी एकूण १०४ नामनिर्देशन पत्रे विक्री झाली असून, नामनिर्देशन पत्रे घेऊन जाणारे एकूण अर्जदारांची संख्या ही ४४ इतकी आहे.दि.२५ ऑक्टोबर पर्यंत उपविभागीय अधिकारी कार्यालय किनवट येथे ६ उमेदवारांकडून एकूण प्राप्त प्नामनिर्देशन पत्रांची संख्या ही ७ होती.

शुक्रवार २५ तारखेपर्यंत पर्यंत प्राप्त नामनिर्देशन पत्र ९ तर आतापर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल केलेले उमेदवार ८ आहेत. आज पर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी अर्जुन किशन आडे-१अर्ज (सीपिआय एम ),भीमराव रामजी केराम-१अर्ज (बीजेपी), प्रदीप हेमसिंग जाधव- १अर्ज ( एनसीपी श.प.), बेबीताई प्रदीप जाधव-१अर्ज (एनसीपी श.प. ), गोविंद संबान्ना जेटेवार-१अर्ज (राष्ट्रीय समाज पक्ष ), संदीप बाबुराव कराळे-१अर्ज (अपेक्ष), सचिन माधवराव जाधव- २अर्ज ( बीजेपी आणि अपक्ष ),सपना सचिन जाधव-१अर्ज(अपक्ष) याप्रमाणे आहे.

दरम्यान, भाजपाचे उमेदवार भीमराव केराम यांनी २४ तर राष्ट्रवादी शपचे उमेदवार प्रदीप जाधव नाईक यांनी २५ रोजी आपापला पहिला फॉर्म किनवट उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे भरला असून, आता यानंतर ते क्रमशः सोमवारी व मंगळवारी आपापला दुसरा नामनिर्देशन पत्र मोठे शक्तिप्रदर्शन करीत भरणार असल्याने या शक्तिप्रदर्शनाकडे आदिवासी व बंजारा बहुल मतदारसंघातील जनतेचे लक्ष लागले आहे.महत्वाचे म्हणजे या शक्तिप्रदर्शनात आपले सरकार लाडके सरकार म्हणवून घेणाऱ्या सरकारच्या लाडकी बहिण योजनेचा लाभ घेण्यासाठी तमाम बँकेच्या ठिकाणी अमाप गर्दी करणाऱ्या लाडक्या बहिणीच्या संख्येकडे सत्ताधाऱ्यांसह विशेषतः वीरोधकांचे लक्ष लागले आहे.

## उधोजकांचा आ. संग्राम जगताप यांना पाठिंबा

### आमी संघटनेतील सभासदांशी जगताप यांचे चर्चासत्र संपन्न

नगर : शहरामध्ये विविध विकास कामाच्या योजना यशस्वीपणे राबविण्यात यशस्वी झालो आहे, या कामांसाठी वर्षानुवर्ष पाठपुरावा केला असल्यामुळे प्रत्यक्षात साकारताना दिसत आहे, निवडणुकीमध्ये कुठलेही काम सुरू झाले नसून दोन वर्षांपूर्वीच कन्सल्टिंग एजन्सी नेमून प्रस्ताव तयार करण्यात आला असून मंजुरीसाठी शासनाकडे पाठवण्यात आला आणि तो मंजूर देखील झाला त्यानंतर लोकसभा आणि विधान परिषदेची आचारसंहिता लागली, आता फक्त ६ रस्त्यांची कामे सुरू झाली आहे दिवाळीनंतर शहरात विविध भागात रस्ता कॉंक्रिटीकरणाची कामे मार्गी लागणार आहे, दहा वर्षांमध्ये केलेली विकास कामे जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम करत आहे, नगर एमआयडीसीच्या विस्तारीकरणासाठी ६०० एकर जागा उपलब्ध झाली आहे. या ठिकाणी मोठमोठे उद्योग आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहे, त्या माध्यमातून युवकांना रोजगार उपलब्ध होईल, सुरक्षित शहर म्हणून ओळख निर्माण झाली असल्यामुळे बाहेरील शहरामधील बांधकाम व्यावसायिक येत असून कोठे प्रकल्प उभे राहत आहे सह्याद्री नागापूर चौक येथे उड्डाणपुलाचे काम होणार असून डीएसपी चौक येथे कामदेखील



एमआयडीसीतील आयटी पार्टी इमारत २००० साली माजी उद्योग मंत्री कै. पतंगराव कदम यांच्या हस्ते उद्घाटन झाले होते तेव्हापासून १९ वर्ष बिल्डिंग ओसाड पडली होती या ठिकाणी मोठमोठे आगेमोहोळ तसेच फुटलेल्या काचा पहावयास मिळत होते मी या गोष्टीकडे लक्ष घातले आणि इमारतीला पुन्हा एकदा आयटी पार्कचे रूप दिले आणि या ठिकाणी छोटेसे प्रमाणात का होईना काम सुरू झाले असून तीनशे युवक युवती काम करत आहे ते काम बंद पाडण्यासाठी काही स्वयंघोषित लोक पुढे येत आहे प्रत्येक जण शून्यातूनच काम सुरू करत असतात मधल्या काळात आयटी पार्क क्षेत्रावर कोविडचे मोठे संकट ओढावले होते आजही काही लोक वर्क फॉर्म होम काम करत आहे माझा प्रयत्न सुरू असून या ठिकाणी एक चांगला मोठा प्रकल्प आणायचा आहे असे मत आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केल.

सुरू झाले आहे असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले

एमआयडीसी मधील आमी संघटनेच्या वतीने विधानसभा निवडणुकीमध्ये आमदार संग्राम जगताप यांना पाठिंबा जाहीर केला यावेळी संघटनेचे अध्यक्ष जयदार्य खाकाळ, उपाध्यक्ष महेश इंदानी, अरविंद पारगावकर, सुनील मुनोत, सुमित लोढा, सागर निंबाळकर, राजेंद्र कटारिया, दिलीप अकोलकर, राजेंद्र सुक्रे, नरेंद्र बाफना, गौरव गंधे, अमित पानसरे, सतीश गवळी, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, हरजीतसिंह वधवा, सुमित सोनवणे, निनाद टिपूगडे, मिलिंद कुलकर्णी, दौलतराव शिंदे, दिलीप कर्नावट, अनिल लोढा, किरण कातोरे, रवी बक्षी, सुभाष गुगळे, अदीसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते

अरविंद पारगावकर म्हणाले की, शहरामध्ये सुरू असलेल्या विकास कामामुळे आम्ही सर्व उद्योजक तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, शहराला महानगराचे रूप देण्यासाठी तुम्ही काम करत आहात, नगर एमआयडीसीमध्ये एक मोठा उद्योग आणावा, जेणेकरून या ठिकाणी १० हजार युवकांना रोजगार मिळेल त्या माध्यमातून शहराच्या अर्थकारणाला बळ मिळेल उद्योजकांच्या काही समस्या असतात त्या सोडविण्याचे काम तुम्ही करतच आहात, नगरमध्ये आता उद्योग येण्यासाठी तयार आहेत त्यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करू असे ते म्हणाले. जयदार्य खाकाळ म्हणाले की, पुणे मुंबई येथील कंपन्यांमध्ये ठेके घेण्यासाठी राजकीय लोकांचा दबाव येत असतो मात्र तो आपल्याला नाही उलट त्रास देणाऱ्यांनाच सरळ केलं जातं. आमदार संग्राम जगताप नेहमीच उद्योजकांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असतात म्हणून या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांना आमी संघटनेचा पाठिंबा आहे असे ते म्हणाले.

हरजीत वधवा म्हणले की, एमआयडीसीतील बंद पडलेली आयटी पार्कची बिल्डिंग धुळखात पडली होती काचा फुटल्या होत्या या ठिकाणी त्यांच्या प्रयत्नामुळे छोट्याशा प्रमाणात का होईना आयटी पार्क सुरू झाले आहे नगर एमआयडीसी मध्ये एखादी सरकारी कंपनी आणावी तसेच सरकारी मेडिकल कॉलेज देखील पाहिजेल यासाठी त्यांनी प्रयत्न करावे असे ते म्हणाले

मिलिंद कुलकर्णी म्हणाले की, आपल्या शहराचे काम करणारे लोक कोण आहे त्यांच्याकडे कोणत्या कल्पना आहे हे आपण पाहिले आहे आमदार संग्राम जगताप यांच्याकडे व्यापक दृष्टिकोन आहे आणि शहराबद्दल असणारी तळमळ आपुलकी देखील आहे त्यांचे काम आपल्या सर्वांना दिसत असून आपण सर्वजण त्यांच्या पाठीमागे उभे राहणार आहेत असे ते म्हणाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

### स्नेहधारा फाउंडेशनच्या वतीने स्नेहालय, अनामप्रेम, बालगृह संस्थेला दिवाळी निमित्त स्नेहभेट

# अनाम प्रेम आम्हाला जागण्याची आणि लढण्याची प्रेरणा देते : स्नेहधारा फाउंडेशन



अहिल्यानगर : अहिल्यानगर येथील स्नेहधारा फाउंडेशनने सालाबादाप्रमाणे दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर अनामप्रेम संस्थेला , संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभेट म्हणून मॉर्निंग किटची भेट दिली. या प्रसंगी अनाम प्रेम संस्थेचे अध्यक्ष माने साहेब, स्नेहधारा फाउंडेशनचे भूपेंद्र रासने, संकेत होशिंग, क्षितिजा हडप, वैशाली राजहंस,कौस्तुभ देशपांडे, वासंती तिरमल, नारायण मंगलारम हे उपस्थित होते. यावेळी बोलताना नारायण मंगलारम यांनी इथले विद्यार्थी दिव्यांग नसून प्रज्ञाचक्षू आहेत ज्यांची अलौकिक प्रज्ञा हेच त्यांचे चक्षु आहेत आणि या विद्यार्थ्यांचे गुण पाहून आपल्याला प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. त्यांनी म्हटले, अनाम प्रेमला आम्ही काही देत नाही, तर अनाम प्रेम आम्हाला जागण्याची आणि लढण्याची प्रेरणा देते.

अध्यक्ष माने यांनी आपल्या संस्थेच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशोगाथा सांगितल्या, अनाम प्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तयार केलाय वस्तू दाखवत त्यांना प्रोत्साहन आणि पाठबळ देण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे, यावेळी संस्थेचा गुणी विद्यार्थी राहुलने एक हाताने टाळी वाजवण्याची अद्भुत कला सादर करून, वाद्य वाजवून सर्वांची मने जिंकली. संस्थेच्या प्रकाशवाटा या ब्रेल लिपीतील मासिकाचे वाचन ही विद्यार्थ्यांनी करून दाखवले.

यावेळी बोलताना स्नेहधाराचे भूपेंद्र रासने म्हणाले, राहुल सारख्या गुणी विद्यार्थ्यांना पाहून मला राहुल म्हणजे अनामप्रेम संस्थेचा सचिन तेंडुलकर आणि आयर्न मॅन वाटतो. या विद्यार्थ्यांच्या पाठीशी आम्ही कायम उभे आहोत. तर क्षितिजा हडप यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना इथल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले व कुठलीही अडचण आली तर संपर्क करा आम्ही आपल्या मदतीचा नक्कीच प्रयत्न करू असा शब्द दिला.

स्नेहधाराच्या कौस्तुभ आणि सोनाली देशपांडे परिवाराने अनामप्रेमाच्या कल्पना या साईन लँग्वेज शिकणाऱ्या विद्यार्थिनीला फुल न फुलाची पाकळी म्हणून छोटीशी आर्थिक मदत यावेळी मान्यवरांच्या हस्ते वितरित केली. सूत्र संचालन अनामप्रेमाच्या विद्यार्थ्यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार सोनाली देशपांडे यांनी मानले. यावेळी सौ.क्षितिजा होशिंग, सौ.पूनम रासने, सौ.सोनाली देशपांडे, सौ.विद्या मंगलारम, सौ.गौरी डहाळे, चंद्रकांत बेती,राजू पवार, आर्यन रासने, अर्जुन रासने.आदी परिवारासह उपस्थित होते. बालगृह प्रकल्पाचे योगेश गुंड विद्यार्थी आणि पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. बालगृह प्रकल्पाचे योगेश गुंड यांनी भावना व्यक्त करताना स्नेहधारा फाउंडेशनच्या माध्यमातून होत असणारे कार्य उल्लेखनीय आहे.या कार्यातून तरूणांना प्रेरणा मिळत राहो असे सांगितले.

दिवाळीच्या या शुभ प्रसंगी अनामप्रेम संस्थेला मिळालेली ही स्नेहभेट निश्चितच चांगुलपणा पेरणारी ठरेल.

# महिला अत्याचारावर काम करणाऱ्या महिलेची काढली छेड

छत्रपती संभाजीनगर: दोन विविध घटनांत ऑटोरिक्षाचालकांनी शालेय विद्यार्थिनी व प्रवासी महिलेचा विनयभंग केल्याचा प्रकार शुक्रवारी शहरात असतानाच, तुम्ही महिला अत्याचारावर काम करता तुमच्या पतीचा मोबाईल नंबर द्या असे म्हणून हात धरून समाजसेविकेची छेड काढण्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी भवानीनगर शिवसेना पाटीजवळ घडली.

फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीवर दोन अनोळखी इसमानी फिर्यादी महिलेच्या जवळ येऊन फिर्यादी महिलेस म्हणाले की तुम्ही महिला अत्याचारावर काम करता तुमच्या पतीचा मोबाईल नंबर द्या असे म्हणून एकाने पाठीमागे बसलेल्या फिर्यादीच्या कोटी जवळ येऊन फिर्यादीच्या मनास लज्जा वाटेल अशा रीतीने फिर्यादी महिलेचा हात पकडून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरण दोन अज्ञात आरोपी विरोधात जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस अधिकारी घुले हे करीत आहेत.

काल घडल्या दोन घटना

घटनांत ऑटोरिक्षाचालकांनी शालेय विद्यार्थिनी व प्रवासी महिलेचा विनयभंग केल्याचा प्रकार शुक्रवारी शहरात घडला. असतानाच दोन जणांनी रस्त्यात स्कुटीवर जाणाऱ्या समाजसेविका महिलेची दोन अज्ञात आरोपींनी छेड काढली असून हे आरोपी फरार झाले असून त्यांचा तपास जीन्सि पोलीस करीत आहेत.

महिलांमध्ये असुरक्षितेची भावना

शहरात महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये अलीकडे वाढ होताना दिसत आहेत. विनयभंग, छेडछाड अशा दिवसाला एक ते दोन घटना घडत आहेत. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटनाची राजधानी मानल्या जाणाऱ्या संभाजीनगरला तरुणी व महिलांमध्ये असुरक्षितेची भावना निर्माण झाली आहे. शांत, सुरक्षित आणि पर्यटनाची राजधानी म्हणून संभाजीनगर शहराची ओळख आहे. मात्र, या शहराच्या ओळखीला अलीकडे गालबोट लागू लागले आहे.

# अहिल्यानगर मधील सर्व ओबीसी समाजाने महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या मागे उभे राहावे : आ. योगेश टिळेकर



नगर - राज्यात जातीय वाद वाढत आहे. जातीजातीमध्ये भांडणे लावण्याचे षडयंत्र काहीजण करत आहेत. हा प्रकार थांबवण्यासाठी सर्व ओबीसी समाजाने एकत्र येते हिंदुत्वासाठी काम करावे. याआधीच्या काँग्रेसच्या राजवटीत केवळ शाहू, फुले, आंबेडकर यांच्या नावाने राजकारणचे केले गेले. पण राज्यात सर्व समाजांसाठी महामंडळाची स्थापना करून युती सरकारने सर्व समाजांना न्याय देत या महापुरुषांना अभिप्रेत असेलेले काम केले आहे. सर्वांना न्याय देणाऱ्या महायुतीचीच सत्ता पुन्हा राज्यात येणे आवश्यक आहे. राज्यातील महायुतीचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार हे तिन्ही नेते सरकार चालवण्यास अनुभवी व सक्षम नेते आहेत. त्यांचे हात बळकट करण्यासाठी अहिल्यानगर मधील सर्व ओबीसी समाजाने महायुतीचे उमेदवार संग्राम जगताप यांच्या मागे उभे राहून त्यांना विजयी करावे, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे ओबीसी समाजाचे नेते व विधान परिषद सदस्य योगेश टिळेकर यांनी केले.

आमदार योगेश टिळेकर यांनी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगरला धावती भेट दिली असता महायुतीचे उमेदवार आमदार संग्राम जगताप यांनी आ.टिळेकर यांचे तारकपूर भागात महायुतीच्या वतीने स्वागत केले. यावेळी झालेल्या बैठकीत आ.टिळेकर बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष किशोर डागवाले, महायुतीचे विधानसभा निवडणुकीचे समन्वयक महेंद्र गंधे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रा.माणिक विधाते, बाळासाहेब भुजबळ, धनंजय जाधव, बाबासाहेब सानप, नरेंद्र कुलकर्णी, डॉ.रणजीत सत्रे, सुमित कुलकर्णी, दगडू पवार आदींसह प्रमुख पदाधिकारी व महिला उपस्थित होते.

यावेळी किशोर डागवाले म्हणाले, आ. योगेश टिळेकर हे ओबीसी समाजाचे उभरते नेतृत्व आहे. त्यांनी केलेल्या कामाची पावतीच त्यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाच्या माध्यमातून मिळाली आहे. चांगल्या समाज कामाची दखल घ्त्लीच जाते. नगर मधील ओबीसी समाजाच्या मेळाव्यासाठी आ. टिळेकर यांनी एक दिवस द्यावा. याधीच्या काँग्रेसच्या राजवटीत महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यातील भिडे वाड्याचे राष्ट्रीय स्मारक झाले नाही. गेल्या ७० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागीस राज्यातील महायुती सरकारने त्वरित मंजुरी दिली.

# लाईफ म्हणजे गोंधळ नुसता

## तारूण्यातल्या भावविश्वाची झलक दाखविणारं गाणं प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर : प्रत्येकाच्या आयुष्यात महाविद्यालयीन जीवन हा एक खास अविस्मरणीय कोपरा असतो. आईवडिलांपासून दूर राहून एकाकी हॉस्टेलवर राहून शिक्षण घेणा-यांच्या बाबतीत तर ही जीवनाची पाठशाळा असते. एक मात्र खरं की, कॉलेजमध्ये शिकणा-या प्रत्येकाच्या आयुष्यात हा काळ एका वेगळ्याच जाणिवेनं व गोंधळाने भारलेला असतो. याच विश्वाची ओळख करून देणारं 'ह्या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटातील 'लाईफ म्हणजे गोंधळ नुसता' हे गाणं प्रदर्शित झालं आहे. या गाण्यातून तारुण्यातील ही संभ्रमावस्था नेमकी टिपण्यात आली आहे. संदीप सावंत दिग्दर्शित आणि पॅनोरमा स्टुडिओज प्रस्तुत 'ह्या गोष्टीला नावच नाही' हा मराठी चित्रपट येत्या ८ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येतो आहे.

'लाईफ म्हणजे गोंधळ नुसता..
कन्फयुजन कन्फयुजन..
हे करू की ते करु..
मिळत नाही सोल्युशन

पराग फडके यांच्या लेखणीतून उतरलेल्या या गाण्याला गायक पराग फडके आणि अन्य कलाकारांचा स्वरसाज लाभला आहे. या गाण्याला पराग फडके यांनी चाल दिली आहे. ऋषिकेश ठाकूरदेसाई, चिराग कबाडे, रमण पुजारी, त्रिगुण पुजारी यांचे संगीत संयोजन आहे. या गाण्याच्या शब्दांमधून तरुणाईच्या ज्या भावना आहेत व्यक्त झाल्या आहेत. तरुणविश्वाचं दर्शन घडवत असताना आपल्याच जीवनातल्या अनेक प्रसंगांचं कोलाज आपल्यासमोर उभं करणारं हे गाणं आहे.

जयदीप कोडोलीकर, प्रथमेश अत्रे, चैतन्य जवळगेकर, अनुराधा धामणे,अवधूत पोतदार, सीमा मकोटे, प्रतीक्षा खासनीस आदि कलाकार या चित्रपटात आहेत. डॉ. सतीशकुमार आदगोंडा पाटील यांच्या 'मृत्यूस्पर्श' या कादंबरीवर हा चित्रपट आधारित आहे. अनेक लोक आपल्या आयुष्यातील अपूर्णता स्वीकारून आनंदाने जगत असतात. अगदी छोट्या, साध्या, नैसर्गिक गोष्टींमध्ये, अनुभवांमध्ये ही आनंदाच्या अनेक छटा लपलेल्या असतात. त्यांचा शोध घेणं, त्यातली गंमत अनुभवणं यातच आपल्या जगण्याचा अर्थ सामावलेला असतो, हे सांगण्याचा प्रयत्न 'ह्या गोष्टीला नावच नाही' या चित्रपटातून करण्यात आला आहे.

पॅनोरमा स्टुडिओज सादरकर्ते असलेल्या 'ह्या गोष्टीला नावच नाही' चित्रपटाचे कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक, डॉ. सतीशकुमार आदगोंडा पाटील, डॉ. अंजली सतीशकुमार पाटील निर्माते आहेत. मुरलीधर छतवानी, रविंद्र औटी सहनिर्माते आहेत. सहाय्यक निर्माते रजत गोस्वामी आहेत. पायोस मेडिलिंक्स प्रायव्हेट लिमिटेड, जयसिंगपूर निर्मित 'ह्या गोष्टीला नावच नाही' चित्रपटाची पटकथा-संवाद-दिग्दर्शन संदीप सावंत यांचे आहे. छायाचित्रण प्रियशंकर घोष तर संकलन दिनेश पुजारी यांनी केले आहे. साऊंड डिझाइन सुहास किशोर राणे यांचे आहे. पार्श्वसंगीत विवेक पाटील, आकाश जाधव यांचे आहे. वेशभूषा कुलदीप चव्हाण, सेजल पाटील, राजश्री चारी यांची आहे. रि-रेकॉर्डिंगमिक्सर अनुप देव उ-ड यांचे आहे. व्यावसायिक सल्लागार देवयानी गांधी आहेत. चित्रपटाच्या वितरणाची जबाबदारी पॅनोरमा स्टुडिओजने सांभाळली आहे. संगीत वितरणाची जबाबदारी पॅनोरमा म्युझिकने सांभाळली आहे.


**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 95- Jintur**

**Name of the candidate : MEGHNA DEEPAK SAKORE BORDIKAR**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | | **Criminal antecedents** | |
| 1 | a. | Nature of the offences | 1. Cri. No. 552/2019, u/s. 188 of IPC with Nanlpeth Police Station.<br>2. Cri. No. 288/2021, u/s. 188, 269, 270 of IPC with Nanlpeth Police Station.<br>3. Cri. No. 204/2021 u/s. 188, 269, 270 of IPC and other with Nawa Mondha Police Station<br>4. Cri. No. 77/2021 u/s. 188, 269, 270 of IPC with Nawa Mondha Police Station<br>5. Cri. No. 386/2020 u/s. 188, 269, 270 of IPC with Nawa Mondha Police Station<br>6. Cri. No. 186/2020 u/s. 188, 269, 270 of IPC with Nawa Mondha Police Station<br>7. Cri. No. 211/2021 u/s. 188, 269, 270 of IPC with Jintur Police Station<br>8. Cri. No. 404/2019 u/s. 336, 287 of IPC with Jintur Police Station<br>9. Cri. No. 330/2020 u/s. 341, 269 of IPC with Jintur Police Station<br>10. Cri. No. 252/2020 u/s. 188, 269 of IPC with Amalner Police Station<br>11. Cri. No. 345/2020 u/s. 188, 269, 270 of IPC with Nawa Mondha Parbhani Police Station<br>12. Cri. No. 335/2021 u/s. 188, 269, 270 of IPC with Kotwali Parbhani Police Station |
| | b. | Case no. | 1. S.C.C. No. 1980/2019 Before<br>2. S.C.C. No. 1283/2022<br>3. S.C.C. No. 730/2022<br>4. S.C.C. No. 339/2021<br>5. S.C.C. No. 713/2021<br>6. S.C.C. No. 1220/2020<br>7. S.C.C. No. 309/2022<br>8. S.C.C. No. 656/2019<br>9. S.C.C. No. 106/2022<br>10. S.C.C. No. 185/2022<br>11. Cri. No. 77/2021<br>12. Cri. No. 335/2021 |
| | c. | Name of the Court | I) 1 to 6 - Hon'ble Chief Judicial Magistrates Parbhani<br>II) 7 to 9 - Hon'ble J.M.F.C. At. Jintur Dist. Parbhani.<br>III) 10- Hon'ble J.M.F.C Patoda Dist. Beed-1 |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1) 1 to 7 & 9 to 12 - No<br>2) 8 - Yes |
| | e. | Date of conviction, if any | Nil |
| | f. | Details of punishment undergone, if any | Nil |
| | g. | Any other information required to be given | No |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **Meghna Deepak Sakore Bordikar** is Senior Legislator. She has very strong administrative capacity. Looking at her experience she has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 95- Jintur**

**Name of the candidate : MEGHNA DEEPAK SAKORE BORDIKAR** .................... and so on

* In the case of election to Council of States or States or Election to Legislative Council bye MLAs, mention the election concerned in place of name of Constituency.

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## अग्रलेख...

# राजकारणातील ‘भाईभतिजा’वाद

राजकारण हे अगम्य असते, राजकारणात कोणी कोणाचा नसतो, आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी भाऊ भावाचा नसतो, भाऊ बहिणीचा नसतो, बहीण भावाची नसते, वडील मुलीचे नसतात, मुलगी वडिलांची नसते, मुलगा वडिलांचा नसतो, वडीलही मुलाचे नसतात, एवढेच काय, आई मुलाची नसते आणि मुलगीही आईची नसते; अनेक वेळा तर नवरा-बायकोही एकमेकांचे नसतात, असे म्हणतात. याचा प्रत्यय महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीच्या राजकारणातून येत आहे. साध्या अंकगणितात दोन अधिक दोन चार होतात, पण राजकारणाच्या गणितात दोन अधिक दोन कधीच चार होत नाही; कधी ते तीन होतात तर कधी पाच. कधीकाळी राजकारण हे जनतेच्या सेवेचे, त्यांचे प्रश्न आणि समस्या सोडविण्याचे माध्यम होते. आज मात्र राजकारण हे फक्त पैसा आणि पैसा कमावण्याचे माध्यम झाले आहे. याचा अर्थ सगळेच राजकारणी असे असतात असे नाही; त्याला काही सन्माननीय अपवादही आहेत. राजकारणातून अमर्याद पैसा कमवायचा आणि त्या पैशातून पुन्हा राजकारण करायचे, ही सध्याची तऱ्हा झाली आहे. राजकारणातील सभ्यता आणि शालिनता कधीच हरपली आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण असे करणारे भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासारखे नेते आता राजकारणात दुर्मिळ होत चालले आहेत.

तत्त्वाच्या आणि मूल्याच्या राजकारणाचे जुने दिवस कधीच संपले आहेत. राजकारणात मतभेद असले पाहिजे, मनभेद नको, असे गडकरी सतत सांगत असतात. पण आताच्या राजकारणात मतभेद कमी आणि मनभेद जास्त झाले आहेत. राजकारणात परस्परविरोधी विचारांचे एकदुसऱ्याचे विरोधक नाही तर शत्रू झाले आहेत. जुन्या काळात सभागृहात एखाद्या मुद्यावर एकमेकांवर तुटून पडणारे नेते सभागृहाचे कामकाज स्थगित झाले की, एकमेकांच्या गळ्यात गळा घालून बाहेर यायचे आणि एकाच टेबलवर बसून झुणका-भाकरी खायचे, पण आज तसेच चित्र दिसत नाही. आज सभागृहात तर राजकारणी एकमेकांच्या अंगावर धावून जातात, पण सभागृहाच्या बाहेरही एकदुसऱ्याचा गळा पकडायला कमी करत नाही. आता पैशाचे आणि सत्तेचे राजकारण तेवढे उरले आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण होऊनही बराच काळ लोटला, या मुद्यावर बरीच चर्चाही झाली; पण गुन्हेगारीकरणाच्या विळख्यातून राजकारणाची सुटका आतापर्यंत कोणालाच करता आलेली नाही. यासंदर्भात वोरा समितीचा एक अहवालही आला होतो, पण या अहवालावर पुढे काय झाले ते कधी कोणालाच समजले नाही. राजकारणात पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्नही महाराष्ट्रात झाला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांचा खंजिरी वादनात कोणी हात धरू शकत नाही. त्यांनी वसंतदादा पाटील यांच्या पाठीत खंजीर खुपसून मुख्यमंत्रिपद हिसकावून घेतले होते.

राजकारण त्यातही निवडणूक लढवणे ही एक नशा असते. त्यामुळे आधी उमेदवारी मिळविण्यासाठी इच्छुक सर्वतोपरी प्रयत्न करत असतात. आपली पूर्ण ताकद पणाला लावत असतात. उमेदवारी मिळाली नाही, तर दुसऱ्या पक्षात प्रवेश करून उमेदवारी मिळविण्याचा प्रयत्न केला जाते; तोही यशस्वी झाला नाही तर तिसऱ्या, चौथ्या पक्षात प्रवेश केला जातो. कुठेच यश मिळाले नाही तर अपक्ष आणि बंडखोरी करत निवडणुकीच्या रिंगणात उतरले जाते. कधी कधी रक्ताच्या नात्यातलेच एकमेकांविरुद्ध दंड थोपटून रिंगणात उतरतात. याचा ताजा प्रत्यय गडचिरोलीतील अहेरी तसेच बारामती विधानसभा मतदारसंघात येत आहे. अहेरीत मुलगी विरुद्ध वडील अशी लढत होत आहे, तर बारामतीत काका विरुद्ध पुतण्या. अहेरीत धर्मरावबाबा आत्राम विरुद्ध त्यांची मुलगी भाग्यश्री आत्राम अशी बापलेकात सरळ लढत होत आहे. धर्मरावबाबा आत्राम राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तर मुलगी भाग्यश्री आत्राम राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवार आहेत. बारामतीत काका अजित पवार यांच्याविरुद्ध पुतण्या युगेंद्र पवारने दंड थोपटले आहेत. युगेंद्र पवार हा अजित पवार यांचा सख्खा भाऊ श्रीनिवास यांचा मुलगा आहे. यात कोणीही विजयी झाले तर कुटुंब आणि नातेसंबंध हरणार आहे, यात शंका नाही. काका-पुतण्यातील राजकीय संघर्ष हा देशाला आणि महाराष्ट्रालाही नवा नाही, मात्र, बाप आणि लेकीतील राजकीय संघर्षाचा अनुभव अहेरीतून प्रथमच देशाला येतो आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात काका आणि पुतण्या यांच्यातील अनेक राजकीय वाद गाजले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि त्यांचे पुतणे राज ठाकरे यांच्यातील वाद सर्वश्रुत होता. माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे आणि पुतणे धनंजय मुंडे यांच्यात राजकीय वादही महाराष्ट्राने अनुभवला आहे. शरद पवार आणि त्यांचे पुतणे अजित पवार हा काका-पुतण्या वादही दोन-अडीच वर्षांपासून उफाळून आला आहे. याशिवाय काका-पुतण्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दर्जाच्या नेत्यांचे वादही महाराष्ट्राने पाहिले आहे. पण खऱ्या अर्थाने काका-पुतण्या वाद देशभरात गाजले ते मुंडे, ठाकरे आणि पवार कुटुंबातीलच. ‘काका मला वाचवा’ हे वाक्य इतिहासात गाजले होते. पण आधुनिक काळात काही काकांवर पुतण्यापासून मला वाचवा म्हणण्याची वेळ आली आहे. अजित पवार वगळता आतापर्यंत कोणत्याच पुतण्याने आपल्या काकाचा पूर्णच्या पूर्ण पक्ष पळवला नाही. त्यामुळेच राज ठाकरे आणि धनंजय मुंडे यांना सभ्य आणि सज्जन पुतणे समजायला हरकत नाही. अजित पवारांनी तर आपल्या काकाचा पक्षच नाही तर पक्षाचे घड्याळ हे निवडणूक चिन्हही पळवत काकांचे पार बारा वाजवून टाकले.

काका-पुतण्यातील संघर्ष हा महाराष्ट्राबाहेरही अनेक राज्यांत झाला आहे. बिहारमध्ये चिराग पासवान आणि त्यांचे काका पशुपतिकुमार पासवान हा संघर्ष बिहारसोबत देशाने अनुभवला. याठिकाणी मात्र सुरुवातीला काकाने पुतण्याचा पक्षच नाही तर मंत्रिपदही बळकावले होते. नंतर पुतण्याने काकाला धोबीपछाड देत पक्षावर तर नियंत्रण मिळवले; पण मंत्रिपदही पटकावले. उत्तरप्रदेशात अपना दलच्या अनुप्रिया पटेल यांचाही आपल्या आईशी आणि बहिणीशीही असाच राजकीय वाद आहे. या वादामुळे अपना दलचे दोन तुकडे झाले असून एक तुकडा मुलीकडे तर दुसरा आईकडे आहे. यात सध्या तरी मुलगी अनुप्रिया पटेलने आपल्या आईवर आणि बहिणीवर राजकीयदृष्ट्या मात केलेली दिसते आहे. आंध्रप्रदेशातही जगनमोहन रेड्डी आणि त्यांची बहीण शर्मिला यांच्यातील मतभेद जगजाहीर आहे. विशेष म्हणजे हे मतभेद राजकीय नाही तर वडिलोपार्जित संपत्तीसाठी आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जगनमोहन रेड्डी यांना जो विजय मिळाला, त्यात शर्मिला यांचे मोठे योगदान होते. मात्र संपत्तीवरून मतभेद झाल्यानंतर शर्मिला यांनी भावाच्या पक्षातून बाहेर पडत वायएसआर काँग्रेस तेलंगणा हा पक्ष स्थापन केला. नंतर आपला पक्ष त्यांनी काँग्रेसमध्ये विलीन करून टाकला. आपल्या देशात सगळ्यात जास्त चर्चा राजकारणाची होत असते आणि राजकारण सर्वसामान्य माणसाला आवडतही असते. ‘राजकारण गेले चुलीत’ असे उपरोधाने म्हटले जात असले, तरी राजकारण हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. आज राजकारणात येण्यासाठी सगळ्यांची जी तडफड सुरू आहे, ती पैसा कमावण्यासाठी आहे. त्यामुळे निवडणुकीत वारेमाप पैसा खर्च केला जात आहे. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीत प्रचारासाठी प्रत्येक उमेदवाराला खर्चाची मर्यादा निश्चित करून दिली आहे. मात्र, प्रत्यक्षात या मर्यादेच्या किमान पाच ते दहा पट खर्च उमेदवार करत असतात. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रात एका गाडीतून पाच कोटी रुपये पोलिसांनी पकडल्याची बातमी आली होती. ही तर एक झलक होती. अशा कितीतरी घटना येत्या काळात घडणार आहेत. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी मतदारांनाच आता पुढाकार घ्यावा लागणार आहे. मतदान करताना त्यांनी याची काळजी घेतली पाहिजे. घराणेशाही संपवताना राजकारणाचे शुद्धीकरणही केले पाहिजे; ती काळाची गरज आहे. ▮

---

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# काँग्रेसला हिंदू का नकोत?

माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या आत्मचरित्रात गौप्यस्फोट केल्यानंतर आता त्यांनी एका पॉडकास्टमध्ये अतिशय गंभीर विधान केलं आहे. शिंदे म्हणाले, ‘‘त्यावेळी मी भगवा आतंकवाद हा शब्द उच्चारला होता. पण भगव्यासोबत मी आतंकवाद हा शब्द का उच्चारला, हे मला माहीत नाही. असं म्हणणं चुकीचं आहे. त्यावेळी रेकॉर्डवर जे आलं मी तेच म्हटलं. माझ्या पक्षाने (काँग्रेस) मला सांगितलं की, भगवा आतंकवाद आहे.’’ देशाच्या माजी गृहमंत्र्याचे हे धक्कादायक विधान आहे. हे विधान केवळ संघ किंवा भाजपा विरुद्ध काँग्रेस या आधारावर तपासलं गेलं नाही पाहिजे तर देशाची सुरक्षा, देशाचे भवितव्य, संविधान व लोकशाहीचे जतन या आधारावर तपासलं गेलं पाहिजे. ‘भगवा दहशतवाद’ ही थियरी मांडली गेली तेव्हा काँग्रेसचं सरकार अस्तित्वात होतं. शिंदे म्हणतात त्याप्रमाणे भगव्यापुढे ‘आतंकवाद’ हा शब्द लावणं चुकीचं होतं, पण देशाचा गृहमंत्री केवळ पक्षाने सांगितलं म्हणून हा शब्द उच्चारत असेल तर काँग्रेस नेत्यांच्या एकंदर राष्ट्रीय भावनेविषयी संशय घ्यायला प्रचंड वाव आहे. राजकीय नेत्याने पक्षाचे धोरण पाळायचे असते, शीर्ष नेतृत्वाचे आदेशही ऐकायचे असतात. मात्र ते धोरण, ते आदेश देशाच्या सुरक्षेला बाधा आणत असतील आणि एखाद्या समाजाच्या लांगूलचालनासाठी किंवा मूळ आतंकवादाला लपवण्यासाठी दुसऱ्या समाजाला पुरावे नसताना, विनाकारण अतिरेकी ठरवत असतील तर काँग्रेसचे मनसुबे अतिशय घातक आहेत, असेच म्हणावे लागेल.

काँग्रेसच्या शीर्ष नेतृत्वाची प्रचंड मोठी समस्या आहे. हे शीर्ष नेतृत्व मनाने भारतीय झालेले नाही, अशी शंका लोकांच्या मनात येते. म्हणूनच या पॉडकास्टमध्ये अफझल गुरूला आतंकवादी म्हणताना सुशीलकुमार शिंदे कचरतात. म्हणूनच देशभक्त सावरकरांचा काँग्रेसचे लोक द्वेष करतात. कदाचित काँग्रेसच्या इतर नेत्यांना सावरकरांबद्दल आदर वाटत असेल; मात्र केवळ एका कुटुंबामुळे सबंध काँग्रेस हिंदू विरोधी झाली आहे. ‘भगवा आतंकवाद’ हा शब्द सुरुवातीला २०१० मध्ये काँग्रेसचे पी. चिदंबरम् यांनी उच्चारला होता व नंतर २०१३ ला सुशीलकुमार शिंदे यांनी उच्चारला होता. ‘भगवा दहशतवाद’, ‘हिंदू दहशतवाद’ हे शब्द निर्माण करणे म्हणजे खूप मोठे कारस्थान होते. केवळ शब्द उच्चारणे इतपत याची मर्यादा नव्हती तर एक मोठं टुलकिट तयार करण्यात आलं होतं. पाकिस्तानी जिहादी कसाबने केलेला हल्ला हा हिंदूंनी केला आहे, असं भासवण्याचा पूर्ण प्रयत्न झाला होता. वीर हुतात्मा तुकाराम ओंबळे यांनी आपल्या जीवावर खेळून हा कट उद्ध्वस्त केला आहे. तरीदेखील, हू किल्ड करकरे? असा सवाल उठवत हिंदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न झालाच. या भगवा दहशतवादाच्या थिअरीची सुरुवात तशी पाहता नाथुराम गोडसेपासून सुरू झाली. मात्र, ही थिअरी अस्तित्वात आली मालेगाव बॉम्बस्फोटादरम्यान. कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञासिंह असे अनेक हिंदू यात बळी ठरले. पुरावे न सापडल्यामुळे अनेकांना सोडून देण्यात आलं असलं, तरी त्यांची किती तरी वर्षे तुरुंगात खितपत पडल्यामुळे वाया गेली. या संबंधात कर्नल पुरोहित म्हणाले की, त्यांच्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषदेच्या मोठ्या नेत्यांचे आणि योगी आदित्यनाथांचे नाव घेण्याचा दबाव होता. आपण इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, मालेगाव स्फोटाआधी अलिबागमधील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात शरद पवारांनी ‘हिंदू दहशतवाद’ हा शब्द उच्चारला होता, असा आरोप कर्नल पुरोहित यांनी केला आहे. यातून काय निष्पन्न झालं तर लोकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. हिंदू हा अतिरेकी असू शकतो, असा संशय व्यक्त केला जातो. हिंदू हे द्वेष पसरवतात, असा नॅरेटिव्ह निर्माण होऊ लागला आणि द्वेष पसरवणारे, अतिरेकी कारवाया करणारे नामानिराळे राहिले आणि हेच सुशीलकुमार शिंदेंच्या वरिष्ठांना हवे होते का? अशी शंका लोकांच्या मनात निर्माण झाली आहे.

वयाच्या उतरत्या काळात सुशीलकुमार शिंदे हळूहळू एकेक गौप्यस्फोट करीत आहेत. सावरकरांवर ज्याप्रमाणे राहुल गांधी टीका करतात, याविषयीही त्यांनी चिंता व्यक्त केली होती. मात्र, अजूनही सोनिया गांधी किंवा राहुल गांधी यांच्या विरोधात बोलताना शिंदेंच्या मनात एक प्रकारची भीती दिसते. यावरून या घराण्याविषयीची दहशत स्पष्ट होते. शिंदे किंवा अनेक काँग्रेसी नेते हे तसे हिंदू आहेत, हिंदू धर्म पाळणारे आहेत. त्यांच्या मनात छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा हिंदू महापुरुषांविषयी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा संघटनांविषयी आदर असेल, पण या एका कुटुंबामुळे हा आदर त्यांना लपवावा लागतो. त्यामुळे काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठांविषयीचं ‘घालीन लोटांगण’ हे धोरण बाजूला ठेवून राष्ट्र प्रथम हे धोरण अवलंबिलं पाहिजे. हिंदू आतंकवाद ही थिअरी राष्ट्रद्रोही आहे आणि आता शिंदेंनीच कबूल केलं आहे की, त्यांना हा शब्द पक्षाने उच्चारायला लावला होता. मालकाचा आदेश पाळणाऱ्या कर्मचाऱ्याप्रमाणे काँग्रेस नेत्यांनी ही थिअरी खरी करण्यासाठी जीवाचं रान केलं. शिंदेंच्या कबुलीजबाबातून एक गोष्ट स्पष्ट होते की, काँग्रेस तत्त्वतः हिंदुविरोधी आहे आणि त्यांचा हिंदू विरोध हा त्यांच्या survival factor वर बेतलेला असावा. राष्ट्रहितापेक्षा political survive हे हित सर्वतोपरी असल्यामुळे काँग्रेसच्या इतर नेत्यांना एका कुटुंबाच्या हिताला बळी पडावे लागते. म्हणूनच या survival factor आणि political survive धोरणामुळे भारताचं संविधान धोक्यात आलं आहे. ▮

writerjayeshmestry@gmail.com

---

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# आघाडीपेक्षा महायुती सरस!



महाविकास आघाडीत एकमत नाही. जागावाटपावरून प्रचंड रस्सीखेच सुरू आहे. जागावाटपात सेंच्युरी कोण मारेल, याची स्पर्धा एकमेकांतच चालली आहे. मुख्यमंत्री पदावरूनदेखील ओढाताण आहे. महाविकास आघाडीचे घटक पक्ष पद, खुर्ची आणि जागेतला मोठा वाटा अशा विविध विषयांत गुरफटले असून एकमेकांवर मात करण्याच्या या शर्यतीत हे लोक, यावेळी एकसंध असलेल्या महायुतीशी कसे काय दोन हात करतील, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

एकीकडे मुख्यमंत्रिपदासाठी कुठलाही वाद नसलेली, कोणीही हपापला नसलेली, जागावाटपाबाबत स्पष्टता असलेली आणि अत्यंत गोडीगुलाबीत जागा वाटप करून एकसंधपणे, एकदम ताकदीने, मजबुतीने महायुती निवडणुकीला सामोरे जात आहे. त्यासोबतच आतापर्यंत गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या पायाभूत सुविधा आणि अंमलात आलेल्या लोकाभिमुख कल्याणकारी योजना याचा एकत्रित परिणाम महायुतीच्या सध्याच्या सरकारला चांगला फळणार असल्याची चिन्हे आहेत. पुण्याच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंट तसेच दिल्लीच्या लोकनीती सेंटर फॉर स्टडी यांनी नुकत्याच केलेल्या मतदानपूर्व सर्व्हेत ही माहिती पुढे आली आहे. या सर्वेक्षणाचा मथितार्थ पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, राज्यातल्या सत्ताधारी महायुती विरोधात असलेल्या महाविकास आघाडीपेक्षा कांकणभर तरी सरसच आहे.

या दोन्ही संस्थांनी २१ सप्टेंबर २०२४ ते ६ ऑक्टोबर २०२४ या काळात हा सर्व्हे केला. या दोन्ही संस्था रिसर्च क्षेत्रात मातब्बर मानल्या जातात. या संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रातिनिधिक स्वरूपात ३९ विधानसभा मतदारसंघातील २ हजार ६०७ मतदारांचा कौल घेतला. मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका देऊन हा कौल घेण्यात आला. त्यामध्ये महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुती सरकारला मतदारांची थोडी जास्तच पसंती असल्याचे आढळून आले आहे.

निवडणुकीआधी झालेल्या या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वातील महायुतीच्या पायाभूत सुविधा आणि कल्याणकारी योजना यांना अधिक सार्वजनिक मान्यता मिळाली आहे. त्याचा फायदा महायुतीला निश्चितच होईल. सार्वजनिक वाहतूक, विजेचे क्षेत्र, वीजपुरवठा, पाणीपुरवठा आणि स्वच्छता या क्षेत्रात लक्षणीय सुधारणा झाल्याचे या सर्व्हेत आढळून आले आहे. सध्याच्या सरकारला तारून नेणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पायाभूत सुविधांचा विकास. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारणे, रस्त्यांचे जाळे उभारणे आणि परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे सरकारचे प्रयत्न लोकांना आवडलेले आहेत. हे उपक्रम केवळ शहरी भागांपुरते मर्यादित नसून ग्रामीण भागांतही यांचा प्रभाव दिसून येत आहे. आरोग्यसेवा, शिक्षण यासारख्या अत्यंत आवश्यक असलेल्या क्षेत्रात सरकारने चांगल्या प्रकारे काम केल्याचे मतही लोकांमधून दिसून येत आहे. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांमध्ये होत असलेली गुंतवणूक यासाठी सरकारला उपयोगी पडत आहे.

केंद्र तसेच राज्य सरकारच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम या सरकारने केले आहे. काही योजना पूर्वीही होत्या. परंतु, त्या लोकांपर्यंत पोहोचत नव्हत्या. मात्र, या सरकारच्या धोरणामुळे आता योजना जनतेपर्यंत, घराघरांत पोहोचल्या आहेत, ही या सरकारची अत्यंत जमेची बाजू आहे. या सर्व्हेमध्ये असे आढळून आले आहे की, आयुष्मान भारत ही केंद्र सरकारची योजना ७३ टक्के लोकांना माहीत आहे. ३५ टक्के लोकांना याचा फायदाही झाला आहे. उज्ज्वला योजनाबद्दलही ६९ टक्के लोकांना माहिती होती. ४५ टक्के लोकांना याचा लाभ मिळाला आहे. या दोन्ही योजना केंद्र सरकारच्या आहेत. राज्य सरकारने हाती घेतलेली लाडकी बहीण योजना ८० टक्के लोकांना माहीत आहे. त्यातील ७१ टक्के महिलांना याचा लाभ मिळाला आहे. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ३३ टक्के लोकांना माहीत आहे तर त्याचा २९ टक्के लोकांनी फायदा घेतला आहे, असे या सर्व्हेत दिसून आले आहे.

महायुती सरकारने गेल्या काही महिन्यांपासून हाती घेतलेल्या विविध कल्याणकारी योजनांना मतदारांची पसंती मिळाली आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना अनेकांना भावली आहे. दोन कोटींहून अधिक महिलांनी याचा लाभ घेतला आहे. त्याचप्रमाणे वंचित वर्गातल्या कुटुंबांना वर्षाला तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याची योजनाही महिलांना, खासकरून ग्रामीण भागातल्या महिलांना फायद्याची ठरत आहे. त्यामुळे त्यांचे राहणीमान सुधारण्यावर आणि सामाजिक समानतेला चालना देण्यावर लक्ष केंद्रित होत असल्याचे मत अनेकांनी नोंदवले आहे. अनुसूचित जाती आणि जमाती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांमधल्या असुरक्षित घटकांना लक्ष्य करणाऱ्या या योजनांमुळे जनतेत समाधान व्यक्त होत आहे. राज्यातल्या पायाभूत सुविधा असोत वा विविध कल्याणकारी योजना असोत, त्या पाहिल्या तर त्यावर पाच वर्षांची अखंडित टर्म पूर्ण करणारे माजी मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदर्शीपणाची तसेच त्यांच्या शासनकाळाची छाप नक्कीच दिसून येते.

महाराष्ट्रातल्या निवडणुकांची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. येत्या २० नोव्हेंबरला प्रत्यक्ष मतदान होणार आहे. अशावेळी मतदारांकडून अडीच वर्षे चाललेले महाविकास आघाडीचे सरकार आणि सध्याचे महायुतीचे सरकार यांची तुलना केली जात आहे. महायुतीमध्ये मुख्यमंत्री पदाचा अनुभव असलेले आणि पाच वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळलेले देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री आहेत. महायुतीतील शिवसेना तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला एकत्रित ठेवण्यात मुख्य समन्वयकाची भूमिका ते बजावत आहेत. ते सगळी समीकरणं जुळवून आणतात, अशी त्यांची ख्याती आहे. त्यामुळे महायुतीचे सरकार पुन्हा स्थापन झाले तर सर्वात मोठा पक्ष ठरणाऱ्या भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्रिपदाचे प्रबळ दावेदार असतील, यात शंका नाही.

हे सर्वेक्षण त्यावेळी झाले जेव्हा हरयाणात महायुतीतील प्रमुख घटक पक्ष भारतीय जनता पार्टी तसेच महाविकास आघाडीतला प्रमुख घटक पक्ष काँग्रेस विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जात होते. त्या काळात प्रसिद्ध झालेल्या सर्वच एक्झिट पोलमध्ये तेथील सत्ताधारी भाजपा सत्तेबाहेर होईल आणि काँग्रेस सत्तेत येईल असेच भाकीत वर्तविण्यात आले होते. हरयाणाच्या पोलचा प्रभाव महाराष्ट्रावरही पडला होता. त्यामुळे हरयाणासोबत महाराष्ट्रातही सत्ताबदल होणार, अशी अटकळ बांधली जात होती. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला राज्यात मिळालेले यश याला कारणीभूत होते. किंबहुना विरोधी पक्ष आपण आता सत्तेतच राहणार असल्याच्या थाटात वावरू लागला. प्रत्यक्षात मात्र हरयाणात काँग्रेस सत्तेपर्यंत पोहोचू शकली नाही आणि भाजपाने सलग तिसऱ्यांदा हरयाणात सत्ता स्थापन केली. त्यामुळे विरोधकांचे अवसान पुरते गळून पडले. अशातच हा सर्व्हे आल्याने महायुतीच्या नेत्यांना निश्चितच बळ मिळेल आणि मविआ नेत्यांचे मनोबल खच्ची होईल, यात शंका नाही. ▮

९२७०३३३८८६

---

## वेध

**अभिजित लिखिते**

# प्रत्युत्तराचा धोका

मागील काही काळापासून सुरक्षा दलांचा नक्षलवाद्यांवर मोठ्या प्रमाणात दबाव वाढला आहे. छत्तीसगड आणि महाराष्ट्रात त्यांना डोके वर काढण्याची संधी मिळणे दुरापास्त झाले. अलिकडेच गडचिरोली पोलिस आणि सीआरपीएएफच्या संयुक्त पथकाने महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील अबुझमाड येथे पाच नक्षल्यांचा खात्मा केला. या चकमकींमुळे सुरक्षा दलाचा विश्वास वाढत आहे, तर नक्षलवादी चळवळ कधी नव्हे इतकी दबावात आली आहे. एका पाठोपाठ मोठे नेते व साथीदारांच्या मृत्यूमुळे घटणारे मनुष्यबळ, जंगलांमधील वनवासींमध्ये कमी होत असलेली दहशत, त्याचा खंडणीवर होणारा परिणाम हे एकूणच नक्षल चळवळीसाठी अत्यंत घातक ठरत आहे. जंगलात सुरक्षा दलांचे जड ठरत असलेले पारडे नक्षल चळवळीच्या मुळावर उठल्याप्रमाणे आहे. सुरक्षा दल व नक्षलवाद्यांच्या चकमकींचा इतिहास पाहता, नेमका इथेच प्रत्युत्तराचा धोका निर्माण झाला आहे. ज्यावेळी कोणत्याही एका पक्षावर मोठ्या प्रमाणात दबाव निर्माण होतो, त्यावेळी तो पक्ष शांत राहतो. गमावलेली शक्ती मिळविण्याच्या प्रयत्नात असतो. अंतर्गत तयारी सुरू असते. वरकरणी शांतता दाखवली जाते. कोणत्याही प्रकारची आक्रमकता दाखवली जात नाही. त्यानंतर अचानक सर्व दबाव झुगारून दिला जातो अन् मोठा हल्ला केला जातो. हा अत्यंत भीषण आणि क्रूर हल्ला असतो. यामागील उद्देश पुन्हा वर्चस्व स्थापन करण्याचा असतो. अलिकडच्या काळातील घडामोडी पाहिल्यास, तसा धोका निर्माण झाल्याचे दिसत आहे. अर्थात् सरकारी पातळीवरून सर्वच प्रकारांची सतर्कता बाळगली गेली, तर हा धोका कमी होऊ शकतो.



२०२१ मध्ये माओवादी नेता मिलिंद तेलतुंबडेसह २६ जणांचा खात्मा गडचिरोलीत करण्यात आला. तेव्हापासून नक्षलवादी सातत्याने बचावात्मक पावित्र्यात आले आहेत. त्यानंतर चकमकींमध्ये मोठ्या प्रमाणात त्यांची हानी झाली. सुरक्षा दल अत्यंत सजगपणे, चपळाईने आणि आक्रमकपणे परिस्थिती हाताळत असल्याने माओवाद्यांना काही प्रमाणात नमते घ्यावे लागत आहे. सुरक्षा दलाचा दबाव सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. महाराष्ट्र आणि छत्तीसगडमध्ये नक्षलविरोधी मोहिमा दणक्यात सुरू आहेत. पण, त्या तुलनेत झारखंड आणि ओडिशातील नक्षलप्रभावी भागात नक्षलवादी कारवाया दिसत नाहीत. तिथे अचानक शांतता पसरली आहे. ही शांतता धोक्याची ठरू शकते. याआधी २०१९ मध्ये महाराष्ट्रात अशीच शांतता निर्माण झाली होती. दुर्दैवाने ती वादळापूर्वीची शांतता होती. कुरखेडा येथे नक्षलवाद्यांनी अत्यंत क्रूर आणि भीषण हल्ला घडवून आणला होता. त्यांची ही कार्यपद्धती निश्चितच नवीन नाही. प्रत्युत्तराचा हा धोका कुठेही असू शकतो. तो महाराष्ट्रातही होऊ शकतो किंवा छत्तीसगडमध्येही. अगदी झारखंड आणि काही प्रमाणात थंडावलेल्या ओडिशातही मोठा हल्ला होऊ शकतो. अशा प्रकारचा हल्ला होईलच, असे नाही. पण, सर्व शक्यता लक्षात घेऊन सज्जता ठेवण्याची गरज आहे. नक्षलवादाविरोधातील लढाई निश्चितच सहजसोपी नाही. यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. मागील पाच वर्षांत नक्षलप्रभावी राज्यांमध्ये सुरक्षेसाठी जवळपास १६८५ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला. हा आकडा निश्चित लहान नाही. भारतातील माओवादी चळवळ मोठ्या प्रमाणात सामाजिक-आर्थिक परिस्थितीत खोलवर रुजलेली आहे. माओवादी संघर्षाचे अत्यंत गंभीर आर्थिक परिणाम समाज तसेच देशावर होत आहे. माओवाद्यांमुळे वनवासींची वनउपज धोक्यात येते. हा अनुभव छत्तीसगड, झारखंडमध्ये आला आहे. माओवाद्यांमुळे सामाजिक, आर्थिक धोका निर्माण झाला आहे. तो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात आहे. नक्षलवाद्यांमुळे तशीही सामाजिक वीण उसवली गेली आहे तसेच ग्रामीण भागातील अर्थकारणालाही त्यांच्याकडून धोका आहे. या सर्व धोक्यांवर मात करायची असल्यास नक्षलवाद्यांवर अंकुश ठेवणे आवश्यक आहे. सुरक्षा दलाच्या वाढत्या दबावाचा सूड ते सामान्य वनवासींवरही घेऊ शकतात. त्यांना लक्ष्य केले जाऊ शकते. पण, सुरक्षा दलांची सज्जता, समर्पण असल्यास हा धोका उद्भवणार नाही, हे निश्चित ▮

९०२८५५१४१

---

### पणतीनेच प्रकाशमय होते दिवाळी!

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा, आसमंत उजळून टाकण्याचा सण. अंधकाररूपी दुःख, काळजी, उद्वेग दूर सारून सौख्याचा, भरभराटीचा, चैतन्य पसरवणारा हा सण. प्रत्येक घरात आनंदाने तयारी सुरू होते. निरनिराळ्या वस्तूंची खरेदी केली जाते. लायटिंग, आकाशदिवे, मेणबत्त्या, प्लॅस्टिक दिवे अशा अनेक वस्तू आपण आवडीने खरेदी करतो. आकर्षित वाटल्या तरी त्या विदेशी आणि असात्त्विक आहेत, हे आपल्या लक्षात येत नाही. सात्त्विक आणि स्वदेशी वस्तूची खरेदी करायला हवी. प्लॅस्टिकच्या दिव्यांपेक्षा मातीच्या पणत्या, सात्त्विक आकाश कंदील, स्वदेशी वस्तू खरेदी करायला हव्या. स्वदेशी वस्तू खरेदी केल्याने गरीब बांधवांना मदत होईल. झगमग चायनिज लायटिंगमुळे नेत्रदोष उद्भवू शकतात. हलाल प्रमाणित उत्पादने नाकारून राष्ट्राची आर्थिक हानी होण्यास राष्ट्राला वाचवू या. तेल आणि तुपाचे दिवे लावून विजेचा अनावश्यक वापर टाळू या. तुपाच्या आणि तेलाच्या प्रत्येक दिव्यामागे सकारात्मकता असते. ते मांगल्याचे प्रतीक आहे. मंद, शांत ठेवणाऱ्या पणतीच्या प्रकाशाने जी तृप्तता आणि प्रसन्नता मनाला जाणवते, ती लाईटच्या माळांच्या लखलखाटात जाणवत नाही. पणतीतील चैतन्य हे वेगळेच असते, तसे चैतन्य-प्रसन्नता लाईटच्या दीपमाळेत येणार नाही. एका पणतीच्या खरेदीमुळे दोन घरांची दिवाळी प्रकाशमय होईल.

**राधा पिंपळापुरे**/उमरेड

●● ●●

## वाचक पत्रे

### व्हायरस आणि स्कॅनिंग

मंत्र-जप यांनी काय साध्य होते? घडणारे घडतच राहील त्यासाठी पूजा, जप यांची काय गरज आहे, हा सध्याच्या पिढीचा असलेला अनाकलनीय प्रश्न सोडविण्याआधी नवीन पिढीला तरी उत्तर देता येईल का? की, त्यांनी कॉम्प्युटरचे अँटी व्हायरस प्रोग्रामिंग किती समजून घेतले आहेत? ऑनलाईन काम करताना जसा स्ट्राँग अँटी लागतो तसाच शरीरालासुद्धा फॉर्मेट करावे लागते; पण मन फार्मेट कसे करणार? यासाठीच मंत्र, जप, पूजा, पाठ यांचे स्कॅनिंग जर सातत्याने केले गेले तर व्हायरस निघून जातात आणि मन शुद्ध होते. समस्या, अडचणी, आजार निघून जातात. हिंदूंच्या भविष्याचा निर्णय मुस्लिमांनी घेण्याची वेळ येऊ नये म्हणूनच हिंदूंनी जास्तीत हिंदू विचारांना मतदान करून अविचाराचा व्हायरस डोक्यातून काढावा आणि हिंदुशक्तीला बळकट करून हिंदुस्थान हे जगातील महान राष्ट्र बनवावे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

### महत्त्व निर्णयशक्तीचे!

जीवन योग्य पद्धतीने जगण्यासाठी योग्य निर्णय घेण्याची खरी गरज असते. जन्माला कोणाच्या घरी यावे, आपले आई-बाबा कोण असावे, याचा निर्णय आपण घेऊ शकत नाही. परंतु जन्माला आल्यानंतर कोणत्या शाळेत मुलांनी प्रवेश घ्यावा? पुढे महाविद्यालयात कोणता अभ्यासक्रम घ्यावा, याचा निर्णय आपल्या आई-वडिलांना घ्यावा लागतो. यावर त्याचे पुढील जीवन आणि त्याचे वैभव अवलंबून असते. त्याचबरोबर आपला विकास, देशाच्या विकासावर अवलंबून असतो आणि देशाचा विकास, देशात, आपल्या राज्यात, कोणत्या पक्षाचे तसेच कोणत्या विचारसरणीचे सरकार आहे, यावर अवलंबून असतो. हे सरकार आपल्या मतावर अवलंबून असते. आपले मत हे आपल्या योग्य निर्णयशक्तीवर असते. विधानसभेची निवडणूक होत आहे. आपल्या समोर आपले आणि येणाऱ्या पिढीचे भविष्य कसे चांगले राहील, याची चिंता आहे. करिता आपल्या मतदार वर्गाच्या निर्णयशक्तीची खरी परीक्षा आहे. वाचाळवीर सरकारला निवडून द्यायचं की कार्यशील सरकारला निवडून द्यायचं? भारताची बदनामी करणाऱ्या राजकीय पक्षाचे सरकार स्थापन करावे की राष्ट्र विकासाचा विचार करणाऱ्या राजकीय पक्षाला निवडून द्यावे, याचा निर्णय सर्व मतदारांना घ्यावा लागणार आहे. हा निर्णय खूप विचार करून आपण आपल्या अनुभवानुसार घ्यायचा आहे. हा निर्णय चुकला तर आपले, आपल्या मुलांचे, देशाचे, राज्याचे भविष्य अंध:कारमय होऊ शकते. हा निर्णय आपले संस्कार कसे आहेत, यावरही अवलंबून आहे. या निवडणुकीमध्ये खरी परीक्षा मतदार वर्गाच्या योग्य निर्णयशक्तीचीच आहे, हे मात्र खरे!

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

●● ●●

### चंद्राबाबूंचा निर्णय अभिनंदनीय

सध्या देशात एका विशिष्ट समाजाची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत हिंदूंची लोकसंख्या वाढण्याऐवजी कमी होत आहे. या सर्व पृष्ठभूमीवर आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी एक नवीनच आदेश जारी केला आहे. प्रत्येक हिंदू दाम्पत्याला किमान चार मुले असावी, असा आदेश त्यांनी जारी केला असून या मुलांच्या पालन-पोषणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारून संपूर्ण सहकार्य करण्याची आश्वासन दिले आहे. असेच आदेश किंवा निर्णय सर्व राज्यांतील सरकारांनी घेतले तर निश्चितच हिंदू अल्पसंख्यक राहणार नाही. आपला देश वाचेल. भारत माता आनंदित होईल. या निर्णयाबाबत चंद्राबाबू नायडू यांचे अभिनंदन करायला हवे. ▮

**विभावरी नाईक**/९४२०८५५४७८

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# कोट्यावधींचा घोटाळा करणारा रामकृष्ण बांगर पकडला; सपोनि दराडेंची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

महात्मा फुले बँकेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणातील आरोपी रामकृष्ण मारोतराव बांगर यांना वाशिम येथून अटक करण्यात आली आहे. एस पी च्या आदेशावरून सपोनी बाळराजे दराडे यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

रामकृष्ण मारोतराव बांगर वय ७० वर्ष यांनी शैक्षणिक संस्था, दूध डेरी, महात्मा फुले अर्बन बँक यासारख्या संस्था स्थापन करून राजकारणात देखील आपली छाप उमटवली होती.मात्र आपल्या राजकीय हितसंबंधाचा वापर करून सहकारी संस्थांमध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला. त्यांचे वेगवेगळे कारनामे उजेडात येऊ लागले. महात्मा फुले अर्बन बँकेच्या माध्यमातून १४ कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचा गुन्हा देखील त्यांच्यासह ४१ जणांवर दाखल झाला होता.

गेल्या ३० ते ४० वर्षापासून अनभिषिक्त सम्राट बनलेल्या रामकृष्ण बांगर यांचे कुटुंब फरार झाले होते. रामकृष्ण बांगर यांच्यावर कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल आहे.



## एसपींच्या पथकाची कामगिरी

त्यांच्या पत्नी सत्यभामा बांगर यांना सपोनी बाळराजे दराडे यांनी सापळा रचून तुळजापूर येथे देवीचे दर्शन घेऊन घरी आलेल्या असताना मंगळवार दि. ८ ऑक्टोबर रोजी घरातून पकडले होते.

दरम्यान पोलीस अधीक्षकांनी दिलेल्या आदेशावरून सपोनी बाळराजे दराडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.उ.निरीक्षक महेश विघ्ने, पो.ह. दुबाले जायभाये यांना सोबत घेऊन मिळालेल्या माहितीवरून वाशीम येथे सापळा रचला. रामकृष्ण बांगर हॉटेल गुलाटी समोर आले असताना त्यांना जेरबंद करण्यात आले. पुढील कारवाईसाठी पाटोदा पोलीस ठाणे याच्या ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईमुळे खळबळ माजली आहे.

# भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

सर्वच पक्षात निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलले जातं असताना भाजपने मात्र दोन पिढ्यापासून पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी एकनिष्ठ असलेल्या देशमुख कुटुंबाला न्याय दिला आहे. भाजपचे सरचिटणीस शंकर देशमुख यांची जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### कोण आहेत शंकर देशमुख

शंकर अनंतराव देशमुख मु.पो.कडा ता.आष्टी जि.बीड हे पदवीधर असून त्यांनी यापूर्वी भाजपामध्ये आष्टी तालुकाध्यक्ष, बीड जिल्हा भाजपा सरचिटणीस, जिल्हा समन्वयक (बीड लोकसभा), २०२४ लोकसभा प्रभारी मध्यप्रदेश अशी विविध जबाबदाऱ्या संभाळल्या आहेत. वडिलांचे नाव अनंत कृष्णराव देशमुख, आईचे प्रेमलता अनंतराव देमशुख वडीलापासून अनंतराव कृष्णाराव देशमुख हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संलग्न आहेत. वडिलासोबत राममंदिर कार सेवेमध्ये शंकर देशमुख यांचा सहभाग. वाराणसी उत्तर प्रदेश येथे वेदशास्त्राचे शिक्षण. वडिलांना जेष्ठ नेते लालकृष्ण अडवणी, मुरलीमनोहर जोशी, अटलबिहारी वाजपेयी यांचा सहवास. महाराष्ट्रातील दिवंगत भाजपा नेते प्रमोदजी महाजन, गोपीनाथ मुंडे यांच्या सोबत भाजपा कार्यास सुरूवात. भाजपा नेते नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, पंकजा मुंडे यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांसोबत काम.

# बीडमध्ये शरद पवार गटाची उमेदवारी संदीप क्षीरसागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचा बीडचा उमेदवार अखेर ठरला असून पक्षाने बीडमधून पुन्हा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागरांनाच संधी दिली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये बीडच्या उमेदवारीवरुन मोठ्या प्रमाणावर रस्सीखेच सुरु होती. या पार्श्वभूमीवर शनिवारी उमेदवारांची दुसरी यादी पक्षाने जाहीर केली आहे. यात बीडमधून पक्षाचे जिल्हाध्यक्ष असलेले विद्यमान आमदार संदीप क्षीरसागरांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे. राष्ट्रवादी मधील फुटीच्या वेळी बीड जिल्ह्यातील संदीप क्षीरसागर हे एकमेव आमदार शरद पवारांसोबत ठामपणे राहिले होते. त्यांच्या या निष्ठेचे फळ म्हणून त्यांना ही उमेदवारी जाहीर झाली आहे.

बीड जिल्ह्यामध्ये लोकसभेची संदिप क्षीरसागर यांच्यावर सोपवलेली जबाबदारी यशस्वीपणे त्यांनी पार पाडली. बीड विधानसभा मतदार संघातून त्यांनी बजरंग सोनवणे यांना सर्वात जास्त लिड देऊन विजयी करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असल्याने पवारांनी त्यांना उमेदवारी देऊन निष्ठेचे फळ दिले आहे.

# इरा पब्लिक स्कुल चा संकल्प जितेंद्र दहिफळे ब्लॅकबेल्ट ने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ ऑक्टोबर**

गेवराई तालुक्यातील नामांकित इरा पब्लिक स्कुल चा पहिलीतील विद्यार्थी संकल्प जितेंद्र दहिफळे हा ब्लॅकबेल्ट मिळवणारा जिल्ह्यातील सर्वात लहान वयाचा विद्यार्थी ठरला, युनायटेड शटकोन कराटे डु इंडिया ने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक विद्यार्थी परीक्षेस बसले होते, या सर्वात संकल्प दहिफळे हा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असून त्याने या सर्व प्रकारात नाविन्यपूर्ण अशी कामगिरी करून दाखवली,या बाल चिमुकल्याचे जिल्ह्यातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे,त्याच्या या कामगिरीची दखल घेवून इरा पब्लिक स्कुल चे संस्थापक अध्यक्ष गणेश क्षीरसागर, सचिव श्रीमती वर्षा क्षीरसागर, प्राचार्या अश्विनी कुलकर्णी, वर्ग शिक्षीका रेखा काळे,यांनी संकल्प चा शाळेच्या वतीने यथोचित सत्कार केला,त्याच्या या यशात जिल्हा मार्गदर्शक नितिन पवार ,तालुका कोच अमित कानडे यांनी अथक परिश्रम घेतले,संकल्प हा गेवराई तालुका शिक्षक पतसंस्थेचे युवा संचालक जितेंद्र दहिफळे यांचा लहान चिरंजीव आहे,शिक्षण क्षेत्रातील ही सर्व मान्यवरांनी त्याच्या यशाचे कौतुक केले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा सुमितकुमार भारस्कर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत देशात द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२६ ऑक्टोबर**

मेरठ उत्तरप्रदेश येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा सुमितकुमार लक्ष्मण भारस्कर हा विद्यार्थी देशात द्वितीय आला असून, रौप्य पदकाचा मानकरी ठरला आहे.सुमितकुमार ने महाराष्ट्राला रौप्य पदक मिळवून दिले आहे गेली अनेक वर्ष सुमितकुमार सातत्याने कुस्तीचा सराव करत आहे. त्याने राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे



या खेळाडुला क्रीडा शिक्षक प्रा.प्रविण कोरडे . प्रा नवनाथ आवारे प्रा. सुखदेव माने. प्रा डॉ. सी. डी. फड यांचे मार्गदर्शन लाभले.

सुमितकुमारच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. अलझेंडे सर, प्रा. टाक ,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे, प्रा.सुदर्शन स्वामी,एकनाथ मस्के यांनी अभिनंदन केले.

# अंबाजोगाईमध्ये पेशवा प्रतिष्ठानच्या विविध वस्तू प्रदर्शनाला प्रतिसाद

## दीपावलीनिमित्त आयोजन : प्रदर्शनास मान्यवरांसह नागरिकांची भेट

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२६ ऑक्टोबर**

दीपावली सणानिमित्त पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित उद्योग आरंभ वस्तू विक्री प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. दीनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवस्कर, उद्योजक अमोल जड, राहुल देशपांडे, रेखा जोशी, वैजयंती टाकळकर, डॉ. महेश अकोलकर, राहुल कुलकर्णी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

याप्रसंगी व्यवसायाची निवडलेली पायवाट ही महामार्गात रूपांतरित होण्यासाठी समाजातील व्यावसायिकांना अथक परिश्रमाची गरज असून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत त्याच बरोबर संयम आणि गुणवत्ता यातूनच भरभराट निश्चित होते असे मत उपस्थित पाहुण्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक प्रणिता पोखरीकर यांनी केले तर संचालन अनिता औटी यांनी केले. आभार प्रतीक्षा जोशी यांनी मानले.या प्रदर्शनात विविध सजावटीचे साहित्य, सौंदर्य प्रसाधने, ज्वेलरी, आरोग्यविषयक प्रोडक्ट, साडी व कपडे तसेच घरगुती तयार केलेले विविध वस्तू व पदार्थ याचे स्टॉल लावण्यात आले होते. प्रदर्शनासाठी सहकार्य करणाऱ्यांचे संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

विक्री प्रदर्शनास अनेक मान्यवरांसह अंदाजे ५ हजार ग्राहकांनी भेटी दिल्या.

वस्तूविक्री प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी प्रमुख पदाधिकारी डॉ संकेत तोरंबेकर, शिरीष हिरळकर, विवेक बाभुळगावकर , श्रीकांत जोशी,अक्षय देशमुख ,आदित्य राखे, केदार दामोषन, गौरव कुलकर्णी, ड वैजनाथ वांजरखेडे, गोविंद जोशी,दीपक कुलकर्णी, अध्यक्षा कल्याणी कुलकर्णी, श्रीया जोशी, शुभांगी पत्की, मनीषा कुलकर्णी, ममता दीक्षित, वैशाली पांडे, रोहिणी जड,ज्योत्स्ना लाटकर ,वर्षा मिरगे, राजश्री पिंपळे, मयुरी तोरंबेकर, अपर्णा भालेराव, राजश्री देशमुख, रोहिणी राखे, स्वरुपा कुलकर्णी,गायत्री राडीकर यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



स्वा सावरकर प्राथमिक विद्यालयात सत्रांत अखेर बैठक घेण्यात आली.यावेळी बैठकीसाठी अध्यक्ष म्हणून स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ श्री पी के कुलकर्णी सर, शालेय समिती अध्यक्ष मा श्री एस एन कुलकर्णी सर,शालेय समिती सदस्स मा झरीकर सर, मुख्याध्यापक जोशी सर मंचावर उपस्थित होते.यावेळी सर्व विभागाचे क्रमशः वाचन करण्यात आले.यावेळी नवनिर्वाचित शिक्षक प्रतिनिधी श्री सचिन बारगजे सर तसेच शालेय समितीवर श्री रवींद्र नागरगोजे सर यांची नियुक्ती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी मार्गदर्शन करून दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.बैठकीचे सूत्रसंचालन श्रीमती खंबायते ताई,पद्य नागरगोजे सर,प्रास्ताविक मुख्याध्यापक जोशी सर ,आभार विभाग प्रमूख श्री सानप सर यांनी मानले.बैठकीची सांगता कल्याणमंत्राने करण्यात आली.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात माय भारत ओरिएंटेशन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

बीड येथील येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व युवा कार्यक्रम एवं खेल मंत्रालय,भारत सरकार अंतर्गत माय भारत ओरिएंटेशन प्रोग्राम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रीती पोहेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी साठी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर उत्तम साळवे होते व प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेरगव्हाणकर होते. अध्यक्ष समारोपात उपप्राचार्य डॉक्टर साळवे म्हणाले माय भारत पोर्टल वर जाऊन आपली नोंदणी करावी व त्याचा फायदा आपल्या



करिअरसाठी करून घ्यावा. डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले माय भारत पोर्टल वरती कम्युनिकेशन स्किल, लैंग्वेज स्किल सायबर सेक्युरिटी, असे अनेक कोर्स उपलब्ध असून हे कोर्स शिकण्यासाठी माय भारत पोर्टलवर युथ म्हणून नोंदणी करावी. यानंतर कार्यक्रम अधिकारी प्रा. संजय काळे यांनी टेक्निकल सेशन घेतले त्यांच्या टेक्निकल सेशनमध्ये सी व्ही. बिल्डर टूल, एक्सपरिमेंतल लर्निंग, युथ प्रोफाइल क्रिएशन या सर्व माय भारत पोर्टलच्या वैशिष्ट्याची माहिती सांगितली आतापर्यंत सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या १११ स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनींनी माय भारत पोर्टलवर नोंदणी केली असून माय भारत पोर्टल साठी सर्व स्वयंसेवक उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर संगीता ससाने यांनी केले व आभार प्राध्यापक डॉक्टर सुहास जोशी यांनी मानले, या कार्यक्रमासाठी परीक्षा विभाग प्रमुख डॉ छत्रपती पांगरकर, डॉ देविदास नागरगोजे, डॉ स्वाती कुलकर्णी डॉ टी. पी. सोंडगे, आधी सहकारी प्राध्यापक. व सर्व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी- पवन कपाळे,अजय शिंदे गणेश जोशी, महेश जाधव अनंत चव्हाण, अजय राठोड, सिया बुंदले वृषाली कुलकर्णी, ऋतुजा कौशल्य, अंजली शिंदे, वैभवी गरुड,उपस्थित होते. गणेश जोशी, अंजली शिंदे अजय शिंदे व सिया बुंदले यांनी माय भारत पोर्टल चा वापर आम्ही करू अशी प्रतिक्रिया व्यक्त केली .

# स्वा.सावरकर शिशुवाटिकेमध्ये पाना फुलांचे तोरण तयार करणे व पणती सजवणे कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

दीपावली सणानिमित्त स्वा सावरकर शिशुवाटिकेमध्ये पाना फुलांचे तोरण तयार करणे व पणती सजवणे हा विशेष उपक्रम घेण्यात आला. यावेळी पालक व विद्यार्थी दोघांनी मिळून उस्फूर्तपणे उपक्रमात भाग घेतला. या उपक्रमासाठी मुख्याध्यापक प्रदीप जोशी सर यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले आपले सण उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करायला हवेत पण त्यासाठी लागणारे साहित्य आपण स्वतःच्या हातानी तयार करायला हवे. बाजारातून वस्तू विकत न आणता घरच्या घरी तयार करणे यामधून मिळणारा आनंद अद्वितीय असतो विद्यार्थ्यांनी आई-वडिलांना सर्व कामांमध्ये मदत केली पाहिजे असे सांगितले. या उपक्रमासाठी शिशुवाटिका प्रमुख श्री सचिन बारगजे सर, सहप्रमुख श्रीमती थीगळे ताई उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.या उपक्रमासाठी शिशुवाटिका अध्यक्ष श्रीमती जयश्री नेलवाडकर ताई ,मुख्याध्यापक श्री प्रदीप जोशी सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती पुराणिक ताई तसेच आभार श्रीमती धर्माधिकारी ताई यांनी मानले.

# आ.लक्ष्मण पवारांच्या प्रचारार्थ संपर्क कार्यालयात नियोजन बैठक

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२६ ऑक्टोबर**

मतदारसंघातील संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णांनच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत दहा वर्ष सेवा करण्याची संधी दिली त्या संधीचे आण्णांनी सोन करून मतदारसंघात गाव तिथे रस्ता करत दळणवळण सुकर केले तसेच अनेक गावांत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक बंधारे बांधून जलसिंचन करण्याचे काम केले आहे. तर गोरगरीब लोकांना आपल्या हाक्काचे राशन मिळावे म्हणून प्रशासकीयस्तरावर सातत्याने प्रयत्न करत राशन वितरण व्यवस्था सुरळीत करून आज मतदारसंघातील प्रत्येक कार्ड धारकांना हाक्काचे राशन मिळत आहे त्यामुळे जनतेने पुन्हा आग्रह करत आ.लक्ष्मण आण्णांना विधानसभा निवडणुकीत उभा केले आहे तरी आण्णांना निवडून आण्ण्यासाठी सर्व कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी बैठकी दरम्यान बोलतांना केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी तसेच निवडणूक जिंकण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या संपर्क कार्यालयात युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत आज २६ रोजी सकाळी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारसंघात दहा वर्षांत केलेले काम जनतेत पर्यंत गेले पाहिजे यासाठी



प्रत्येकांनी गावागावात चर्चा करून भविष्यातील उर्वरित विकास काम करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या विजयासाठी कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बैठकी दरम्यान केले आहे

यावेळी दादासाहेब गिरी,मधुकर वादे,ब्रम्हदेव धुरंधरे,संजय इगळे,कानगुडे आप्पासाहेब, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, विठ्ठल मोटे,मुन्ना शेठ, जुनेद बागवान, अनिल आप्पा शेट्टे, रशीद बागवान, सचिन वावरे,बद्दोदिन, पिटु साळवे, लक्ष्मण खरात, बाबा खरात, दशरथ पंडीत, करण जाधव, आदी उपस्थित होते.मतदारसंघात गेली काही दिवसा पासुन आ.लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नाही अशी घोषणा केली त्यानंतर मतदार संघातील जनते मोठ्या प्रमाणात चल बीचल निर्माण झाली तर अनेक कार्यक्रते पदाधिकारी यांनी उपोषणांचा निर्णय घेतला होता.त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांनी बैठक घेऊन सर्वाशी संवाद साधत आपली भुमीका व्यक्त केली होती त्यावर सर्वांनीच आण्णा तुम्ही निवडणूक लढवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली सर्वाच्या मताने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढणार असल्यांचे जाहीर केला त्यामुळे मतदारसंघातील जनतेसह कार्यक्रत्यांनी निर्णयांचे स्वागत केले आहे.

# कमरेला गावठी पिस्टल लावुन फिरणाऱ्याला अटक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२६ ऑक्टोबर**

पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी अवैध अग्निशस्त्र बाळगणारे इसमांची माहिती काढण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत. त्यावरुन स्था.गु.शा. पथक बीड शहरात पेट्रालिंग करीत असतांना पोलीस हवालदार मनोज वाघ यांना गुप्त बातमी मिळाली की, इसम नामे महादेव राज दोडके रा.सावतामाळी चौक याचेकडे पिस्टल असल्याची खात्री लायक बातमी मिळाली, तेव्हा श्री. उस्मान शेख पो.नि.स्थागुशा बीड यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले तेव्हा स्थागुशा पथक तात्काळ रवाना होवुन सदर इसमाचा शोध घेण्यात सुरवात केली असता सदर इसम सावता माळी चौक येथे एक इसम मिळुन आला त्याचे नाव महादेव



राजु दोडके वय ४० वर्षे रा.सावतामाळी चौक,बीड असे सांगितले त्याचे झडती घेतली असता त्याचे ताब्यात एक गावठी बनावटीची पिस्टल व दोन जिवंत काडतुस असा ४२,०००/- रु चा मुद्देमाल मिळुन आला आहे. सदर आरोपी विरुध्द पोह मनोज वाघ यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्याद वरुन दिनांक २५.१०.२०२४ रोजी पो.स्टे. बीड शहर येथे भारतीय शस् अधिनियम अन्वये गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली सफौ / तुळशिराम जगताप, पोह/ कैलास ठोंबरे, मनोज वाघ, भागवत शेलार, राहुल शिंदे, विकास वाघमारे, नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे यांनी केलीआहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# उध्दव ठाकरेंनी लोकसभेवेळी दिलेला शब्द फिरवला- भाऊराव पाटील गोरेगावकर

## हिंगोली विधानसभेत महाविकास आघाडीत बिघाडीचे संकेत

**आकाश कुलकर्णी**
**हिंगोली, २६ आक्टोबर**



लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे तथा उबाठा शिवसेनेचे नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रचारादरम्यान उबाठाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी संपर्क प्रमुख बबनराव थोरात यांच्या मोबाईलवरून माझ्याशी झालेल्या संवादात तुम्ही नागेश पाटील आष्टीकर यांचा प्रचारात साथ द्या, आम्ही हिंगोली विधानसभेत तुम्हाला काँग्रेसला जागा सोडू असा शब्द दिला होता. परंतु उध्दव ठाकरे यांनी हिंगोली विधानसभेची जागा उबाठा शिवसेनेकडे घेतली. उध्दव ठाकरे यांनी त्यांचा शब्द फिरवला मग एकनाथ शिंदे आणि उध्दव ठाकरे यांच्यात काय फरक आहे असा सवाल केला आहे. दरम्यान, कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव अपक्ष उमेदवारी लढणार असल्याचे संकेत त्यांनी यावेळी दंड थोपटून दिले.

हिंगोली जिल्ह्यातील एकमेव हिंगोली विधानसभा ही काँग्रेस पक्षाकडे आहे. परंतु शुक्रवारी संध्याकाळी उशिरा हिंगोली विधानसभेची जागा काँग्रेसकडून हिसकावून उबाठा शिवसेनेला देण्यात आली. उबाठा शिवसेनेकडून रूपाली पाटील गोरेगावकर यांना उमेदवारीही जाहीर करण्यात आली. त्यामुळे जिल्ह्यात काँग्रेसला एकही विधानसभा शिल्लक राहीली नाही. वसमत विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जयप्रकाश दांडेगावकर यांची उमेदवारी जाहीर झाली तर कळमनुरी विधानसभा मतदारसंघात उबाठा शिवसेनेचे डॉ संतोष टारफे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. तीनही मतदारसंघात काँग्रेसची चांगलीच कोंडी झाली आहे. मागील अनेक वर्षापासून हिंगोली विधानसभा मतदारसंघ काँग्रेसकडे आहे. परंतु २०१४ आणि २०२९ च्या निवडणुकीत भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी भाऊराव पाटील गोरेगावकर यांना पराभूत करीत हा बालेकिल्ला भाजपकडे कायम ठेवला आहे. परंतु गोरेगाकवरांनीही मुटकुळे यांचेसमोर कडवे आव्हान दिले होते.

यावेळी माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघात त्यांनाच उमेदवारी मिळणार या दृष्टीकोनातून मोर्चेबांधणी केली होती. परंतु अचानक शुक्रवारी हिंगोली विधानसभेची जागा उबाठा शिवसेनेला सोडण्यात आली असून रूपाली पाटील गोरेगावकर यांना उमेदवारीही जाहीर करण्यात आली आहे. हिंगोलीच्या बदल्यात शिवसेनेचे नांदेडमधील एक जागा काँग्रेसला दिल्याचे समजते.

दरम्यान, हिंगोली विधानसभा उबाठा शिवसेनेला सुटल्यानंतर माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांचे समर्थकांनी निवडणुकीसंदर्भात बैठक लावण्याचा आग्रह भाऊ पाटील यांच्याकडे केला. दि २६ आक्टोबर रोजी येथील शिवलीला पॅलेस येथे हिंगोली विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी समर्थकांनी माजी आ भाऊ पाटील गोरेगावकर यांना उमेदवारी न मिळाल्याने तसेच हिंगोली विधानसभा उबाठा शिवसेनेला सोडल्यामुळे प्रचंड संताप आणि नाराजी व्यक्त केली तसेच भाऊ पाटील गोरेगावकर यांना अपक्ष निवडणुक लढण्यासाठी आग्रह केला.

यावेळी भाऊराव पाटील गोरेगावकर यांनी उबाठा शिवसेनचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीवेळी दिलेला शब्द फिरवला असल्याचा आरोप करीत आपल्यामागे हिंगोली मतदारसंघातील जनता आहे. कार्यकर्ता आहे. कोणत्याही पक्षाची गरज नाही. वेळ पडल्यास हिंगोली विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढविण्याची तयारी असून दि २९ आक्टोबरला शक्ती प्रदर्शन करीत अपक्ष उमेदवारी भरण्याचे संकेत दिले आहेत.

दरम्यान, हिंगोली विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवारांच्या मुलाखती वेळी दोन गटात दोनवेळा पक्षनिरीक्षक आणि वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत हाणामारी तसेच गदारोळ झाला होता. अंतर्गत गटबाजीमुळे तसेच काँग्रेसच्या एका मोठ्या नेत्यामुळे ही जागा उबाठा शिवसेनेला सोडण्यात आली का? अशीही चर्चा रंगू लागली आहे.

# भाजपच्या ग्रामीण भागातील बुथ प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक

## विकास कामे, कल्याणकारी योजनांची माहीती द्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ आक्टोबर**



हिंगोली विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील भारतीय जनता पक्षाच्या बुथ प्रमुखांसह पदाधिकाऱ्यांची दि २६ आक्टोबर रोजी यमुना निवास येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षाच्या काळात झालेल्या विकास कामांची तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहीती जनतेपर्यंत पोहचवा असे आवाहन केले.

यावेळी महायुती, भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे, नारायण खेडकर, सखाराम मुटकुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करतांना जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे म्हणाले की, हिंगोली आणि सेनगाव भागात मागील दहा वर्षात तान्हाजीराव मुटकुळे यांनी रस्ते, वीज, सिंचन यांसह इतर विकास कामे केली आहेत. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहीती घरोघरी पोहचवा. गावातील बुथप्रमुखांनी त्यांचे बुथ सक्षम करण्यासाठी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, तरूण, तरूणी तसेच महिलांना सहभागी करून घ्यावे. भाजप सरकारने मागील दहा वर्षात प्रत्येक जिल्ह्यात, राज्यात तसेच देशात मोठमोठी विकासांची कामे केली आहेत. यासंदर्भात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सखोल माहीती असणे गरजेचे आहे.

जिल्ह्यातील रस्ते, पूल, सिंचनाची कामे, वीज उपकेंद्र, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, सोलर पंप आदी योजना राबविण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून सरकार मदत करीत आहे. तसेच आर्थिक मदत सर्वात जास्त महायुतीच्या काळात करण्यात आली आहे.

यावेळी भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी कार्यकर्त्यांना संबोधीत करतांना सांगितले की, विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्यामुळे ते फेक नरेटीव्ह तयार करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना चोख उत्तर देण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहून निवडणुका होईपर्यंत दक्ष राहून भाजपला जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी घराघरापर्यंत जाऊन मतदान करून घेण्याचे आवाहन यावेळी शिंदेयांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील पदाधिकारी व कार्यकर्ते बैठकीला उपस्थित होते.

# रक्तदान आणि मतदान श्रेष्ठदान- डॉ विजय निलावार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ आक्टोबर**



भारतीय संस्कृतीत दानाचं महत्व अनन्य साधारण असून अन्नदान, नेत्रदान, अवयवदान, रक्तदान, सारखेच महत्त्व मतदानाला आहे. त्यामुळे पात्र मतदारांनी २० नोव्हेंबरला न चुकता मतदान करावे आणि इतरांकडूनही मतदान हक्काने करवून घ्यावे असे आवाहन हिंगोली विधान सभा मतदार संघाचे आयकॉन ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार यांनी केले.

यावेळी उपस्थितांनी हिंगोली विधान सभा मतदार संघात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आम्ही पण सज्ज असल्याच्या प्रतिक्रिया दिल्या.

आर्य वैश्य महासभा हिंगोली जिल्हा शाखेच्या वतीने महासभेच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटक म्हणून डॉ. निलावार यांची उपस्थिती होती. सदरील शिबिरात ४१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तपेढी प्रमुख डॉ.सौ.स्वाती गुंडेवार, जिल्हाध्यक्ष सचिन गुंडेवार, उद्योजक ज्ञानेश्वर मामडे, ॲड स्वप्नील गुंडेवार, आदीसह महिला पदाधिकारी उपस्थित होत्या. शिबिराचे यशस्वीतेसाठी जिल्हाध्यक्ष सचिन गुंडेवार, सचिव आशिष पिंगळकर, विकास काप्रतवार, संचित गुंडेवार, गिरीश बासटवार, बालरोग तज्ञ डॉ. वेंकटेश दमकोंडवार, होमिओ तज्ञ डॉ.गुंडेवार, डेंटल सर्जेन विक्रांत व्यवहारे, ॲड डूब्बेवार, डॉ. निलेश गुंडेवार आदींनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन संचित गुंडेवार यांनी मानले.

# शिरड शहापूर येथील शेतकऱ्याची हळद खरेदीतून १४.२३ लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ आक्टोबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथील शेतकऱ्याची हळद खरेदी करून १४.२३ लाख रूपयांची फसवणूक करणाऱ्या विदर्भातील यवतमाळच्या व्यापाऱ्याविरूध्द औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात शनिवार दि २६ आक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार यवतमाळ येथील व्यापारी शेख खुद्दुस शेख इब्राहीम हा व्यापार दि २४ आक्टोबर रोजी शिरडशहापूर येथे हभद खरेदीसाठी आला होता. त्याने शेतकरी शिवहार चटप आणि अन्य एका शेतकऱ्याशी संपर्क साधून हळद खरेदीसाठी आल्याचे सांगितले. त्यानुसार त्याने हळदीची पाहणी करून १३ हजार ३००रूपये क्विंटल दराने हळद खरेदी करण्याचे कबुल केले. त्यानुसार शेतकऱ्यांनी त्यास ११७ क्विंटल हळद विक्री केली. त्यानंतर व्यापारी शेख खुद्दुस याने सर्व हळद खरेदी करून एका ट्रकमध्ये भरून वसमतच्या हळद बाजारात विक्री केली. त्याठिकाणी मिळालेल्या १५.६६ लाख रूपयांपैकी त्याने शेतकऱ्यांना १.४३ लाख रूपये दिले. उर्वरीत रक्कम लगेच देतो असे सांगून लघुशंकेला गेला अन तेथून त्याने पळ काढला. शेतकऱ्यांनी त्याची बराच वेळ वाट पाहीली. परंतु तो आलाच नाही. भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता बंद येत होता. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शिवहार चटप यांनी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी शेख खुद्दुस शेख इब्राहीम याच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### वरूड गवळी येथे शाळकरी मुलीची आत्महत्या



हिंगोली- तालुक्यातील वरुड गवळी येथील रहिवासी रूपाली संजय मापारी वय वर्ष १६ येता दहावी मध्ये शिकत असणाऱ्या हिने आज २५ ऑक्टोंबर शुक्रवार रोजी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. रूपाली संजय मापारी ही येता दहावी वर्गात शिक्षण घेत होती. वरुड गवळी येथील रहिवासी असलेली रूपाली संजय मापारी ही सवड येथील खाजगी शाळेमध्ये शिक्षण घेत होती. तिने आज २५ ऑक्टोबर शुक्रवार रोजी प्रथम सत्रातील सराव परीक्षेचा पेपर देऊन ती घरी गेली आणि भावासोबत जेवण केल्यानंतर तिने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. आत्महत्या घडल्यानंतर तिचा मृतदेह हिंगोली येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. आत्महत्या का केली याचे कारण अद्यापही समजले नाही.

### विवाहीतेचा छळ, सात जणांवर गुन्हा दाखल

हिंगोली- सेनगाव येथील आरती पुनपाळे यांचा विवाह छत्रपती संभाजीनगर येथील अभिजीत पुनपाळे यांच्यासोबत झाला होता. विवाहानंतर काही दिवस चांगले वागविल्यानंतर सासरच्या मंडळींनी त्यांचा छळ सुरू केला होता. स्वयंपाक चांगला येत नाही यासह इतर कारणावरून उपाशी पोटी ठेवून मारहाण केली जात होती. तसेच सासरच्या मंडळींनी त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली होती. जुलै २०२३ पासून ते ता २७ जानेवारी २०२४ या कालावधीत त्यांचा छळ करण्यात आला. दरम्यान, सासरकडून होणारा छळ असह्य झाल्याने त्या माहेरी राहण्यासाठी आल्या होत्या. त्यांनी हिंगोलीच्या महिला दक्षता समितीमध्ये प्रकरण दाखल केले. दक्षता समितीने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून दोघांमध्ये समेट घडवून आणण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्यात तडजोड झाली नाही. त्यानंतर आरती यांनी शुक्रवार दि २५ आक्टोबर रोजी सेनगाव पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी अभिजीत पूनपाळे, सत्यनारायण पुनपाळे, अभिषेक पुनपाळे यांच्यासह अन्य चौघेजण यांच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. सेनगाव पोलिस ठाण्याचे पोनि संतोष तांबळे, जमादार सुभाष चव्हाण यांच्या पथकाने अधिक तपास सुरू केला आहे.

### दिवाळीनिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी

हिंगोली- दिवाळी सणानिमित्त येथील बाजारपेठ सजली असून विविध आकार आणि डिझाईनचे मातीचे दिवे, महालक्ष्मीच्या मूर्ती तसेच इलेक्ट्रीक लाईटींग, विविध आकाराचे आकर्षक आकाशदिवे विक्रीसाठी आले आहेत. खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे.

# राष्ट्रीय महामार्गाच्या निकृष्ट कामाचे पितळ पडले उघडे, महिनाभरापूर्वीच केले काम

**नवीन अहेमद**
**वसमत, २६ आक्टोबर**

नांदेड-परभणी महामार्ग रस्त्याचे काम मागील कित्येक वर्षापासून रखडले होते. सध्या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले परंतु सदरील राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचे पितळ उघडे पडले आहे. सदरील कामात कुठल्याही प्रकारचे डावेलबार, टयबार अर्थातच लोखंडी गजाळी न वापरता राष्ट्रीय महामार्गाचे काम थातुरमातुर अंधाराचा फायदा घेऊन करत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. सदरील बाबीकडे शासकीय अभियंता किंवा या संबंधित कन्सल्टंट अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत.

काम असलेल्या ठिकाणी कुठलीच सेफ्टी व रेडियम न वापरल्याने छोटे-मोठे अपघात होत आहे. विशेष म्हणजे काम करणारे कामगार देखील रेडियम असलेले जॉकेट घालत नसल्याने काम सुरू असल्याचे रात्री अंधारात वाहनधारकास दिसत नाही. यामुळे अपघात होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही एवढ्या मोठ्या राष्ट्रीय महामार्गाच्या काम करणाऱ्या कंपनीचा गलथान कारभार पहावयास मिळत आहे. याकडे मात्र संबंधित विभागाचे अधिकारी गप्पच आहेत. काँक्रीटचा दर्जाच निकष्ट असेल तर रस्ता मजबूत होण्याची अपेक्षा ठेवणे चुकीची आहे. या सर्व प्रकारामुळे महिन्यातच जैसे थे परिस्थिती होणार आहे. काँक्रेट केलेल्या रोडवरती कुठल्याच प्रकारची वॉटरिंग होत नसल्याने तयार करण्यात आलेल्या रोडवरती तडे जात आहेत. शासनाचा कोट्यावधी रुपये निधी पाण्यात जात असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. आता याकडे संबंधित विभागाने लक्ष देऊन झालेल्या कामाचे चाचण्या घेऊन निकष्ट काम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करून काळ्या यादीत टाकण्याची मागणी होत आहे.

> नांदेड-परभणी महामार्ग कामाचे पितळ हे उघडे पडले काँक्रेट हे निकष्ट दर्जाचे प्लांट मधून येत असल्याने तयार करण्यात आलेल्या रस्त्याला तडे जात आहे. काँक्रेट वरती कुठल्याच प्रकारचे निडल व्हायब्रेटर, स्क्रीड व्हायब्रेटरचा वापर होत नसून थेट प्लांट मधून आलेले काँक्रीट ओतून जात असल्याचे पहावयास मिळत आहेत. टायबार, डावेलबार नसलेला रस्ता टिकणार कसा, एवढी मोठी चोरी गुत्तेदाराची शासकीय अभियंता धरून होणारे निकृष्ट काम थांबेल का? यावर कारवाई करेल का? हे पाहणे गरजेचे आहे. महामार्गाचे कामाचा दर्जा सुधारणे गरजेचे आहे.

# जिल्ह्यात जनजागृती रथ करणार मतदारांमध्ये मतदानासाठी जागृती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ आक्टोबर**




जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीतमतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी स्वीप पथकाच्या माध्यमातून मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने 'मतदान जनजागृती रथा'च्या माध्यमातून कमी मतदान झालेल्या मतदान केंद्रावर विविध प्रकारचे संदेश देत मतदान जनजागृती करण्यात येत आहे. या रथाला हिरवी झेंडी दाखवून जिल्हा नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के आणि प्रशांत दिग्रसकर यांनी मोहिमेवर रवाना केले.

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये हिंगोली लोकसभा मतदार संघात झालेल्या मतदानामध्ये वृद्धी करण्यासाठी हे जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. हिंगोली जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढावी; या सार्वत्रिक निवडणुकीत किमान ७५ टक्के मतदान व्हावे, असा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिनव गोयल यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे या निवडणुकीत जिल्ह्यातील ५ लक्ष ९ हजार १७ पुरुष आणि महिला ४ लक्ष ७२ हजार ४०३ मतदार असे एकूण ९ लक्ष ८१ हजार ४३० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही या जनजागृती रथाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

याप्रसंगी तालुका नोडल अधिकारी नितीन नेटके, जिल्हा स्वीपचे सदस्य विजय बांगर, बालाजी काळे, कोकरे तसेच ९४-हिंगोली विधानसभा स्वीप सदस्य संजय मेथेकर, विनोद चव्हाण, सुदर्शन सोईतकर, माणिक ढोकळे, राजकुमार मोरगे आणि श्याम स्वामी तसेच पंचायत समिती हिंगोली आणि जिल्हा परिषद हिंगोली येथील कर्मचारी उपस्थित होते.

# भाजप पदाधिकाऱ्यांकडून विकास कामांच्या पत्रकांचे व्यापाऱ्यांना शहरात वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २६ आक्टोबर**





हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी मागील दहा वर्षात केलेल्या विकास कामांच्या पुस्तिकेचे वाटप शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी बाजारपेठेतील प्रत्येक व्यापाऱ्यांना देत तान्हाजीराव मुटकुळे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन केले.

हिंगोली शहरातील व्यापारी वर्गाला हिंगोली विधानसभेचे महायुतीचे भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी गेल्या दहा वर्षात केलेल्या विकास कामांचे पुस्तिकेचे वाटप करून पुनश्च त्यांना निवडून देण्यासाठी प्रचार यंत्रणा राबविण्यात येत आहे. शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी शुक्रवारी सकाळपासूनच शहरातील महावीर चौक, सदर बाजार, गांधी चौक, जवाहन रोड, अंबिका टॉकीज रोड, रेल्वे स्थानक रोड, इंदिरा गांधी चौक, भाजीमंडई आदी भागात फिरून प्रत्येक व्यापारी, नागरिक यांची भेट घेत त्यांना दहा वर्षातील हिंगोली शहरासह विधानसभेतील केलेल्या विकासकामांची माहीती पुस्तिकेचे वाटप केले. यामध्ये महिला आघाडीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचाही समावेश होता. यावेळी संजय ढोके, बाबा घुगे, संजय खंडेलवाल, दिलीप शर्मा, पिंटू जाधव, श्याम भाऊ खंडेलवाल, दिनेश बगडिया, सुभाष मुदीराज,गणेश सोळंके, उत्तम जाधव, नागेश बांगर, इशा मामू आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळेस या सर्व कार्यकर्त्यांना व्यापाऱ्यांनी निश्चितच मुटकुळे यांनी केलेल्या विकास कार्यानुसार त्यांच्याशिवाय योग्य उमेदवारच नसल्याचे सांगितले त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला. शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा यांच्या मार्गदर्शनानुसार प्रभाग क्रमांक एक आदर्श कॉलेज, आदर्श कॉलनी जिजामाता नगर भागात हिंगोली शहर महिला मोर्चा भाजपाच्यावतीने शहराध्यक्ष सौअलका लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली प्रचार करण्यात आला. यावेळेस त्यांच्यासोबत आशिष जयस्वाल, सुधीर पोपलाईतकर, सविता गुठ्ठे, बेबीताई श्रावने, सुमन थोरात, मांदळे काकू, अनिता राटणालू, कमल करवंदे, वंदना पाईकराव, अनिता वानखेडे, अनुसूयाताई, कोमल ढोरे, मंदाताई मांदळे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पडतीचे पाय डोहाकडे!

## सुरूवातीलाच मविआचे उमेदवार उबाठा सेनेचे ए.जे.बोराडेंनी सुरू केले रंग दाखवायला?

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची धुमधडाका सुरू असुन परतुर-मंठा विधानसभेसाठी भाजपाने माजीमंत्री तथा आ.बबनराव लोणीकर यांना उमेदवारी जाहिर केली असुन त्यांच्याविरोधात महाविकास आघाडीने शिवसेना उबाठाचे ए.जे.बोराडे यांना उमेदवारी जाहिर केले असुन २८ ऑक्टोंबर ला ते निवडणुकीचा अर्ज दाखल करणार असुन त्यांचा कॉन्फिडस सुरूवातीलाच एवढा वाढला असुन महाविकास आघाडीच्या विधानसभा मतदार संघातील एकाही प्रमुख नेत्यांचे नाव किंवा फोटो नसलेले सोशल मिडीयावर बॅनर फिरत आहे, त्यामुळे तर पडतीचे पाय डोहाकडे दिसत असल्यामुळे सुरूवातीलाच उमेदवार ए.जे.बोराडे यांनी रंग दाखवायला सुरूवात केली आहे.




परतुर-मंठा विधानसभा मतदार संघाची निवडणुक चुरशीची होणार असल्याचे गेल्या काही महिन्यांपासुन बोलले जात होते परंतु महाविकास आघाडीने उबाठा शिवसेनेचे ए.जे.बोराडे यांनी उमेदवारी देऊन माजीमंत्री तथा आ.बबनराव लोणीकर यांचा विजय जवळपास आजच निश्चीत केल्याचे त्यांच्या उमेदवारीवरून दिसत आहे. गेल्या अनेक वर्षापासुन सानिध्यात गेलेले ए.जे.बोराडे मतदार संघात कोणाच्या संपर्कात तर नव्हतेच अन् कोणाचा सुखा:दुखात देखील सहभागी झाले नाहीत, त्यामुळे मतदार त्यांच्यावर अगोदरच नाराज होता, एकीकडे गेल्या दहा वर्षापासुन सुरेशकुमार जेथलिया हे कायम नागरीकांच्या संपर्कात असुन अडीअडचणीच्या वेळी ते पाठीमागे खंबीरपणे उभे राहिल्याने यंदा मविआ व महायुतीमध्ये मोठ्या चुरशीची निवडणुक होणार होती, परंतु ऐनवेळी काँग्रेसचे सुरेशकुमार जेथलिया प्रबळ दावेदार असतांना उबाठा शिवसेनेने आघाडीतून आपल्याकडे घेऊन बोराडे यांना उमेदवारी जाहिर केली. महायुतीकडून माजीमंत्री तथा आ.बबनराव लोणीकर आणि महाविकास आघाडीकडून माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांच्यात ही लढत झाली असती तर एकदम अटितटीची निवडणुक झाली असती परंतु बोराडेंना उमेदवारी देऊन लोणीकरांसाठी अगदी निवडणूक सोपी केली आहे. त्यातभर ए.जे.बोराडे यांचे सोशल मिडीयावर एक बॅनर व्हायरल होत असुन त्या बॅनरवर मतदार संघातील महाविकास आघाडीचे प्रमुख नेत्यांचे फोटो अथवा नाव नसल्याने पडतीचे पाय डोहहाकडेच दिसत आहे.


काँग्रेसचे नेते माजी आ.सुरेशकुमार जेथलिया यांनी मोठे शक्तीप्रदर्शन करत आज आपला मेळावा घेऊन एकप्रकारे लोणीकरांविरोधात दंड थोपाटल्याचे आजच्या शक्तीप्रदर्शनातुन दिसून आले. (छाया : केदार शर्मा)

## अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

याप्रसंगी सरपंच संदीप प्रभाकर क्षीरसागर, उपसरपंच अमोल आंबोरे, ग्रामपंचायत सदस्य गजानन क्षीरसागर, भगवान अंभोरे ल, रामदास क्षीरसागर, अशोक क्षीरसागर, नागेश क्षीरसागर, कृष्णा जाधव, परमेश्वर साबळे, भीमा वाहुळ, देवानंद वाहूळ, भागवंत क्षीरसागर, सोपान क्षीरसागर, संतोष क्षीरसागर, सदाशिव क्षीरसागर, प्रदीप क्षीरसागर, गोविंद क्षीरसागर, परमेश्वर क्षीरसागर, विनोद क्षीरसागर, किशोर परकाळे, गजानन मोडीती, संजय वाहुळ, गणेश भावले, अर्जुन क्षीरसागर, मोहन क्षीरसागर संदीप अंभोरे अंबादास गचके, भीमराव सावळे, ऋषिकेश क्षीरसागर, बालाजी क्षीरसागर, ज्ञानेश्वर क्षीरसागर, वैभव मस्के, राजेंद्र शेळके, किशोर क्षीरसागर, नागेश मुरलीधर क्षीरसागर, राजू क्षीरसागर, श्याम शेळके, दत्ता क्षीरसागर, रामा शिंदे, मधुकरराव क्षीरसागर, गणेश क्षीरसागर, गणेश आप्पासाहेब क्षीरसागर, अमोल रामदास क्षीरसागर, अभिषेक क्षीरसागर, श्रीनिवास क्षीरसागर गणेश राजेंद्र क्षीरसागर, अर्जुन भाले, शरद क्षीरसागर, आदींनी शिवसेनेत पक्ष प्रवेश केला .

# संक्षिप्त

## मसालाकिंग धनंजय दातार यांच्या तर्फे फुफ्फुस विकारग्रस्तांना प्राणवायू उपकरण संचांची भेट



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

करोनाची प्राणघातक साथ मानवजातीला खूप काही शिकवून गेली. शरीराचे तापमान, रक्तदाब, रक्तशर्करेचे प्रमाण, हृदयाचे ठोके याप्रमाणेच आजकाल श्वासोच्छवासातील प्राणवायूच्या (ऑक्सिजन) पातळीवर ही काटेकोर लक्ष ठेवणे गरजेचे बनले आहे. फुफ्फुसांच्या आजारांनी दुर्बळ रुग्णांसाठी शुद्ध प्राणवायूचा तत्काळ पुरवठा अत्यंत मोलाचा ठरत आहे आणि एका श्वासाची किंमत जगाला आता उमगू लागली आहे.

'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'च्या वतीने श्वसन संस्थेचे आरोग्य आणि प्राणवायूचे महत्त्व अधोरेखित करणारा एक कार्यक्रम नुकताच गोरेगावमध्ये आयोजित करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रमांना मदतीचा हात देणारे सुप्रसिद्ध उद्योजक मसालाकिंग धनंजय दातार या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. फुफ्फुसाच्या विकाराने ग्रस्त, परंतु आर्थिक असहाय्यतेमुळे प्राणवायू पुरवठा उपकरणे खरेदी न करु शकणाऱ्या ३ गरजू रुग्णांना दातार यांनी स्वखर्चाने असे उपकरण संच भेट दिले. प्रत्येक संचात घरात हवा तेव्हा प्राणवायू पुरवठा करणारे ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, घराबाहेर किंवा प्रवासात प्राणवायू पुरवणारे पोर्टेबल ऑक्सिजन मशीन व ऑक्सिमीटर या उपकरणांचा समावेश होता.

याप्रसंगी बोलताना धनंजय दातार म्हणाले, माझ्या आईच्या अखेरच्या दिवसांत ती फुफ्फुसाच्या आजाराने गलितगात्र झाली होती. श्वासोच्छवासासाठीची तिची धडपड मला बघवत नव्हती. आजही अशा आजारांनी ग्रस्त गरीब रुग्णांचे हाल मला अस्वस्थ करतात. करोना साथीच्या काळात तत्काळ प्राणवायू न मिळाल्याने अथवा वाहनाच्या अनुपलब्धतेमुळे रुग्णालयात वेळेवर पोचू न शकल्याने अनेक रुग्ण दगावले. त्यावर उपाय म्हणून मी व माझ्या समूहाने ऑक्सिजन सिलेंडरने सज्ज 'रिक्षा म्ब्युलन्स' या अभिनव उपक्रमाला आर्थिक पाठबळ पुरवले. गेल्या वर्षी आणि यंदा ही पैशाअभावी प्राणवायू उपकरणे खरेदी करु न शकणाऱ्या रुग्णांना आम्ही प्राणवायू संच भेट दिले आहेत आणि यापुढे ही गरीब गरजूंना अशीच मदत करत राहणार आहोत. फुफ्फुसाच्या आजारांनी ग्रस्त रुग्णांच्या पुनर्वसन कार्याचा दीर्घ अनुभव असणाऱ्या डॉ. पूर्वी देवानी यांनी सूत्रसंचालन केले. प्रास्ताविकात त्या म्हणाल्या, सकारात्मक दृष्टीकोन, योग्य उपचार, नियमित व्यायाम या जोरावर फुफ्फुसाच्या आजारांचे रुग्ण सर्वसाधारण आयुष्य जगू शकतात. आम्ही अशा रुग्णांचे समुपदेशन तथा यशस्वी पुनर्वसन करुन त्यांना आनंदी जीवन जगायला शिकवतो. 'प्रतिभा प्रभाकर पल्मोनरी रिहॅबिलीटेशन सेंटर'चे संस्थापक चालक डॉ. प्रल्हाद प्रभुदेसाई व त्यांच्या पत्नी वैशाली प्रभुदेसाई यांनी यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. डॉ. प्रभुदेसाई म्हणाले, आयुष्य आरोग्यपूर्ण घालवणे महत्त्वाचे असते आणि त्यासाठीच सर्वांनी आरोग्य, योग्य जीवनशैली व श्वासाचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे.

## ८ महिन्याच्या बालकावर दुर्बीणद्वारे मुतखड्याची यशस्वी शस्त्रक्रिया

### भूल देणे व शस्त्रक्रिया दोन्हीही जोखमीचे होते- डॉ.प्रवीण लड्डा



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अवघ्या ८ महिन्याच्या बालकावर दुर्बीणद्वारे मुतखड्याची शस्त्रक्रिया जालना येथील आशीर्वाद सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी झाली आणि १३ मि. मी. चा मुतखडा बाहेर काढण्यात आला. अत्यंत कमी वयात जराशीही भूल देणे, दुर्बीणने शस्त्रक्रिया करणे अत्यंत जोखमीचे होते. मात्र, पालकांनी विश्वास दाखविल्याने हे सर्व शक्य झाल्याचे डॉ. प्रवीण लड्डा यांनी सांगितले.

याविषयी अधिक माहिती अशी की, बुलढाणा जिल्ह्यातील एका खेडेगावातील आठ महिन्याचे बालक खूप दिवसापासून रडायचे. त्यांनी अनेक दवाखाने केले. तपासांती सोनोग्राफी केली असता, त्यात १३ मिलिमीटरचा मुतखडा आढळून आला. त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला. दरम्यान, जालना येथेही आशीर्वाद सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये लहान बालकांवर मुतखड्याच्या यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याची माहिती पालकांना कुणाकडूनतरी मिळाली आणि ते या हॉस्पिटलमध्ये आले. मूत्रविकार तज्ञ व सर्जन डॉ. प्रवीण लड्डा यांना भेटले आणि इथेच शस्त्रक्रिया करण्याचा आग्रह धरला. लहान मुलांमध्ये भुल देणे व दुर्बीणद्वारे शस्त्रक्रिया जोखमीचे असते, असे डॉ. लड्डा यांनी यांनी सांगितले असता, आम्ही ती जोखीम पत्करण्यास तयार असल्याचे आणि आम्हाला विश्वास असल्याचे पालकांनी सांगितले. पूर्वअनुभव व पालकांच्या विश्वासामुळे ही शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे करण्यात आली आणि १३ मिलिमीटरचा मुतखडा यशस्वीरीत्या बाहेर काढण्यात आला. बाळही सुखरूप आहे. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. प्रवीण लड्डा यांना भुलतज्ञ डॉ. प्रतीक्षा होलाणी-लड्डा, अजय घुले, हॉस्पिटलचे इतर डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# शहराला दररोज पाणी पुरवठा आणि विद्यापीठासाठी प्रयत्न करणार -आमदार कैलास गोरट्यांल

## विकासाच्या मुद्यावरच निवडणुक लढणार - आ.कैलास गोरट्यांल

तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

विकासाच्या मुद्द्यावरचं आपण विधानसभेची निवडणूक लढणार असून शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याबरोबरच जालन्यात एखादे विद्यापीठ मंजूर करण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी आज शनिवारी पत्रकारांशी बोलतांना दिली.

जालना विधानसभा मतदार संघातून आज शनिवारी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर आपल्या प्रितीसुधा नगर येथील निवासस्थानी ते पत्रकारांशी बोलत होते. काँग्रेस पक्षाच्या वतीने आपल्याला सहाव्यांदा जालना विधानसभेची उमेदवारी दिल्याबद्दल गोरंटयाल यांनी सर्वप्रथम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी, प्रियंका गांधी, पक्षाचे ज्येष्ठ नेते वेणुगोपाल, पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनीथला, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार आदींचे आभार व्यक्त करून आपण केलेल्या कामाची ही पावती असल्याचे सांगितले. मागील काळात आपण जालना शहरातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावला असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून ते सुरू होण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना मोठे यश मिळाले. विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जातांना विकासाचे मुद्दे हाच आपला अजिंठा राहणार आहे.



शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा व्हावा यासाठी आपण प्रयत्न करणार असून जायकवाडी प्रकल्पाद्वारे सध्या शहराला १५ एमएलडी इतका पाणी पुरवठा होत असून अंबड शहराजवळ असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रात सुरू असलेले काम पूर्ण झाल्यानंतर आणखी ३५ एमएलडी असे एकूण ५० एमएलडी पाणी शहराला मिळणार असून घानेवाडी ते शहरातील जलशुद्धीकरण केंद्र असे नवीन जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर संत गाडगेबाबा जलाशयातून देखील पाणी पुरवठा शहराला होणार आहे. याशिवाय हातवन येथूनही शहराला पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल. हे प्रयत्न यशस्वी झाले तर मुंबई, पुणे, नागपूर नंतर दररोज पाणी पुरवठा करणारे जालना शहर हे राज्यातील चौथे शहर होईल असा विश्वास महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी व्यक्त केला.

## आ.बबनराव लोणीकर व राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली अनेकांचा जाहीर प्रवेश



तभा वृत्तसेवा
परतुर-मंठा/प्रतिनिधी

पांगरी खुर्द तांडा तालुका मंठा येथील अनेक युवकांचा माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या विकास कामावरती विश्वास ठेवून व विलास घोडके यांच्या पुढाकाराने भाजपामध्ये प्रवेश केला प्रवेशामध्ये रामेश्वर चव्हाण महादेव चव्हाण चेतन राठोड अर्जुन राठोड सुरेश राठोड अनिल राठोड संतोष चव्हाण विक्रम राठोड रवि राठोड राजेश राठोड मिथुन चव्हाण संजय चव्हाण अर्जुन पवार आकाश राठोड पंजाब चव्हाण अविनाश राठोड गजानन चव्हाण कृष्णा चव्हाण राहुल चव्हाण असे असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी प्रवेश केला.

मोहाडी तांडा तालुका जिल्हा जालना येथील अनेक युवकांचा व ज्येष्ठ नागरिकांचा माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या कामावरती विश्वास ठेवून व मोहनराव आढे यांच्या पुढाकाराने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला प्रवेशांमध्ये ग्रामपंचायत सदस्य मोहन चव्हाण ग्रामपंचायत सदस्य विष्णू राठोड ग्रामपंचायत सदस्य राजू राठोड ग्रामपंचायत सदस्य दिलीप राठोड सुखदेव राठोड माणिक राठोड हरिचंद् राठोड ज्ञानेश्वर चव्हाण लहू राठोड सुदाम चव्हाण रंजीत राठोड कृष्णा राठोड अशा असंख्य कार्यकर्त्यांनी यावेळी प्रवेश केलायावेळी उपस्थित छत्तीसगडचे माजी आमदार संजय ढि ढि संपत टकले माजी पंचायत समिती सदस्य रावसाहेब मामा राठोड विनोद राठोड ज्ञानेश्वर चव्हाण बाजीराव कातारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## दिवाळीसाठी बाजारपेठ सजली मात्र परतीच्या पावसाने आनंदावर विरजण

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

दसरा सण झाला की, दिवाळीचे वेध लागतात. दीपज्योती' हे चिरंतन सर्वात्मक परमेश्वराचे प्रतीक आहे. त्यामुळे दिवाळीमध्ये घराघरांवर आकाश कंदील लावण्यात येतात. उंच इमारतीच्या गच्चीत, घराच्या अंगणात उंचावर लावलेल्या आकाश कंदिलांमुळे अंगण आणि परिसर उजळून प्रकाशमय होतो. सध्या बाजारात आकाश कंदील विविध आकारात व प्रकारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. हंडी कंदील, पर्यावरणपूरक कंदील यांच्याप्रमाणेच छोट्या आकाराच्या आहेत. विविध छायाचित्रांचेही आकाश कंदील विक्रीसाठी बाजारपेठेत उपलब्ध झाले.

यावर्षी नावीन्यपूर्ण प्रकारात कंदिलांवर छत्रपती शिवाजी महाराज, मंठा बाजारपेठेत विविध प्रकारचे आकाशकंदील विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. जाणता राजा, विविध देवतांचे फोटो



असलेले कंदील ग्राहकांना भुरळ घालत आहेत. साध्या पतंगाच्या कागदापासून तसेच जिलेटिन कागदाच्या पारंपरिक चांदण्यारूपी आकाश कंदीलही उठून दिसतात. एकूणच आकाश कंदिलांमध्ये संध्याकाळी ठिकठिकाणी लखलखणारे आकाशकंदीलच दिवाळीच्या आनंददायी प्रसन्न,अहो विविध प्रकारच्या कलाकृतींचे, रचनात्मक कौशल्याची अनुभूती येते. रंगीबेरंगी कापडी, कागदी कंदील, हॅलोग्राफी, मार्बल पेपर, वेताचा वापर केलेले, फोल्डिंगचे कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. दिवाळीत घरे, दुकाने, गल्लीबोळ असा सगळा परिसर विद्युतरोषणाईने झगमगत असतो. त्याचवेळी इमारतीच्या गॅलरीत, खिडकीबाहेर टांगलेले रंगीबेरंगी आकाशकंदील नजर वेधून घेतात. ठिकाणी आकाश कंदिलांचे स्टॉल्स लागल्यामुळे दिवाळीची चाहूल लागली आहे. वेगवेगळ्या प्रकारचे, आकारांचे, रंगांचे आकाश कंदील ग्राहकांना भुरळ घालत आहेत. कंदिलांनाही विशेष मागणी आहे. हंडी कंदील प्रकारात फ्लोरोसंट हंडी, मेटॅलिक हंडी हे प्रकार उपलब्ध आहेत.

# शेतकऱ्यांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता कृउबासमध्येच शेतमाल विक्रीसाठी आणावा- राठोड

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी कोणत्याही व्यापाऱ्यांच्या बाहेरच्या आमिषाला बळी न पडता त्यांचा शेतमाल थेट कृउबासमध्ये विक्रीसाठी आणावा, असे आवाहन जालन कृउबास समितीचे सचिव मोहन राठोड यांनी केले आहे. बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक वाढली असुन बाजार समितीचे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी जालना कृषि उत्पन्न बाजार



समिती कडून न्यू मार्केट यार्ड जालना येथे शेतमाल खरेदी विक्रीसाठी विविध सोयीसुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तरी बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपला शेतमाल बाजार समितीचे आवारातच विक्री करावा. कारण अनेक विना-परवानाधारक अवैध व्यापारी शेतकऱ्यांचे घरी जावुन जागेवर खरेदी करत आहे. तसेच अनेक ठिकाणी अवैध शेतमाल खरेदीचे माध्यमातून बाजार आवाराबाहेर परस्पर शेतकऱ्यांच्या शेतमालास जास्त भाव देण्याचे प्रलोभन देऊन, वजनमापात एक ते दोन किलोचा काटा मारून कित्येक व्यापाऱ्यांनी कित्येक शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केलेली असून अनेक शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याच्या घटना, पैसे बुडवण्याच्या घटना घडलेल्या असल्याची वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांनी बाजार समिती आवारात आपला माल विक्रीसाठी अडत्याचे पेढीवर आणताच संबंधीत आडत्याकडून त्वरीत आवक वहीत नोंद करुन नांव, गांव, शेतमालाचे वर्णन, प्रकार, व शेतमालाचे वजन याची नोंद करुन पोच पावती घ्यावी. शेतकऱ्यांनी आपल्या शेतमालाचे वजन इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावरच केले जाईल. याकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे. बाजार आवारातील अडत्याने इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर शेतमालाचे मोजमाप करण्यास टाळाटाळ केल्यास ताबडतोब बाजार समिती कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहन जालना कृषी उत्पन्न बाजार समिती सचिव मोहन राठोड यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# भाजप नेत्यांच्या सांगण्यावरूनच राष्ट्रवादीमध्ये प्रवेश : चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**

महायुतीच्या बैठकीत लोहा - कंधार विधानसभेची जागा राष्ट्रवादीला देण्यात आली होती. त्यातच या मतदारसंघातून मी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व पक्षातील नेत्यांच्या निर्णयानुसार तसेच भाजपा नेत्यांच्या सांगण्यावरूनच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला असल्याचे स्पष्टीकरण माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पत्रकार परिषदेत केले.



माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेत भारतीय जनता पार्टीचे जिल्हा प्रवक्ते तथा प्रदेश कार्यकारणी सदस्य चैतन्य बापू देशमुख, बालाजी बच्चेवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, भाऊसाहेब गोरठेकर, शिवसेनेचे संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष प्रणिताताई देवरे, कुंडलवाडीचे माजी नगराध्यक्ष विठ्ठलराव कुडमुलवार, माजी जिल्हा परिषद सदस्य विनायक पाटील मांजरमकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना माजी खासदार चिखलीकर म्हणाले की, भारतीय जनता पार्टीमध्ये प्रामाणिकपणे काम केले. नांदेड लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर लोहा -कंधार मतदार संघातून निवडणूक लढविण्यासंदर्भाने भाजपाचे नेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यांच्या सांगण्यानुसार तयारी देखील सुरू केली. परंतु महाविकास आघाडीमध्ये इतर देखील पक्ष असून जागा वाटपाच्या निर्णयात लोहा- कंधार विधानसभेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला गेल्यानंतर निवडणूक लढविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांच्या सांगण्यावरून अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातूनच लोहा- कंधार विधानसभा निवडणूक लढविणार असल्याचे माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी यावेळी सांगितले. भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना व अन्य इतर पक्ष महायुती त्यामुळे महायुतीच्या सर्वच उमेदवारांचा प्रचार करणार असल्याचे सांगत लोहा - कंधार विधानसभेसाठी दि. २८ ऑक्टोबर रोजी अर्ज भरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## पोलिसांच्या कारवाईत ६३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**


निवडणुकीच्या अनुषंगाने तसेच पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिलेल्या सुचनावरुन जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी दि.१५ ऑक्टोबर २५ ऑक्टोबर या दरम्यान दारु, गुटखा तसेच वाहन जप्ती, रोख रक्कम जप्ती अंतर्गत ६३ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात अवैध व्यवसायाविरुध्द तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने वाहन तपासणी अंतर्गत जिल्हा पोलीस अधीक्षकांनी विशेष



मोहिम सुरु केली आहे. याअंतर्गत १५ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर या दरम्यान अवैध दारु विरुध्द १३९, अवैध गुटख्याविरुध्द ६, आर्म्स ॲक्ट अंतर्गत ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या मोहिमेतंर्गत वाहन तपासणीत ११ वाहने जप्त करुन त्यातून १२ लाख ५० हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. या कालावधीत एकूण १५२ गुन्हे दाखल झाले असून, त्याअंतर्गत ६३ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. शस्त्र परवानाधारकाकडून निवडणुकीच्या अनुषंगाने ९३८ शस्त्र जमा करण्यात आली आहेत. लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात सिमा सुरक्षा बलाच्या २, सशस्त्र सीमा बलाच्या २ अशा चार कंपन्या तैनात करण्यात आल्या आहेत. याअंतर्गत निवडणुकीच्या अनुषंगाने या कंपन्यांचा वापर देखरेखीसाठी होणार असून, सर्व प्रकारच्या अवैध धंद्याविरुध्द तसेच वाहन तपासणीच्या माध्यमातून कारवाया केल्या जाणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### सुनील मोरे यांच्याकडून कामगार-कर्मचाऱ्यांना संविधान ग्रंथाचे वाटप

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. २६ ऑक्टोंबर रोजी आगाराचे वाहतुक नियंत्रक श्री सुनील मोरे यांच्याकडून सामाजिक उपक्रम म्हणून एसटीच्या आगारातील कामगार-कर्मचाऱ्यांना भारतीय संविधान ग्रंथाचे वाटप आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये प्रातिनिधीक स्वरुपात पाळी प्रमुख मनोहर माळगे, लिपीक सौ. मनिषा कदम, रेखा माचीनवार, चालक केशव कांबळे, यांत्रिक यशोदिप अटकोरे यांचा समावेश होता. यावेळी एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करुन आपले विचार मांडले. ते प्रास्ताविकपर बोलताना आपल्या भाषणात म्हणाले की, भारतरत्न, प.पू., बोधिसत्व, घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत भारतीय संविधान या ग्रंथामुळे आज आपला भारत देश एकसंघ असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ आंतरराष्ट्रीय देशाच्या कायद्याचा अभ्यास करुन ४० हजार पुस्तकांचे वाचन करुन ही राज्यघटना लिहिली आहे, असे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्षे ११ महिने १८ दिवस अहोरात्र मेहनत घेऊन आपल्या बुद्धीमत्तेच्या जोरावर या संविधान ग्रंथाची निर्मिती केली असून आपण प्रवाशी सेवेबरोबरच आपल्या कुटुंबियांसहीत संविधानाचे वाचन केले पाहिजे व सजग राहून या संविधानाचे रक्षण करण्याप्रती समाजासाठी, देशाप्रती कार्य करण्याची ही काळाची नितांत गरज असल्याचेही ते यावेळी म्हणाले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आगार व्यवस्थापक मा.श्री. अनिकेत बल्लाळ, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, पाळी प्रमुख मनोहर माळगे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वाहतुक नियंत्रक सौ. पायल बैस, सुनील मोरे, वरिष्ठ लिपीक नितीन मांजरमकर, गुलाम रब्बानी, केशव टोणगे, लिपीक प्रियंका खरात, वैष्णवी गंदेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा.प.म. आगारातील कामगार- कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

### लैंगिक अत्याचाराचा गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता

**मुदखेड**- लैंगिक अत्याचाराच्या गुन्हा दाखल असलेल्या एकाची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. बारड येथील निलेश उत्तम ढवळे या युवकावर कलम ३७६, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम अंतर्गत बारड पोलीस ठाण्यात सन २०२२ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यासंदर्भाने जिल्हा विशेष न्यायालयात दि. १८ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली. नांदेड येथील विशेष न्यायालयाचे न्यायाधीश आर.एम. पांडे यांनी निलेश उत्तम ढवळे यास या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त केले. हा खटला जवळपास अडीच वर्षे चालला. या प्रकरणात एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. निलेश ढवळे यांच्यावतीने नांदेड व मुदखेड न्यायालयातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. माधव हाटकर, ॲड. के. ए. पंडीत, ॲड. अमोल भुरे, ॲड. श्रीपाल हाटकर , ॲड. सुबोध कोकरे, ॲड. तेजस्विनी मुंगल, ॲड. एस. व्ही.गरजे यांनी न्यायालयात बाजु मांडली.

### स्व. गोविंदराव राठोड यांना अभिवादन

**मुखेड**- मुखेड येथे स्वर्गीय गोविंदराव राठोड यांच्या १० वी पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन केले यावेळी आमदार डॉ. तुषार राठोड, माजी आ. गोविंद अण्णा केंद्रे, गंगाधरराव राठोड, डॉ विकास राठोड, सुनील राठोड, प्रताप राठोड, खुशाल पाटील,बालाजी पाटील, व्यंकटराव पाटील, अशोक गजलवाड, डॉ. अमोल कलेटवाड, संग्राम आप्पा माळगे, नंदकुमार मडगुलवार, उत्तम चौधरी, सुधीर चव्हाण, किशोरसिंह चौहान, राजेश गजलवाड, करण रोडगे व सर्व नगरसेवक व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## हिप्परगा थडी शाळेच्या वतीने कौठकर यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २५ ऑक्टोबर**

बिलोली तालुक्यातील मौजे हिप्परगा थडी येथे वास्तव्यास असलेले व सौ.मंजुळाबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कार्यरत मराठी विषयाचे सहशिक्षक तथा निवेदक राधाजी ब्रह्मानंद कौठकर शेवाळकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त जि.प.प्रा.शाळा हिप्परगा थडी येथील शाळेतील सर्व शिक्षकांच्या वतीने कौठकर सरांच्या घरी जाऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सहशिक्षक राधाजी कौठकर हे नियत वयोमानानुसार दि.३१ ऑक्टोबर रोजी सेवानिवृत्त होत आहेत.दिवाळीत हा योग आला आहे.त्यामुळे शाळेला सुट्टी जाहीर झाली



आहे.आज दि.२६ ऑक्टोबर कौठकर सरांच्या सेवाकाळातील हा शेवटचा अध्यापकीय कार्यालयीन दिवस होय.त्याचे औचित्य साधत जि.प.शाळेतील सहशिक्षक श्री.चौव्हाण सर,श्री. गेंदेवाड सर, श्री.गायकवाड सर,श्री.गौस भाई आदींनी जाऊन शुभेच्छांसह पुष्पगुच्छ,शाल आणि वटवृक्ष देत कौठकर दांपत्याचा योग्य सन्मान करण्यात आला.

## तोतया परिक्षार्थ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**

मुळ परीक्षार्थ्याच्या हॉल टिकीटावर स्वतःचा फोटो लावून महावितरण कंपशनीची परीक्षा देवून तोतयेगीरी केल्याच्या आरोपावरून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात एका आरोपी तरुणाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विष्णूपुरी येथील सहयोग सेवाभावी शैक्षणिक संस्थेअंतर्गत असलेल्या आय ऑन डिजीटल झोन येथे २४ ऑक्टोबर रोजी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे महावितरणची परीक्षा घेण्यात येत होती. या परीक्षेच्यादरम्यान, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी अडीच वाजेचे सुमारास मुळ परीक्षार्थी श्रीकांत श्रीनिवास सानप (रा. तगडगाव ता. शिरूर कासार जि. बीड) यांचे हॉल तिकीटावर आरोपी अर्जुनसिंग चुडाराम राजपूत (संजर कुराडी, औरंगाबाद) हा स्वतःचा रंगीत फोटो लावला. तो एवढ्यावरच थांबला नाही, तर त्याने डमी परीक्षार्थी म्हणून महावितरणची परीक्षा देवून तोतयेगीरी करून ठकवणूक केली. याप्रकरणी कोरइंटी ग्रा कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे एक्झिक्युटिव्ह अजय सतीश लुंगारे यांनी २४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेअकरा वाजेचेदरम्यान, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीआधारे आरोपी अर्जुनसिंग चुडाराम राजपूत ( रा.औरंगाबाद) आणि श्रीकांत सानप (रा. तगडगाव जि. बीड) यांचेविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. नूतन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीट पोलीस अंमलदार अतुल सातारे हे याप्रकरणाचा तपास करीत आहेत.

## सेवा क्षेत्रात उद्योजकांना मोठ्या संधी: चैतन्यबापू देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ ऑक्टोबर**

महिलांनी गृह उद्योगांबरोबरच सेवा क्षेत्रात पदार्पण करून आपली आर्थिक उन्नती साधावी, कारण सेवा क्षेत्रात सध्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे प्रतिपादन उद्योजक चैतन्य बापू देशमुख यांनी केले.

अंबिका मंगल कार्यालय येथे सुरू असलेल्या दीपोत्सव या भव्य प्रदर्शनाच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी ते म्हणाले की, एवढ्या मोठ्या प्रमाणात महिला आज उद्योगांमध्ये आपला ठसा उमटवीत आहेत याचा मला आनंद वाटतो. नांदेड शहरात अशा प्रकारे महिलांसाठी कार्यक्रम होत आहेत ही निश्चितच वाखाणण्याजोगी गोष्ट असल्याचे सांगून त्यांनी बी बी एन फाउंडेशनचे कौतुक केले. याप्रसंगी सौ. देशमुख म्हणाल्या की, महिलांची अशीच प्रगती झाली पाहिजे. अशा कार्यासाठी आमचे सदैव पाठबळ राहील. या प्रसंगी उद्योजक उमेश जालनेकर, श्रीपाद योगी, सुधीर देशमुख, विद्याधर कुंभोजकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. महिलांच्या कौशल्याला वाव देऊन त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी बी बी एन फाउंडेशनच्यावतीने दि.२७ ऑक्टोबर पर्यंत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. या प्रदर्शनात दिवाळीसाठी लागणारे खाद्यपदार्थ, पूजेचे साहित्य, गृह उपयोगी वस्तू, ज्वेलरी, गृह सजावट, गिफ्ट, साडी, ड्रेसेस, कॉस्मेटिक आणि भरपूर काही वस्तूंचे विविध स्टॉल आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनामुळे ऑनलाइन ऐवजी ऑफलाइन खरेदीला तसेच स्थानिक उद्योजकांना वाव मिळत आहे.



या उपक्रमासाठी अमोल कंडारकर, दुर्गादास जोशी, महेश कोळेश्वर, सारंग नांदेडकर, अनिल कुलकर्णी, सुमेध पांडे,प्रणव चौसाळकर, वैभव कुलकर्णी यांच्यासह बीबीएन टीम परिश्रम घेत आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रश्मी वडवळकर यांनी केले. कार्यक्रमास महिला तसेच प्रतिष्ठित नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

## हैदर बाग परिसरात मतदान जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**

०८७ नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील हैदर बाग परिसरात मनपा उपायुक्त सतपालसिंग संधू, मनपाचे शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी,स्वीप सदस्य प्रा.राजेश कुलकर्णी, संजय भालके व मुकुंद आळसपूरे यांच्या उपस्थितीत मतदान जनजागृतीचा कार्यक्रम संपन्न झाला.



यावेळी सतपालसिंग संधू यांच्या नेतृत्वाखाली प्रथम विद्यार्थ्यांची रॅली काढून परिसरात मतदान जनजागृती करण्यात आली. संपूर्ण हैदर बाग परिसरातील अनेक नागरिकांसह विद्यार्थ्यांनी मतदानाची प्रतिज्ञा घेतली. ही प्रतिज्ञा आर.जी.कुलकर्णी यांनी दिली. यानंतर प्रत्यक्ष शाळेत शिक्षक,पालक व जागरुक नागरिकांच्या उपस्थितीत मतदान जनजागृतीचा कार्यक्रम घेण्यात आला. मतदारांना मार्गदर्शन करतांना शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी लोकशाहीचा प्राण म्हणजे मतदार व आत्मा म्हणजे मतदान आहे. सर्व पात्र मतदारांनी येत्या २० नोव्हेंबर रोजी आपले मतदान कर्तव्य पूर्ण करावे,असे मत त्यानी व्यक्त केले.मनपा शाळा सुध्दा मतदान जनजागृतीमध्ये हिरीरीने भाग घेतात आणि जनजागृती करतात. यास प्रतिसाद देवून स्वीप कक्षाच्या आवाहनास प्रतिसाद द्यावा आणि लोकसभा पोट निवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत आपल्या मतदानाच्या अधिकाराचा नक्कीच योग्य उपयोग करावा असे प्रतिपादन मनपाचे उपायुक्त सतपालसिंग सधू यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक राजा पटेल यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साईराज मुदिराज,आशा घुले,संदिप लबडे,संभाजी पोकले,नाजिया तब्बसुम,निखत परविन,महेजबिन बेगम स्वच्छता निरीक्षक झियाउल्ला खान यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे मतदानासाठी ग्राह्य : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**

मतदानासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (एझखउ) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती, जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली.

लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राऊत यांनी ही माहिती दिली. ज्यांच्याकडे मतदार ओळखपत्र आहे, असे मतदार मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार ओळखपत्र नसणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२



पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागातर्फे छायाचित्रासह वितरित करण्यात आलेले पासबुक, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदवही अंतर्गत भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाची दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र असे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. प्रवासी भारतीयांना त्यांची ओळख पटविण्यासाठी त्यांचा मूळ पासपोर्ट आवश्यक असणार आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक पुरावा सोबत घेवून जाणे आवश्यक आहे.

## निवडणूकीच्या अनूषंगाने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २६ ऑक्टोबर**

८५-भोकर विधानसभा मतदारसंघ अंतर्गत नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व प्रथम मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण ओम लॉन्स, भोकर व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, बायपास रोड, भोकर येथे दि.२६ रोजी प्रथम प्रशिक्षण संपन्न झाले आहे. प्रविण मेंगशेट्टी (निवडणूक निर्णय अधिकारी, ८५-भोकर विधानसभा मतदारसंघ तथा उपविभागीय अधिकारी भोकर) यांचे सूक्ष्म नियोजन व मार्गदर्शनप्रमाणे रेणुकादास देवणीकर व आनंद देऊळगावकर (सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मुदखेड) यांनी ओम लॉन्स या ठिकाणी मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य काय आहे याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना सविस्तर मार्गदर्शन केले. भोकर मतदारसंघ मधील नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी यांना टपाली मतदान करता यावे याकरिता त्यांचे परिपूर्ण फॉर्म हस्तगत करुन घेण्यासाठी ओम लॉन्स, भोकर या ठिकाणीच संतोष कामठेकर यांच्या मार्गदर्शनप्रमाणे जिल्ह्यातील ९



मतदारसंघ निहाय तसेच जिल्हा बाहेरील मतदारसंघ यांच्याकरिता एक अश्या दहा टेबलची व्यवस्था करण्यात आली. यासाठी विस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. विनोद गुंडमवार यांच्या मार्गदर्शनप्रमाणे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, बायपास रोड याठिकाणी मतदारसंघ मधील नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व प्रथम मतदान अधिकारी यांचे ईव्हिएम मशीनचे हॅन्डसऑन-प्रशिक्षण झोन निहाय नियुक्त तीस झोनल अधिकारी यांनी संबंधित मतदान अधिकारी व कर्मचारी यांना दिले आहे. या प्रशिक्षण करीता मास्टर ट्रेनरसह एकूण ६५ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती ओम लॉन्स येथील प्रशिक्षणचे नियोजन शिवाजी जोगदंड यांच्या मार्गदर्शनप्रमाणे मंडळ अधिकारी मनोज खंदारे सतिष दंतुलवाड, ग्राम महसूल अधिकारी अनिल मुनेश्वर, रुपेश जाधव, नियुक्त शिपाई व महसूल सेवक यांनी केले. तसेच आश्रम शाळा येथील प्रशिक्षणचे नियोजन सय्यद उमर यांच्या मार्गदर्शनप्रमाणे मंडळ अधिकारी हयून पठाण,नवीन रेड्डी, ग्राम महसूल अधिकारी गोपाल माने, राजू चव्हाण, बाबुराव मुळेकर, नियुक्त शिपाई व महसूल सेवक यांनी केले. एकूण मतदान केंद्राध्यक्ष ४४१ पैकी ४१९ मतदान केंद्राध्यक्ष उपस्थित होते तसेच एकूण ४३६ प्रथम मतदान अधिकारी पैकी ४१७ प्रथम मतदान अधिकारी उपस्थित होते.४१ अनुपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक विभाग भोकर या कार्यालयातून कारणे दाखवा नोटीस पण निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## शिक्षणाधिकारी बिरगे यांची बितनाळ जि.प. शाळेला भेट

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २६ ऑक्टोबर**

उमरी तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा उमरी तालुक्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात सलग दुसऱ्यांदा प्रथम आल्याने नांदेड जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ सविता बिरगे यांनी बितनाळ शाळेची प्रशंशा पर भेट घेतली आहे. उमरी तालुक्यात शिक्षणाधिकारी सविता बिरगे नांदेड यांचा दौरा दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी होता . त्यांनी तालुक्यातील विविध जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांची भेटीही घेतल्या त्या पैकी उमरी तालुक्यात बितनाळ शाळा दुसऱ्यांदा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेत प्रथम क्रंमाक पटकीवल्यानेये भेट देऊन पि ए टी अंतर्गत चालू असलेल्या प्रथम सत्र परीक्षेतील विद्यार्थ्यांशी चर्चा केली. शाळेचा सुंदर व बोलका परिसर शाळेतील वृक्ष पाहून समाधान व्यक्त केले



इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांची परीक्षा संदर्भात चर्चा केली विद्यार्थ्यांची गुणवत्ता पाहून समाधान व्यक्त केले वर्ग पहिला, दुसरा, तिसरा वर्गामध्ये प्रत्यक्ष जाऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासली. वर्ग पहिलीतील विद्यार्थ्यांना बेरजेची उदाहरणे देऊन व विद्यार्थ्यांकडून पाढे म्हणून घेतले वर्ग पहिलीतील विद्यार्थिनी स्वरा सूर्यवंशी व जोया पठाण या विद्यार्थिनींनी वीस पर्यंतचे पाढे म्हणून दाखवले विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५१ रुपये शिक्षण अधिकारी बिरगे मॅडम यांच्याकडून बक्षीस देऊन शाबासकी देण्यात आली प्रत्येक शिक्षकांकडून वेध संदर्भात चालू असलेल्या उपक्रमांची माहिती घेऊन वेद म्हणजे काय? वेदांतर्गत कोणकोणते उपक्रम राबवले जातात, विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचे आव्हान दिल्या जाते, यासंदर्भात सर्व शिक्षकांकडून माहिती शिक्षणाधिकारी बिरगे मॅडम यांनी घेतली. शालेय पोषण आहार अंतर्गत खीर, उसळ व खिचडी यांचा आस्वाद घेतला व त्यांच्याशी चर्चा करून परसबागेतील भाजीपाला वाढवण्याचा सल्ला स्वयंपाकांना देण्यात आला. एकत्रित विद्यार्थ्यांची गुणवत्ता ,शालेय वातावरण, शाळेत चालू असलेले उपक्रम शिक्षकांनी वेध संदर्भात दिलेल्या प्रश्नांची उत्तर सर्व ऐकून शिक्षणाधिकारी मॅडमने सर्व शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे, मुख्याध्यापकांचे कौतुक केले व आणखीनही आपल्या शाळेतून विद्यार्थी गुणवान घडावेत यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या यावेळी उमरी गटशिक्षणाधिकारी नंदकुमार कुलकर्णी , शिक्षण विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे , तसेच बितनाळ केंद्राचे केंद्रप्रमुख चाटोरीकर , मुख्याध्यापक पूटवाड सर उपस्थित होते

बितनाळ शाळेचे मुख्याध्यापक नुकताच आर्दश शिक्षक जिल्हा पुरस्कार प्राप्त भगवान संपतवार सर , शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक शेख मौला, शिक्षक मोटरवार, कळसकर सर, सौ कल्याणकर मॅडम, सौ. तांबरे मॅडम, वडमीले सर, घोगरे सर, पेंडलवार सर, शिवनखेडकर सर उपस्थित होते शालेय परिसर, विद्यार्थी शिस्त, विद्यार्थी गुणवत्ता, पाहून शिक्षणाधिकारी बिरगे यांनी शाळेचे विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# छत्रपती संभाजीनगर



### महिलेचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर : जुन्या भांडणाचा राग मनात धरून महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २४ ऑक्टोंबर रोजी शिवनेरी कॉलनी रांजणगाव परिसरात घडली. विशाल गायकवाड (शिवनेरी कॉलनी रांजणगाव) असे आरोपीचे नाव आहे. महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार महिला व तिचा मुलगा घराच्या दिशेने जात असताना शेजाऱ्याने जुन्या भांडणाचा राग मनात धरून फिर्यादी महिलेच्या घरात घुसून तिचे कपडे फाडून विनयभंग केला आणि महिला घराबाहेर पडली असता तिच्या मागे लोखंडी रॉड घेऊन फिर्यादी महिला सोबत राहणार निलेश खंदारे यांनी याचा जाब विचारला असता त्यांना देखील शिवीगाळ करून मारहाण केल्या प्रकरणी एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### महिलेला शिवीगाळ

छत्रपती संभाजीनगर : वारंवार फोन करून महिला व तिच्या पतीला शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २५ ऑक्टोंबर रोजी उघडकीस आली आहे. आकाश लक्ष्मण साळुंखे असे आरोपीचे नाव आहे. फिर्यादी महिलेने दिलेला तक्रारीनुसार महिलेच्या मोबाईलवर वारंवार फोन करून अश्लील भाषेत बोलून तिला व तिच्या पतीला शिवीगाळ केली. त्यानंतर महिलेने आपला मोबाईल आपल्या पतीकडे दिला असता आरोपींनी फोन करून म्हणाला की, तुझ्या बायकोला फोन दे तेव्हा फिर्यादीच्या पतीने मोबाईल देण्यास नकार दिल्याने आरोपीने फिर्यादीच्या पतीस शिवीगाळ केल्याप्रकरणी जवाहरनगर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### किल्ल्यात विनातिकीट प्रवेश; कर्मचाऱ्याला धमकी

छत्रपती संभाजीनगर : दौलताबाद येथील किल्ल्यात विना तिकीट आतमध्ये प्रवेश - करत असताना चेक करणाऱ्या कर्मचाऱ्याला अरेरावी करून धमकी - देण्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २५ ऑक्टोबर रोजी दौलताबाद किल्ला परिसरात घडली. सैय्यद रिजवान सय्यद साहेब आली (रा. दौलताबाद) असे आरोपीचे नाव आहे. सर्जेराव उत्तमराव पाखरे (४८ रा. पहाडसिंगपुरा) या कर्मचाऱ्यांनी - दिलेल्या तक्रारीनुसार फिर्यादी हे दौलताबाद किल्ल्याजवळील मुख्य प्रवेशद्वारावर तिकीट तपासणी - करत असताना आरोपी विनाटिकीट - किल्ल्यात प्रवेश करून फिर्यादी - कर्मचाऱ्यांसोबत अरेरावी करून - सरकारी कामात अडथळा निर्माण - केला व फिर्यादीस जीवे मारण्याची - धमकी दिल्याप्रकरणी दौलताबाद - पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अश्लील भाषेत महिलेला शिवीगाळ

छत्रपती संभाजीनगर : तुझ्या भावाने अडीच कोटी रुपये घेतल्याचा कारणावरून वाद घालून अश्लील भाषेत महिलेला शिवीगाळ केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना २५ ऑक्टोंबर रोजी पुंडलिक नगर भागात घडली. धर्मराज रूपसिंग चव्हाण (५० रा. बंजारा कॉलनी त्रिमूर्ती चौक जवाहरनगर) असे आरोपीचे नाव आहे.

### खट्याळ पिट्या...




# स्थुलता टाळण्यासाठी जीवनशैलीत बदल आवश्यक : डॉ. अभय धानोरकर

### जागतिक स्थूलता प्रबोधन दिन

छत्रपती सभाजीनगर, दि.२४ :-स्थुलतेमुळे आपण अनेक आजारांच्या जाळ्यात आपसुक अडकतो. त्यातून बाहेर येणे मग कष्टप्रद होऊन बसते. हे एकूणच आपल्या सामाजिक आर्थिक आणि मानसिक विकासाला मारक ठरते. जीवनशैली बदलामुळे आलेले स्थुलत्व हे जीवनशैलीतील सकारात्मक बदलामुळेच दुर केले जाऊ शकते. त्यामुळे आहार, व्यायामाचा अंतर्भाव करुन जीवन शैलीत बदल कराव स्थुलता टाळा,असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

जागतिक स्थूलता अथवा लठ्ठपणा प्रबोधन दिन (२६ ऑक्टोंबर) अनुषंगाने स्थूलता अर्थात लठ्ठपणा याविषयी लोकांना लठ्ठपणाबद्दल जागरुक करणे, हा या दिवसाचा उद्देश आहे. लठ्ठपणा आपल्या आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. लठ्ठपणामुळे उच्चरक्तदाब, मधुमेह, अर्धांगवायू, गुडघेदुखी, हृदयविकार यासारख्या गंभीर आजारांचा धोका वाढतो. देशातील पन्नास दशलक्षाहूनही अधिक लोक लठ्ठपणामुळेग्रस्त आहेत. लठ्ठपणाचे मुख्यकारण म्हणजे जास्त प्रमाणात खाणे. कोणत्याही प्रकारचा व्यायाम न करणे आणि शारीरिक हालचालींमध्ये जास्त भाग न घेणे. याशिवाय हार्मोन्समध्ये बदलाव, औषधे आणि आपल्या बदलत्या जीवनशैलीमुळे देखील ही समस्या उदभवू शकते.

आपण जे अन्न खातो, त्यापासून आपल्याला शक्ती म्हणजे ऊर्जा मिळत असते. आपल्या अन्नात कर्बोदके, प्रथिने आणि स्निग्ध पदार्थ यांचा समावेश असतो. आपण खाल्लेल्या अन्नामधील कर्बोदकांपासून ग्लुकोज निर्माण होते. हे ग्लुकोज आपल्या शरीरात ऊर्जा निर्माण करण्यास मदत करते. या ऊर्जेचा उपयोग करुन आपल्या शरीराच्या जीवनावश्यक गरजा भागविल्या जातात. आहारामधील प्रथिनांपासून शरीरातील मांसपेशी व इतर पेशी तयार होतात व शरीराची वाढ होते. स्निग्ध पदार्थ कर्बोदकांच्या तुलनेने दुप्पट ऊर्जा निर्माण करु शकतात. शरीरामध्ये ग्लुकोज कमी पडल्यास स्निग्ध पदार्थ ऊर्जा पुरवू शकतात. शरीरामध्ये गरजेपेक्षा जास्त ग्लुकोज उपलब्ध असल्यास त्याचे रुपांतर स्निग्ध पदार्थामध्ये होते व ही अतिरिक्त ऊर्जा साठविली जाते, जिला आपण शरीरातील चरबी असे म्हणतो. म्हणजेच शरीराच्या गरजेपेक्षा जास्त अन्न सेवन केल्यास चरबी वाढते अर्थात स्थूलता निर्माण होते. आपल्या शरीराची तुलना एखाद्या पेट्रोल आणि बॅटरी अशा दोन इंधनांवर चालणाऱ्या मोटारीशी करता येईल. मोटार चालू असताना पेट्रोलचा वापर करुन बॅटरी चार्ज केली जाते आणि जेंव्हा पेट्रोल कमी असते किवा जेंव्हा मोटारीला जास्त शक्तीची गरज असते तेंव्हा बॅटरीच्या अतिरिक्त ऊर्जेचा उपयोग केला जातो. म्हणजेच शरीरातील चरबीचा उपयोग अन्न उपलब्ध नसल्यास, अधिक शारीरिक श्रम व व्यायाम अथवा उपवास केल्यास केला जातो. सध्याच्या जीवनशैलीमध्ये आहाराची उपलब्धता मुबलक असल्याने, एकदा स्थूलता निर्माण झाली कि ती शरीरात कायमचीच ठाण मांडून रहाते.

सतत वाढत जाणाऱ्या स्थूलतेचे रुपांतर आजारामध्ये होईपर्यंत ती काही ठराविक अवस्थांमधून जाते. आहारातील स्निग्ध पदार्थांचे माफक प्रमाणात सेवन केल्याने जी स्थूल अवस्था निर्माण होते तिला 'सुस्थूलता' (हेल्दी ओबेसिटी) म्हणता येईल कारण अशी स्थूलता शरीराला योग्य अशी गोलाई, सुंदरता देते. हि चरबी कोणत्याही शारीरिक क्रियेमध्ये अडथळा निर्माण करीत नाही. कर्बोदके म्हणजेच आटा, मैदा, किवा कोणत्याही पिठापासून बनलेले पदार्थ गरजेपेक्षा जास्त खाल्यामुळे या कर्बोदकांपासून शरीरामध्ये इन्शुलिनच्या मदतीने चरबी तयार केली जाते. हि 'शरीरर्निमित चरबी' शरीरामध्ये अनेक रासायनिक बदल घडविते. या चरबीमुळे रक्तातील चरबी, कोलेस्टेरॉल वाढते, रक्तदाब वाढतो आणि हृदयविकारासारखे मोठ्या रक्तवाहिन्यांचे आजार उदभवतात.

आपल्या जीवन शैलीमध्ये बदल करुन नियमित शारिरीक व्यायाम, बैठे काम कमी करणे, जेवणामध्ये आटा, मैदा, किवा कोणत्याही पिठापासून बनलेले पदार्थ गरजेपेक्षा जास्त खाऊ नये व आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.

# बँक, पतसंस्था, खेळाडू, पेट्रोलपंप चालक, मालक आदींना शस्त्र बाळगण्याची परवानगी

## छानणी समितीने सहा जणांचे अर्ज फेटाळले

छत्रपती संभाजीनगर : विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागताच पोलिसांनी परवानाधारकांना शस्त्र जमा करण्याचे आदेश दिले होते. शहरातील ८८ शस्त्रधारकांनी की वेगवेगळी कारणे देत शस्त्र जमा करण्यापासून सवलत मिळावी म्हणून अर्ज केले होते. पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखालील छानणी समितीने यातील सहा जणांचे अर्ज फेटाळले तर, ८२ जणांना शस्त्र बाळगण्याची परवानगी दिल्याची माहिती पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत १ हजार ७५ परवानाधारक अग्निशस्त्र न आहेत. यात सुरक्षा एजन्सी, बँक, पेट्रोल पंप, खेळाडू यांच्यासह व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक, ना राजकीय क्षेत्रातील व्यक्तींचा . समावेश असतो. निवडणूक र आचारसंहिता लागल्यावर शस्त्रांचा से गैरवापर होऊ नये म्हणून ही शस्त्रे न जमा केली जातात. यातील बँक, पेट्रोलपंप, खेळाडू आदींना सवलत दिली जाते. सवलत देण्याचा निर्णय शहराच्या हद्दीसाठी

पोलिस आयुक्त, उपायुक्तांची समिती घेते. दरम्यान, १ हजार ७५ शस्त्र परवानाधारकांपैकी ८८ जणांनी शस्त्र बाळगण्यास परवानगी द्यावी म्हणून विनंती अर्ज केले. २१ ऑक्टोबरला पोलीस आयुक्त प्रवीण पाटील आणि तिन्ही उपायुक्तांच्या उपस्थितीत छाननी समितीची बैठक झाली. यातील ६ जणांची विनंती अमान्य करून त्यांना शत्र जमा करण्याचे आदेश दिले. उर्वरित ८२ जणांना निवडणूक काळातही शस्त्र बाळगण्यास परवानगी देण्यात आली आहे. यात बँक, पतसंस्था, खेळाडू आणि पेट्रोलपंप चालक, मालक यांचा समावेश आहे.

तर परवाना होणार रद्द

वारंवार सूचना देऊनही शस्त्र जमा न केल्यास पोलिसांना संबंधित परवानाधारकावर गुन्हा दाखल करणे, त्यांचा परवाना रद्द करणे आदी प्रकारच्या कारवाया करण्याचा अधिकार आहे. परवानाधारकांनी पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहनही वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश आघाव यांनी केले.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांची विधानसभा क्षेत्रनिहाय निवडणूक तयारीची पाहणी

छत्रपती संभाजीनगर, दि.२४(जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने मतदारसंघात करावयाच्या तयारीची जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी पाहणी केली. औरंगाबाद पुर्व, फुलंब्री, पैठण या विधानसभा क्षेत्रनिहाय त्यांनी पाहणी करुन प्रशासनाने केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेतला.

औरंगाबाद पूर्व , फुलंब्री येथे गुरुवारी (दि.२४) सायंकाळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी



यांनी पाहणी केली, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठीच्या सुविधा, विविध कक्ष, माध्यम कक्ष, स्ट्राँग रुम इ. सर्व व्यवस्थांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

तसेच शुक्रवारी (दि.२५) पैठण येथे भेट देऊन पाहणी केली व झोनल अधिकारी, नोडल अधिकारी यांच्या सह सर्व नियुक्त कर्मचाऱ्यांना निवडणूक प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. तसेच प्रतिष्ठान महाविद्यालयात उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना मतदार जनजागृती उपक्रमात सहभागाचेही आवाहन केले.

# स्थिर सर्वेक्षण पथकांनी जप्त केली बारा लाखांची रोकड

छत्रपती संभाजीनगर : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थापन केलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकांकडून शहरात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. या तपासणीत दोन ठिकाणी तब्बल बारा लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. औरंगाबाद पश्चिम आणि औरंगाबाद पूर्व या दोन मतदारसंघात ही कारवाई करण्यात आली.

संशयीत रित्या बॅगमध्ये ७ लाख ५० हजारांची रोख रक्कमेसह ५५ हजारांचे सोन्याचे दागिने घेवून फिरणाऱ्या एकाला सिडको बस स्थानकाच्या आवारातून आचारसहींतेच्या एसएसटी पथकाने पकडले. अजील सरकार (कबाडीपुरा, छत्रपती संभाजीनगर) असे संशयीताचे नाव आहे. ही कारवाई विधानसभा निवडणूकीच्या स्थिर सर्वे क्षण पथकाने २३ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजेच्यासुमारास सिडको बसस्थानक परिसरात केली.

विधासभा निवडणूकीच्या अनुषंगाने आचारसंहितेच्या काळात अवैध धंद्यांना आणि काळ्या पैशांना आळा बसावा यासाठी स्थापन करण्यात आलेले विविध पथक हे सर्वत्र नजर ठेवून आहेत. २३ ऑक्टोबर रोजी एसएसटी पथक क्रमांक आठ विधानसभा पुर्व मतदार संघात सिडको बसस्थानकात ये जा करणाऱ्या बसेसवर लक्ष ठेवून होते. मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे दिलीप सोनवणे यांना बस (एमएच २४-ए-८२९५) मधून एक तरूण संशयीतरित्या बॅग घेवून उतरतांना दिसला. त्याच्या हालचाली संशयीत वाटल्याने सोनवणे यांनी त्याला इशारा करून थांबण्यास सांगितले. त्यावेळी त्याने पोलिसांना पाहून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सोनवणे यांनी सोबतच्या अंमलदार प्रभाकर पाटील

यांच्या मदतीने त्याला पकडले. त्याने त्याचे नाव अजीज सरकार (रा. कबाडीपुरा) असल्याचे सांगितले. बॅगमध्ये काय आहे असे विचारल्यावर त्यांने उडवाउडवीचे उत्तरे दिली. एसएसटी पथकाचे प्रमुख अमोल राठोड व सहाय्यक अमोल गायके यांना बोलवून त्यांचे समक्ष बॅगेची तपासणी केली. त्या बॅगेत साडेसात लाख रूपयांची रोख रोकड आणि चार ग्रॅम वजनाचा एक सोने धातूचा तुकडा आणि चार धातुच्या बांगड्या असा एकुण ८ लाख रूपयांचा एवज पोलीसांनी आचारसंहिता पथकाच्या ताब्यात दिला. एसएसटी पथकाने मुद्देमाल जप्त करून वरिष्ठ कोषागार येथे पुढील कारवाईसाठी जमा केला.

# चुडावा येथील कला शिक्षकाचे मुंबई येथे चित्रप्रदर्शन

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर

पूर्णा तालुक्यातील चुडावा येथील हौशी छायाचित्रकार व फोटोग्राफर म्हणून ओळख असणारे कलाशिक्षक प्रवीण देशमुख यांनी मुंबई येथे लाईट अँन्ड वूमन या विषयावर एग्झीबीशन चे आयोजन केले आहे या आयोजनामध्ये एकुण १५छाया चित्र आहेत. स्थळ बॉम्बे एग्झीबीशन हॉल क्रमांक ३नेस्को गोरेगाव पूर्व मुंबई येथे आहे यामध्ये छायाचित्र पहाण्यासाठी प्रवेश विनामूल्य आहे उद्घाटक सिनेअभिनेते विरू धाराशिंह यांच्या हस्ते उद्घाटन



आहे तालुक्यातील ग्रामीण भागातून हा कार्यक्रम प्रथमताच होत असल्याने सर्व स्तरांतून कलावंताकडून त्यांचे कौतुक केले जात आहे व दि २५/२६/२७ आक्टो २०२४ ग्रामीण भागातून



सुद्धा नवीन छायाचित्रकार पूढे यावेत कलाशिक्षक देशमुख यांची संकल्पना आहे या पूर्वी दिल्ली, पठाणकोट, झांसी, भोपाळ, जयपुर, भुसावळ, संभाजीनगर इत्यादी ठिकाणी देशमुख यांच्या



छायाचित्राची निवड झालेली आहे व त्यांना पुरस्कार प्राप्त झालीत व त्यांचा हेतू ग्रामीण भागात काम करत असलेले छायाचित्रकार ही प्रवाहात आले पाहिजे असा त्यांचा हेतू आहे

# पद्मा तापडिया यांच्या पुढाकाराने साड्या फराळ करणार वाटप

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या उद्योजिका पद्मा तापडिया यांच्या पुढाकाराने तीन हजार कष्टकरी महिलांना साड्या फराळ साहित्य वाटप केले जाणार आहे. सदर उपक्रमास अयोध्या येथील श्री राम मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य गोविंद देवगिरी महाराज यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

मागील चार वर्षाप्रमाणे याही वर्षी उद्योजिका पद्मा तापडिया यांच्या पुढाकाराने शहरातील उद्योजक महिलांच्या वतीने दिवाळीच्या काळात गोरगरीब, कष्टकरी, गरजू महिलांना साड्या, फराळ, मिठाई, साबण, तेल, असे साहित्य वाटप केले जाणार आहे. शहर आणि आसपासच्या परिसरामध्ये दिवाळीचा फराळ साड्या आणि साहित्य वाटप करण्यात येणार आहे. यावर्षी फराळ मिठाई बनवण्याचे काम सुरु असताना अयोध्या येथील श्री राम मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य गोविंद देवगिरी महाराज तथा पूर्वाश्रमीचे किशोर जी व्यास यांनी सदर ठिकाणी भेट देऊन पूजन करीत कार्यास आशीर्वाद दिले. प्रसिद्ध उद्योजीका तथा सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणाऱ्या पद्मा तापडिया यांच्या पुढाकाराने सदर उपक्रम मागील चार वर्षांपासून राबविण्यात येत आहे. यावर्षी सदर कार्यात प्लॉगर्स गृपच्या सदस्यांनी देखील सहभाग घेतला असून नुकत्याच जमा झालेल्या कापडांचे वर्गीकरण करून पॅकिंग चे काम प्लॉगर्स गृपच्या वतीने करण्यात आले,

ह्या कार्यासाठी शहरात फराळ, लाडू बनवून फूड पॅकेट्स आणि साड्या पॅकिंग चे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता सदर साहित्य वाटप करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. या कार्यासाठी पद्मा तापड़िया यांच्या पुढाकाराने किरण भट्टड, राधिका वेलांगी, पुष्पा लड्डा, पुष्पा मनियार, साधना जाजू, पूजा जाजू, उमा खंडेलवाल, विजया तापड़िया आदी कार्यरत असून सदर उपक्रमामध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# परस्पर पार्वती बाउलच्या बाउल संगीत आणि पार्वती दत्ताच्या ओडीसी नृत्याचे सादरीकरण

## २७ ऑक्टोबर २०२४, संध्याकाळी ७ वाजता रुक्मिणी सभागृह, छत्रपती संभाजीनगर, २९ ऑक्टोबर २०२४, संध्याकाळी ७ वाजता सिडको कन्व्हेन्शन सेंटर, सेक्टर ३० ए, वाशी

नवी मुंबई : २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता रुक्मिणी सभागृह येथे भारतीय नृत्य वारसा कृष्ण चेतनेवर आधारित भावपूर्ण संगीत आणि नृत्याची अनोखी संध्याकाळ सादर केली जाईल. 'परस्पर' नावाचा कार्यक्रम दोन कला प्रकारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या दोन कलाकारांमध्ये उत्स्फूर्त कलात्मक संवाद घडवून आणतो - प्रसिद्ध कलाकार पार्वती बाऊल (बाउल संगीत) आणि प्रख्यात नृत्यकार पार्वती दत्ता (ओडिसी नृत्य).

कार्यक्रमात ३ विभाग असतील - १. पार्वती दत्ता आणि शिष्यांचे ओडिसी ज्ञानेश्वरीतील ओवी आणि कृष्ण विथि - कृष्णभावनेसह मनाच्या अंतराळाच्या प्रवासावर विषयासंबंधी कामगिरी २. पार्वती बाऊल यांचे बाऊल संगीत ३. राधा-भाव : पार्वती बाऊल आणि पार्वती दत्ता यांचा युगल सादरीकरण 'परस्पर' हा कार्यक्रम 'सहचर' प्रकल्पाचा एक भाग म्हणून तयार करण्यात आला आहे जो कला प्रकारांमधील आंतर-विषय संवादावर भर देतो. पार्वती दत्ताने यापूर्वी 'सहचार' अंतर्गत इतरही अनेक संरचने तयार केले आहेत जसे की - एलोरा लेणी शिल्पांवर, वर्ण-रिती इत्यादी. कार्यक्रम 'पारस्पर' हा अशोक-बन आणि महागामी गुरुकुल (स्था. १९९६) यांनी संयुक्तपणे तयार केले आहे. विविध विषयांमध्ये गुरुकुल शिक्षण प्रणालीला पुढे आणि समर्थन देण्याच्या उद्देशाने. २७ ऑक्टोबर रोजी छ. संभाजी नगरला सादर झालेल्या कार्यक्रमात चत्रब्ब् ट्रस्ट, चत्रब्ब् युनिव्हर्सिटी आणि इतर कला समर्थकांसह, तर २९ ऑक्टोबरला चत्रब्ब् इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस (डीम्ड युनिव्हर्सिटी) आणि चत्रब्ब् वाशी हॉस्पिटल यांनी पाठिंबा दिला आहे.


'पारस्पर' - ही पार्वती बाऊल आणि पार्वती दत्ता या दोन समर्पित कलाकारांची नम्र अर्पण आहे; संगीत, नृत्य, दिव्य शब्द असलेले सादरीकरण. कलाकार आपल्या कलाकृतीच्या अवकाशात विचरण करत असताना, अनंताची माहिती देणारा सूक्ष्म कलात्मक संवाद



तयार करतात.

पार्श्वभूमी

भारतीय संगीताला धार्मिक आणि धर्मनिरपेक्ष अशा दोन्ही प्रकारच्या गीत, स्तवन आणि काव्यांची मोठी परंपरा लाभली आहे. प्राचीनतम भारतीय संगीतावर संस्कृत मंत्रांचा प्रभाव होता, ज्यांची जागा नंतर विविधप्रकारच्या परंपरा आणि दर्शनांनी घेतली. पुढे १० व्या शतकातील जयदेव यांच्या गीतगोविंदसारख्या वैष्णव काव्यांनी भारतीय संगीत प्रभावित झाले आणि उत्तरोत्तर विकसित होत गेले. जयदेव यांची काव्ये आजही पूर्व भारतातील कित्येक मंदिरांमध्ये



गायली जातात. मध्ययुगाने हिंदू आणि इस्लामिक प्रवाहांचा संगम अनुभवला. या काळात सम्राट, नवाब आणि भूपतींच्या आश्रयाने सांगीतिक परंपरांना आकार दिला. गूढ, काव्यमय, ग्रामीण आणि हर्षभरित रंग असलेले पूर्वीचे बरेचसे संगीतसूत्र हे भक्तीपर होते. बाउल (अर्थात दैवीप्रेरणेने प्राप्त भावोन्माद) हे आंतरिक आदर्शाच्या शोधात गात फिरणारे बंगालमधील गूढ भाट (मुस्लीम सुफी आणि हिंदू वैष्णव). भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात 'ओद्रा-मागधी' असा उल्लेख असलेले ओडिसी भारतातील सर्वांत प्राचीन शास्त्रीय नृत्यांपैकी एक समजले जाते. हे नृत्य मध्ययुगात मंदिरांमध्ये नृत्यांजलीच्या रुपात सादर केले जात असे.

पार्वती बाउल यांचा जन्म मौसुमी परियाल म्हणून पश्चिम बंगालमधील झाला. सुरुवातीला त्या कथक शिकल्या आणि शांतिनिकेतनातील (विश्व-भारती विद्यापीठ) कलाभवनातून दृश्य कलेचे प्रशिक्षण घेतले. फुलमाला दाशी या एका स्त्री बाउलकडून त्यांनी संगीत शिक्षणाला प्रारंभ केला. त्यांचे गुरु सनातन दास बाउल या ८० वर्षांच्या बाउल गायकाकडून संगीत शिकल्या. यानंतर त्या त्यांचे पुढील गुरु शशांको गोसाई यांच्याकडे गेल्या. त्यावेळी शशांको गोसाई यांचे वय होते ९७ वर्ष! आणि ते राहत होते पश्चिम बंगालच्या बंकुरा जिल्ह्यातील खोईरबोनी या एका लहानशा गावात. यानंतर पार्वती यांनी आपला पूर्णवेळ बाउल गायनाला दिला आणि बाउल संगीत सादरीकरणाला सुरुवात केली. एकतारा याबरोबरच त्यांनी डुग्गी हे वाद्य आणि 'चिलांबू नुपूर' ही धातूची रुणझुणती पैंजण वाजवायलाही सुरुवात केली. त्यांची गूढ गाणी ही पारंपारिक बाउल ठेवा आणि स्वरचित दोहे या दोन्हींतून आलेली असतात. त्या रंगमंचीय तत्त्वांचा आणि कथा-गायनाचा वापर करतात. आपल्या प्रयोगात त्या कधी काव्याचे अभिनयातून सादरीकरण करतात तर कधी स्पष्टीकरणात्मक भाषणाची त्याला जोड देतात. 'डेपसी ेष ींहश त्रीशरीं डेींश्र' हे पार्वती यांच्या बाउल गायनातील प्रवासावरील पुस्तक आहे. हे पुस्तक म्हणजे, पुरुष प्रधान आणि ग्रामीण भागात बहरलेल्या गायनप्रकारात एका सुशिक्षित महिलेच्या धाडसी भरारीचे दुर्मिळ चित्रणच.

पार्वती दत्ता यांचा जन्म पश्चिम बंगालमधील एका बहु-सांस्कृतिक वातावरणात समाजसुधारकांच्या कुटुंबात झाला. आई-वडिलांची साहित्य आणि रचनात्मक कार्यातील रुची, त्यांची सामाजिक सुधारणावादी विचारसरणी आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यांमुळे पार्वतीला विविध विषयांत रमता आले. यातूनच तिला आपल्यातील प्रतिभा आणि क्षमतांचा शोध लागला. आज एक अष्टपैलू ओडिसी आणि कथक नृत्यांगना म्हणून प्रसिद्ध असलेल्या पार्वती यांना नृत्य-समुदायात विचारवंत-नृत्यांगना आणि समर्पित कला प्रशासक म्हणून ओळखले जाते. पंडित बिरजू महाराज, पद्मविभूषण गुरु केलुचरण महापात्र आणि माधवी मुद्गल यांच्या त्या ज्येष्ठ शिष्या आहेत. कला-तांत्रिक गुण, भाव (अभिव्यक्ती) आणि ताल (ताल) यांच्यावर सुंदर प्रभाव आणि आज्ञा असलेल्या, पार्वतीच्या सादरीकरणचे देशांतर्गत आणि देशाबाहेरील रसिकांनी खूप कौतुक केले आहे. तिने ओडिसी आणि मर्दाल परंपरेतील ताल प्रणाली, धृपद, पखावाज, संगीत रत्नाकर आणि एलोरा लेणींच्या शिल्पांवर विस्तृत अभ्यास केला आहे आणि नृत्य निर्मितीमध्ये तिच्या कामाचा अनुवाद केला आहे. तिने भारतीय शास्त्रीय नृत्य आणि संगीतावर काही पुस्तके लिहिली आहेत. तिच्याकडे १८० पेक्षा जास्त रचना आणि काही संशोधन प्रकाशने आहेत.



# भाजपाच दलितांचा सर्वांत मोठा रक्षक

## काँग्रेसपासून सावध रहा : खा. ब्रज लाल

◆ **मुंबई, २६ ऑक्टोबर**

भाजपा संविधान बदलणार आहे, असा खोटा प्रचार करणाऱ्या काँग्रेसने आणिबाणीच्या काळात घटनादुरुस्ती करीत संविधान बदलले. अनेक कायदे करीत काँग्रेसने दलितांचे सर्वाधिक नुकसान केले. त्यामुळे भाजपा संविधान बदलणार आणि आरक्षण हिसकावणार, या काँग्रेसच्या अपप्रचाराला बळी पडू नका, असे आवाहन करताना संविधानाचे सर्वांत मोठे रक्षक भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आहेत, असे सूतोवाच उत्तरप्रदेशचे निवृत्त पोलिस महासंचालक आणि भाजपाचे राज्यसभा सदस्य ब्रज लाल यांनी शुक्रवारी केले.

मुंबईत झालेल्या पत्रपरिषदेत ते बोलत होते. खा. ब्रज लाल म्हणाले की, मी स्वत: दलित आहे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे निर्माते आहेत. पण, काँग्रेस आणि उत्तरप्रदेशातील समाजवादी पार्टीसह विरोधी पक्षांनी दलितांना प्रभावित करण्यासाठी संविधान बदलले जाणार, आरक्षण हिसकावले जाईल, असा अपप्रचार चालवला. संविधान सदन असे नाव दिलेल्या जुन्या संसद भवनातून नव्या संसद भवनात जाताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वत: हातात संविधानाची प्रत घेऊन गेले आणि आम्ही सर्व त्यांच्या पाठोपाठ होतो. त्यात काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस सहभागी झाले नव्हते. संविधानाचे सर्वांत मोठे नुकसान कोणी केले असेल, तर ते





काँग्रेसने. प्रशिक्षणाच्या काळात आम्हाला शिकवले जात होते की, संविधानात बदल केला जाऊ शकत नाही, मौलिक अधिकार हिसकावले जाऊ शकत नाही. पण, आणिबाणी लागू करीत काँग्रेसने नागरिकांचे मूलभूत अधिकारही हिसकावले. आणिबाणीच्या काळात संविधानाची मोडतोड करीत, त्यात समाजवादी आणि सेक्युलर हे शब्द घुसवण्याचे काम काँग्रेसने केल्याने संविधानाचा आत्मा हरपला, असा दावा ब्रज लाल यांनी केला.

जवाहरलाल नेहरू यांनी सर्व मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते की, आम्हाला आरक्षण नको, याची खा. ब्रज लाल यांनी आठवण करून दिली. ते म्हणाले की, संविधानाने लागू केलेले आरक्षण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने निर्णय देऊनही अलिगढ विद्यापीठाने आजतागायत दिले नाही. काँग्रेसने अलिगढ विद्यापीठासाठी कायदा बदलून दलितांना आरक्षणापासून वंचित ठेवले.

या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी कायदे तयार करून दलितांना न्याय दिला. नागरिकत्व सुधारणा कायद्याचा (सीएए) सर्वाधिक फायदा दलितांना झाला. फाळणीच्या वेळी पाकिस्तानात गेलेल्या आणि तिथे अत्याचार झाल्यानंतर भारतात परतलेल्या दलितांना या कायद्यामुळे भारताचे नागरिकत्व मिळाले. इंदिरा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांना भारतरत्न मिळाले. पण, संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेबांना भारतरत्न दिले गेले नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. ◂(वृत्तसंस्था)

## राजकारणातील सर्व पुतण्यांचा डीएनए सारखाच : भुजबळ

◆ **मुंबई, २६ ऑक्टोबर**

राजकारणात पुतणे काकांचे ऐकत नाहीत, असा काहिसा अनुभव राजकारणातील सर्वच काकांना आलेला असून, सगळ्याच पुतण्यांचा डीएनए सारखाच असल्याची कोपरखळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळांनी मारली.

छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी महायुतीचा हात सोडून नांदगाव-मनमाड मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढण्याचा निर्णय जाहीर केला. त्याबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर छगन भुजबळ बोलत होते. भुजबळ म्हणाले की, शरद पवार यांचे पुतणे, अजित दादांचे पुतणे आणि गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे, बाळासाहेब ठाकरे यांचे पुतणे हे सर्व काकांचे ऐकत नाही, असे वाटते. राजकारणात सगळे पुतणे सारखेच आहेत. त्यांचा वेगळाच डीएनए आहे. ◂(वृत्तसंस्था)

## इति-उवाच...



मी ठाकरेंचा निष्ठावंत आहे. मी दोघांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला होता, पण दुर्दैवाने ते साध्य झाले नाही. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे विचार काही बाबतीत भिन्न आहेत. परंतु, भविष्यात ते एकत्र येतील, अशी माझी खात्री आहे. **बाळा नांदगावकर,** मनसे नेता



२०१७ मध्ये शिवसेनेने ७ पैकी ६ नगरसेवक मी आजारी असताना फोडले. हे खोके खोके बोलतात, त्यांनी किती खोके दिले, हे मलाही माहिती आहे. ते कसे आहेत, मला कळले. त्यामुळे अशा लोकांपासून थोड दूर राहिलेले बरे... **अमित ठाकरे,** मनसे नेता



राजकीय फोडाफोडी झाली आणि कोण कोणाकडे गेले, यापेक्षा जनतेच्या विकासकामांचा मुद्दा महत्त्वाचा आहे. राजकारणात असो किंवा जातीपातीचे असो, फोडाफोडीचे नोबेल असते, तर ते शरद पवारांनाच मिळायला हवे. **उदयन राजे भोसले,** खासदार



राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट झाले असले, तरी शरद पवार यांचा मला दुरून आशीर्वाद राहणार आहे. महालेंना मी विनंती करणार आहे आणि ते उमेदवारी अर्ज मागे घेतील, याचा मला विश्वास आहे. **नरहरी झिरवळ,** विधानसभा उपाध्यक्ष





## राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या यादीत झिशान सिद्दिकी

◆ **मुंबई, २६ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रसने शुक्रवारी त्यांची दुसरी यादी जाहीर केली. यात आमदार झिशान सिद्दिकी आणि भाजपाच्या दोन माजी खासदारांसह सात उमेदवारांचा समावेश आहे. झिशान सिद्दिकींचे वडील बाबा सिद्दिकी यांची या महिन्याच्या सुरुवातीला गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत क्रॉस व्होटिंग केल्याबद्दल झिशान यांना काँग्रेसमधून निलंबित करण्यात आले होते. सार्वत्रिक निवडणुकीत सांगलीतून अयशस्वी झालेले भाजपचे माजी खासदार संजय काका पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे तिकीट देण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)

## पाचोऱ्यात बहीण-भावात लढत

◆ **जळगाव, २६ ऑक्टोबर**

जळगाव जिल्ह्यातील पाचोरा मतदारसंघात शिवसेनेचे विद्यमान आमदार किशोर पाटील यांना त्यांच्या बहिणीने आव्हान दिले आहे. यामुळे भाऊ-बहिणीची ही लढत लक्षणीय ठरणार आहे. विद्यमान आमदार किशोर पाटील यांच्या विरोधात ठाकरे गटाकडून वैशाली सूर्यवंशी रिंगणात आहेत.

पाचोरा मतदासंघासाठी एकनाथ शिंदेंच्या पक्षाकडून आमदार किशोर पाटील यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. प्रतिस्पर्धी ठाकरे गटाने वैशाली सूर्यवंशी यांना उमेदवारी दिली. वैशाली या पाचोऱ्याचे माजी आमदार दिवंगत आर. ओ. पाटील यांच्या कन्या असून, किशोर पाटील हे त्यांचे चुलत बंधू आहेत. मागील दोन निवडणुकांमध्ये आमदार किशोर पाटील यांना पाचोऱ्यातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून आव्हान मिळत होते. या निवडणुकीत खुद्द त्यांचीच बहीण त्यांना लढत देण्यासाठी सज्ज झाली आहे. आर. ओ. पाटील हयात असेपर्यंत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचे समर्थक राहिले होते.◂(वृत्तसंस्था)

# संपूर्ण शहराचा मतदानावर बहिष्कार!

**साक्री, २६ ऑक्टोबर**

निवडणूक आली की गावे मतदानावर बहिष्कार टाकतात, हे आजवर ऐकिवात होते. परंतु, आता एका मोठ्या शहराने निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे शस्त्र उपसले आहे.



साक्री तालुक्यातील पळनेर शहर व परिसरातील नागरिकांनी विधानसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. याचा प्रस्ताव एकमुखाने मंजूर करण्यात आला असून, झोपलेल्या प्रशासनास जागे करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यावर पिंपळनेरकर ठाम राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या पाच वर्षांपासून पिंपळनेर शहरातील राष्ट्रीय महामार्ग ७५५ चे मुख्य रस्त्याचे काम प्रलंबित आहे. मोठमोठे खड्डे व रस्त्याच्या कडेला मोठ्या गटारी खोदून ठेवलेल्या आहेत. पिंपळनेरकरांनी अनेक आंदोलने केली, रास्तारोको केले, आमरण उपोषणाला बसले. या रस्त्यावर शेकडो अपघातही झाले. तरी प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. यासंदर्भात याचिकाकर्त्यांनी अतिक्रमण व हद्दी संदर्भात न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालय जो निर्णय देईल, तो सर्व पिंपळनेरकरांना मंजूर आहे. परंतु गेल्या पाच वर्षांपासून जेटी पॉईंट ते सामोडे चौफुलीपर्यंतच्या रस्त्याची पुरती वाट लागली आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, धूळ व खड्ड्यांमुळे सर्वसामान्य जनतेला त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासन याकडे अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने पिंपळनेर व आसपासच्या शेकडो नागरिकांनी एकत्रित येऊन एकमताने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ◂(वृत्तसंस्था)

# अमित शाह याला दारात तरी उभे करतील का?

## हर्षवर्धन पाटलांवर जोरदार हल्ला

◆ **पुणे, २६ ऑक्टोबर**

काही दिवसांपूर्वी भाजपातून शरद पवार यांच्या पक्षात गेलेले हर्षवर्धन पाटील यांच्यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी जोरदार हल्लाबोल केला. इंदापूरमध्ये दत्तात्रय भरणे यांच्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर अजित पवारांनी हर्षवर्धन पाटील यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आपल्या दारात उभे तरी करतील का, असे म्हणत त्यांची खिल्ली उडवली आहे.

इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अजित पवार यांच्या उपस्थितीत भरणे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मी जिल्हा सांभाळत होतो, सत्तेत असताना तुम्हाला फक्त इंदापूर सांभाळता आले नाही. कर्मयोगी कारखाना दुसऱ्याच्या ताब्यात गेला नाही, तर त्या कारखान्याचे वाटोळे होणार आहे. त्यात आपल्याला लक्ष घालावे लागेल. इंदापूरला पाणी कुठून



आणायचे, कसे आणायचे, त्याची जबाबदारी माझी. माझे आणि देवेंद्र फडणवीस यांचे बोलणे झाले आहे. काँग्रेसवाल्यांनी जेवढी तरतूद केली नाही, तेवढी आम्ही अल्पसंख्यक लोकांसाठी केली आहे. लोकांच्या भुलथापांना बळी पडू नका, हे खोटे बोलतात. महाराष्ट्राचे उद्योग गुजरातला गेल्याचे सांगतात. पण, महाराष्ट्र गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर आहे. लाडकी बहीण योजना बंद केल्याचे सांगतात, असे म्हणत फेक नॅरेटीव्हवरून अजित पवारांनी महाविकास आघाडीवर हल्ला चढविला. ◂(वृत्तसंस्था)

# कोकणात एकही खासदार आला नाही, आता आमदारही येऊ देणार नाही

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गरजले

◆ **ठाणे, २६ ऑक्टोबर**

लोकसभा जिंकण्यासाठी त्यांनी जंग जंग पछाडले. मात्र, त्यांची पळता भुई थोडी झाली. बाळासाहेबांचे विचार सोडले. त्यामुळेच कोकणने त्यांची साथ सोडली. आता एकही आमदार कोकणात दिसणार नाही. कोकणात एकही खासदार आला नाही, आता आम्ही एकही आमदार येऊ देणार नाही; सगळे किल्ले उद्ध्वस्त झाले, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरेंवर टीका केली.



एकनाथ शिंदे म्हणाले, महाविकास आघाडीने बंद पडलेले प्रकल्प, स्थगिती दिलेले प्रकल्प आम्ही सुरू केले. विकासाचे प्रकल्प, कल्याणकारी योजना, लाडकी बहीण सारख्या अनेक योजना आणल्या. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर उद्योग आले आहेत. जनता जनार्दन येणाऱ्या काळात आमच्या कामाची पोचपावती देईल. महायुतीचे सरकार, बहुमताचे सरकार महाराष्ट्रात येईल. आम्ही पुन्हा एकदा जनतेची सेवा करण्यास तयार आहोत.

**आमचा स्ट्राईक रेट ४७ टक्के**

एकनाथ शिंदे म्हणाले, महायुतीत कोणताही वाद नाही. चांगले वातावरण आपण महाराष्ट्रात पाहात आहे. महायुतीच्या जागा वाटपाचा तिढा लवकरच सुटेल. तुम्हाला सर्व आजच सांगणार नाही. काही बाबी नंतर सांगण्यात येतील. लोकसभा निवडणुकीत धनुष्यबाण जिंकलेला आहे. लोकसभेत आम्ही १३ जागा समोरासमोर लढल्या. त्यातल्या सात जागा जिंकल्या. आमचा ४७ टक्के स्ट्राईक रेट होता, त्यांचा ४० टक्के स्ट्राईक रेट होता. त्यांच्यापेक्षा २ लाख ६० मत आम्ही जास्त घेतली आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# रावेरमध्ये चौधरी परिवाराची चौथी पिढी राजकारणात

◆ **जळगाव, २६ ऑक्टोबर**

रावेर मतदारसंघातून काँग्रेसने शिरीष चौधरी यांच्याऐवजी त्यांचे पुत्र धनंजय चौधरी यांची उमेदवारी जाहीर केली आहे. यानिमित्ताने चौधरी परिवाराची चौथी पिढी रावेर तालुक्याच्या राजकारणात उतरली आहे.

स्वातंत्र्य चळवळीला चालना देण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ५० वे ग्रामीण अधिवेशन डिसेंबर १९३६ मध्ये फैजपूर येथे आयोजित करण्यात आले होते. फैजपूर येथे अधिवेशनाचे आयोजन करण्यामागे स्वातंत्र्य चळवळीतील धनाजी नाना चौधरी यांचा मोठा सहभाग होता. खिरोदा हे धनाजी चौधरींचे गाव. १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत 'भारत छोडो'ने संपूर्ण देशात जोर घेतल्यानंतर धनाजी चौधरी यांना अटक झाली होती. शाळेतील २५ विद्यार्थ्यांना कारागृहात डांबण्यात आले होते, त्यात धनाजी चौधरी यांचे पुत्र मधुकरराव चौधरी हेदेखील होते. वडिलांच्या निधनानंतर मधुकरराव चौधरी यांनी राजकारणात सहभाग घेणे सुरू केले. १९५७ मध्ये ते प्रथमच काँग्रेसचे रावेर मतदारसंघातील आमदार झाले. त्यानंतर तब्बल २४ वर्षे राज्याच्या राजकारणात ते सक्रिय राहिले. १९९० मध्ये ते विधानसभेचे अध्यक्षही झाले होते. राज्याच्या मंत्रिमंडळात १९५७ ते १९७८ या २१ वर्षांच्या कालावधीत मधुकरराव चौधरी यांनी १३ विभागाचे मंत्री म्हणून काम पाहिले. शिक्षण, अर्थ, नियोजन, महसूल, पाटबंधारे, ऊर्जा, आरोग्य, नगरविकास, सांस्कृतिक कार्य विभाग, वनविभाग आदी खात्यांची त्यांनी जबाबदारी पाहिली. रावेर तालुक्यातील खिरोदा येथील जनता शिक्षण मंडळाचे ते संस्थापक होते. ◂(वृत्तसंस्था)

# छगन भुजबळांची मालमत्ता ११.२० कोटींची, आठ खटले

## पत्नीच्या नावे १६ कोटींची संपत्ती

◆ **नाशिक, २६ ऑक्टोबर**

राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांच्याकडे असलेली एकूण मालमत्ता ११ कोटी २० लाख ४१ हजार रुपयांची असून, त्यांच्यावर २४ लाख ५६ हजार रुपयांचे कर्ज असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यांच्या पत्नीच्या नावावरील मालमत्ता १६ कोटी ५३ लाख रुपयांची असून, त्यांच्या नावावर २१ लाख १० हजार २५० रुपयांचे कर्ज आहे.

२०१९च्या तुलनेत भुजबळ यांची मालमत्ता ९ लाख रुपयांनी वाढली आहे. छगन भुजबळ यांच्याकडील जंगम संपत्ती १ कोटी ३२ लाख ६६ हजार २३५ रुपयांची असून, स्थावर संपत्ती ३२ लाख २ हजार ४९९ रुपयांची आहे. मीना भुजबळ यांच्या नावे २ कोटी ३८ लाख २९ हजार ५२ रुपयांची जंगम, तर ८६ लाख २१ हजार ५७२ रुपयांची स्थावर मालमत्ता आहे.

भुजबळ यांच्याकडे एक कार असून, त्यांच्या पत्नीच्या नावे टाटा पिकअप वाहन आहे. उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात भुजबळ यांनी ही माहिती दिली. याशिवाय भुजबळ यांच्याकडे ५८५ ग्रॅम सोने असून, त्याचे मूल्य ४२ लाख १२ हजार रुपये आहे. त्यांच्या पत्नी मीना यांच्याकडे ३२ लाख ७६ हजार रुपयांचे ४५५ ग्रॅम सोने, ४ लाख ३७ रुपयांची ५,१५० ग्रॅम चांदी तसेच २२ लाख ५ हजार रुपयांच्या अन्य मौल्यवान वस्तू आहेत. याशिवाय भुजबळ यांच्या नावे दोन ठिकाणी शेतजमिनी व दोन घरे आहेत.

भुजबळ यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या खटल्यांसह एकूण आठ खटले प्रलंबित असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे. ◂(वृत्तसंस्था)



पुण्याच्या कोथरूड मतदारसंघातील मनसेचे उमेदवार किशोर शिंदे यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाताना भव्य रॅली काढली होती. यात त्यांचे शेकडो समर्थक सहभागी झाले होते



# दिवसभरात ५२ कोटींची मालमत्ता जप्त

## बेहिशेबी रकमेची पाळेमुळे शोधा : निवडणूक आयोगाची सूचना

◆ **मुंबई, २६ ऑक्टोबर**

राज्यात निवडणूक काळात बेहिशेबी रक्कम सापडत असते. या रकमेच्या जप्तीची कारवाई करून स्वस्थ न बसता ही रक्कम नेमकी कोणाकडून कोणाला जाणार होती, याची पाळेमुळे खणून काढण्याच्या सूचना पोलिस तसेच संबंधित यंत्रणांना दिल्याची माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली.

गुरुवारी एकाच दिवशी ५२ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. लोकसभा निवडणूक काळात एकूण ३६६ दखलपात्र गुन्हे दाखल झाले होते. आचारसंहिता, सोशल मीडिया आदींशी संबंधित प्रकरणांचा त्यात समावेश होता. यापैकी ३०० गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल असून, आता त्यांची न्यायालयीन प्रक्रिया सुरू झाली असल्याची माहितीही कुलकर्णी यांनी दिली.

**चोपड्यात ३० लाख, नगरमध्ये ७ लाख**

मध्यप्रदेशातील बलवाडी येथून जळगावकडे जाणाऱ्या एका वाहनात ३० लाखांची रक्कम आढळून आली. चोपडा येथील तिरंगा चौकात बुधवारी मध्यरात्री या वाहनाची तपासणी केली असता, ही रोकड आढळली. ही रोकड वाहनासह चोपड्यातील महसूल विभागाकडे देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. दुसऱ्या घटनेत अहल्यानगर येथे नगर-पुणे रस्त्यावर कायनेटिक चौकात गुरुवारी पहाटे पुण्याहून जळगावकडे जाणाऱ्या वाहनात सात लाखांची रोकड सापडली. ◂(वृत्तसंस्था)

## संस्कृती मंचतर्फे आयोजित दिवाळी पहाटमध्ये पं. आनंद भाटे यांचे गायन

जालना/प्रतिनिधी - गत १६ वर्षापासून संस्कृती मंच जालनातर्फे दिवाळी पहाटचे आयोजन करण्यात येत असून, यावर्षी दि. ३० ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वाजता जुना जालना विभागातील मुक्तेश्वर सांस्कृतिक सभागृहात होणार्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेते ख्यातनाम गायक पं. आनंद भाटे (आनंद गंधर्व) यांचे सुश्राव्य गायन होणार आहे.

आतापर्यंत अनेक दिग्गज कलावंतांनी या समारंभात हजेरी लावलेली आहे. यंदाच्या दिवाळी पहाट कार्यक्रमात सुप्रसिद्ध निवेदिका अनघा मोडक यांचे निवेदन व

प्रशांत पांडव, सुयोग कुंडलकर, गोपाल खोमणे, ललित चोबे यांची साथ संगत लाभणार आहे.

जालनेकर रसिकांनी दिवाळी पहाट कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे व निशुल्क प्रवेशिकांसाठी आरती फूड्स शनी मंदिर जुना जालना, हॉटेल मधुबन छत्रपती शिवाजी महाराज चौक , ओमकार एंटरप्राइजेस गोकुळनगरी, क्टिव कॉम्प्युटर्स मंमादेवी मंदिराजवळ मस्तगड, देकु केटरर्स मुक्तेश्वर लॉन्स जुना जालना येथे संपर्क करावा, असे आवाहन संस्कृती मंचतर्फे करण्यात आले आहे.

# कोल्हारी गावातील असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपात जाहीर प्रवेश

## भीमराव केराम यांना निवडून आणण्याचा कार्यकर्त्यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २६ ऑक्टोबर**

भीमराव केराम यांना भारतीय जनता पक्षाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर किनवट माहूर तालुक्यातील वेगवेगळ्या समुदायातील व वेगवेगळ्या पक्षाचे असंख्य कार्यकर्ते भारतीय जनता पक्षात प्रवेश करू लागले आहेत किनवट शहर,गोकुंदा,सुभाषनगर, इस्लामपुरा या भागातील शेकडो मुस्लीम कार्यकर्त्यांनी नुकताच भाजपात प्रवेश केल्यानंतर किनवट तालुक्यातील कोल्हारी येथील शिवशंकर जाधव आकाश कुडलुपवार यांनी त्यांच्या शेकडो



समर्थकासह भाजप नेते प्रतीक केराम व ओबीसीआघाडीचे नेते बाबुराव केंद्रे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षातत जाहीर प्रवेश केला आहे.

आमदार म्हणुन भीमराव केराम यांनी अल्पशा कालावधीत जनतेच्या विकासात्मक अपेक्षांची पूर्तता केली आहे. त्यांच्या विकास कार्यावर प्रभावित होऊन वेगवेगळ्या समाजातील व वेगवेगळ्या पक्षातील शेकडो कार्यकर्ते भारतीय जनता पक्षाकडे वळताना दिसून येत आहेत भीमराव केराम यांना पक्षाने दुसऱ्यांदा उमेदवारी जाहीर केल्यानंतर किनवटशहर, गोकुंदा, सुभाषनगर, इस्लामपुरा येथील असंख्य मुस्लिम समाजातील कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात नुकताच जाहीर प्रवेश केला असून आता ग्रामीण भागातूनही भाजपला मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळू लागला आहे. भीमराव केराम यांच्या नेतृत्वाला प्रभावित होऊन किनवट तालुक्यातील मौजे कोल्हारी येथील शिवशंकर जाधव, आकाश कूडलुपवार,, संतोष बत्तीवाड,मिथुन हराळे सचिन हराळे राम डंके संजय आगलावे,देवराव तुंगेवाड,बाबुराव तुंगेवाड, पांडुरंग बलपेलवाड, सुभाष शेरे,आकाश शेरे, सुदर्शन शेळके लोकेश करेवाड नागोराव हराळे सुरज बलपेलवाड यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी दिनांक २६ ऑक्टोबर रोजी आ.केराम यांच्या किनवट स्थित निवासस्थानी भाजपाचे युवा नेते प्रतीक केराम व विधानसभा निवडणूक प्रमुख बाबुराव केंद्रे यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे.या पक्षप्रवेशामुळे कोल्हारी भागात भाजपला बळकटी प्राप्त होणार असल्याचे बोलले जात आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विचार स्वीकारण्यासाठी भाजपाला साथ द्या : शिवानंद हैबतपुरे

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. २६ ऑक्टोबर**

विकसीत भारताकडे आगेकुच करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विचार स्वीकारण्यासाठी लिंगायत समाज बांधवांनी भारतीय जनता पार्टीला साथ देणे गरजेचे आहे असे मत भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते तथा संस्थापक लिंगायत जनशक्ती बसव भारतीचे संस्थापक शिवानंद हायतपुरे यांनी नायगांव येथे आयोजित हिंदू विरशैव लिंगायत मतदार जागृती मेळाव्यात बोलतांना व्यक्त केले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नायगाव शहरातील जयराज पॅलेस येथे दिनांक २५ ऑक्टोबर रोजी हिंदू वीरशैव लिंगायत मतदार जागृती मेळावा पार पडला असून याप्रसंगी व्यासपीठावर राज्यसभा खासदार अजित गोपछडे , शिवानंद हैबतपुरे , आमदार राजेश पवार , माजी जि .प .सदस्या पूनम पवार , गंगाधर बडूरे (शिवसेना ) , हावगीराव गोपछडे , उमाकांत गोपछडे , परमेश्वर गुरुजी धानोरकर , श्रीहरी देशमुख , देविदास बोमनाळे , शिवाजी पन्नासे (शिवसेना), डॉ.कहाळेकर , रंजीत कुरे , श्रीहरी देशमुख , सोपान कदम , युवराज लालवंडे , राजेंद्र पाटील , माधव पा. बेंद्रीकर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती .

पुढे बोलताना शिवानंद हैबतपुरी म्हणाली की नायगाव उमरी धर्माबाद मतदारसंघाच्या विकासकामे सर्वाधिक निधी आणणाऱ्या आमदार राजेश पवार यांच्या पाठीमागे लिंगायत समाज बांधवांना भक्कमपणे उभे राहा आगामी काळात आपल्या लिंगायत समाजाच्या सोबत राहतील . असे सांगून भारतीय जनता पार्टीने डॉक्टर अजित गोचडे यांना राज्यसभेवर खासदारकी देऊन लिंगायत समाजाला न्याय दिला याबद्दल पक्षश्रेष्ठीचे आभार मानले .

**राजेश पवार हे नायगाव मतदारसंघाची बारामती करतील!- खा. अजित गोपछडे**

यावेळी खा. अजित गोपछडे म्हणाले की , आमदार राजेश पवार आणि त्यांची सौभाग्यवती पुनम पवार ही महाराष्ट्रातील हिट जोडी आहे त्यांनी नायगांव मतदारसंघातील लिंगायत समाजाला एकत्र आणण्याचे काम केले स्वर्गीय संभाजी पवार यांनी उद्योग जगतात शून्यातून विश्व निर्माण केले होते .आणि राजकारणामध्ये शून्यातून विश्व निर्माण करणारा नेता राजेश पवार होय आपण साथ दिल्यास ते पुढील काळात नक्कीच नायगांव मतदार संघाची बारामती करतील या दुमत नाही . मी लिंगायत समाजाचा कार्यकर्ता आहे लिंगायत समाजाची वकील करीन आपण जात पाहीली नाही फक्त विकास हे ध्येय नजरेसमोर ठेवून कार्य केले मी लिंगायत समाजाचा आहे म्हणून मला पक्षाने खासदारकी दिली मी लिंगायत समाजाचे भलं करण्यासाठी कार्य करणार आहे .

**मी लिंगायत समाज बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन - राजेश पवार**

मागील काळात आपण मला जशी साथ दिली तसे मला पुढील काळात देखील आपली साथ कायम असू द्या मी आपल्या लिंगायत समाजाच्या विकास कामासाठी खंबीरपणे साथ देईन असे अभिवचन देऊन महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे नमूद केले .या मेळाव्याला रमेश पाटील शेटकर , यादवराव कोळनुरे , विकास भुरे , निळकंठ पाटील यांसह नायगाव उमरी धर्माबाद मतदारसंघातील असंख्य लिंगायत समाज बांधव उपस्थित होते.

# श्री गंगा हॉस्पिटलमध्ये ७ व्यांदा यशस्वी किडनी प्रत्यारोपण..!

## श्री गंगा हॉस्पिटलच्या टीमच्या प्रयत्नांना यश : .ग्रीन कॉरीडॉर व्दारे परभणी येथून आणली किडनी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर**

येथील शिवाजीनगर भागातील श्री गंगा हॉस्पिटल येथे श्री विलास मारोती कुंटूरे हा ३८ वर्षीय तरूण किडनी निकामी झाल्यामुळे डायलिसिस वर होता व त्यास मागील १० वर्षापेक्षा जास्त काळापासून दरमहीन्याला डायलिसिसवर निर्भर राहावे लागायचे दरम्यान परभणी येथील देवगिरी हॉस्पिटल येथे ब्रेनडेड मुळे सार्थक प्रविण नवले या जिंतूर येथील १९ वर्षीय तरुणाचा बुधवार दि.२३ रोजी मृत्यू झाला होता अशा दुःखद प्रसंगी सामाजिक बांधिलकी जपत त्याच्या पालकांनी अवयवदानाचा निर्णय घेतला होता तो निर्णय विलास कुंटूरे यांना पुर्नजन्म मिळवून देणारा ठरला आहे.

याविषयी अधिक माहीती देतांना श्रीगंगा हॉस्पिटलच्या वतीने सांगण्यात आले की, परभणी जिल्हयातील जिंतूर येथील १९ वर्षीय युवक सार्थक नवले याचा बेनडेड मुळे परभणी येथील देवगिरी हॉस्पिटल येथे मृत्यू पावला होता व यानंतर देवगिरी हॉस्पिटलचे संचालक न्युरोसर्जन डॉ.एकनाथ गबाळे, न्युरोलॉजिस्ट डॉ.अतुल जाधव व छातीरोग तज्ञ डॉ.रामचंद्र कदम यांनी सार्थक च्या कुंटूबिंयाना अवयवदानाचे महत्व विषद करून त्यांना मृत्यूपश्चात अवयवदानासाठी तयार केले तदनंतर रितसर नोंदणी व प्रक्रीया पार पाडल्यानंतर नांदेड येथील श्री गंगा हॉस्पिटलचा रुग्ण श्री विलास कुंटूरे यांच्यासाठी किडनी प्रत्यारोपण करावयाचे ठरले व त्यानुसार श्री गंगा हॉस्पिटलची संपूर्ण टिम परभणी येथे गुरूवार दि.२४ रोजी रवाना झाली होती ..

श्री गंगा हॉस्पिटलच्या व देवगिरी हॉस्पिटलच्या टिमने परिश्रम घेत सार्थक च्या किडनीचे ग्रिनकॉरीडॉर व्दारे परभणी येथून नांदेडात अवघ्या ९0 मिनिंटात अंतर पूर्ण करत किडनी रुग्ण श्री विलास कुंटूरे यास यशस्वीरीत्या प्रत्यारोपण करत पुर्नजन्म दिला आहे.

श्री गंगा हॉस्पिटलच्या टिमच्या वतीने अधिक माहिती देताना सांगितले की सदरील रुग्णांस मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी किडनी प्रत्यारोपणांसाठी सहाय्य केले आहे त्याबद्दल रुग्णाच्या नातेवाईकांनी मानले किडनी तज्ञ डॉ.शहाजी जाधव व श्री गंगा हॉस्पिटलच्या संपूर्ण टिमचे आभार मानले आहेत

श्रीगंगा हॉस्पिटलमधील किडनी तज्ज्ञ डॉ. शहाजी जाधव यांच्यासह किडनी तज्ञ डॉक्टर डॉ. राजीव राठोड, डॉ.शिवराज टेंगसे या किडनी तज्ञांचे विशेष सहाय्य लाभले आहे संपर्णू श्री गंगा हॉस्पिटलच्या टिमवर्कच्या माध्यमातून किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली यावेळी या शस्त्रक्रियेसाठी डॉ. राजीव राठोड, डॉ. शिवराज टेगसे, डॉ. प्रमोल हंबर्डे, डॉ. शहाजी जाधव, डॉ. जयश्री कागणे, डॉ. अंजली गोरे, डॉ. पवन, डॉ. सतीश राठोड, डॉ. सोनाली राठोड यांच्यासह डॉ राजेश्वर पवार डॉ. विजय कांगणे, डॉ. संदीप गोरे, डॉ. लक्ष्मीकांत भोपळे, डॉ. मनीषा मुंडे, डॉ. सूचिता पेक्केमवार, डॉ. नामदेव चौरे, डॉ. चंदू पाटील आदींनी प्रयत्न केले

**अवयवदान काळाची गरज**

अवयवदान हे एक निस्वार्थी कृत्य आहे जे जीव वाचवू शकते, आशा देऊ शकते आणि चिरस्थायी वारसा सोडू शकते. अवयव निकामी झाल्याने दरवर्षी असंख्य जीव गमवावे लागतात. हृदयविकार, मूत्रपिंड निकामी होणे, यकृत निकामी होणे आणि बरेच काही यांसारख्या विविध आजारांनी ग्रस्त असलेल्यांना अवयव प्रत्यारोपण जीवनात दुसरी संधी देते. अवयवदान हा एक उल्लेखनीय उपाय आहे जो अनेक गरजू व्यक्तींसाठी जीवन आणि मृत्यूमधील अंतर कमी करू शकतो.

## जालनातून अपक्ष उमेदवार भास्कर मुकुंदराव दानवे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

जालना : जालना विधानसभा मतदार संघातून विधानसभा निवडणूक २०२४ साठी मा भास्कर मुकुंदराव दानवे यांनी आज गुरुपुष्यामृत दिनी गुरुवार (दि.२४) रोजी निवडणूक निर्णय अधिकारी हरकळ साहेब यांच्याकडे आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

श्री भास्कर मुकुंदराव दानवे यांनी अर्ज दाखल करण्याआधी श्री क्षेत्र राजुर गणपती चे दर्शन घेतले तसेच घरून निघतांना त्यांचे औक्षण करण्यात आले. कुटुंबियांनी त्यांना विजयी होण्यासाठी आशीर्वाद दिले. अर्ज दाखल करताना यावेळी त्यांच्यासोबत अशोकआण्णा पांगारकर, सिद्धिविनायकजी मुळे, विमलताई आगलावे, विजयजी कामड हे देखील उपस्थित होते,. यावेळी माजी जि प सदस्य, प स सदस्य, नगरसेवक, सरपंच व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## फ्रीस्टाइल फुटबॉल खेळल्याने मानसिक आरोग्य विकसित करते : जेमी नाइट



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २६ ऑक्टोबर :** फ्रीस्टाइल फुटबॉल शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत करते आणि वाढीच्या मानसिकतेचे महत्त्व शिकवते, असे प्रतिपादन कॅनडा येथील फ्रिस्टाइल फुटबॉलपटू जेमी नाईट यांनी केले.

पोद्दार इंटरनॅशनल स्कुलमधील विद्यार्थ्यांना त्यांनी गुरुवारी (दि. २४) फ्रीस्टाइल फुटबॉलचे प्रशिक्षण दिले. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, की स्कुलमधील विद्यार्थ्यांचा फुटबॉलवर असलेला विश्वास हा कौतुकास्पद आहे. फुटबॉल खेळामुळे जागतिक स्तरावर खेळाडू बनण्याची क्षमता असते. याशिवाय जीवनकौशल्य विकसित करण्यासही मदत होते. तसेच भविष्यात भारताचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या खेळाकडे अधिक लक्ष देऊन जागतिक किर्तीचे खेळाडू बनण्याचेही आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत. त्यांनी नांदेडला प्रथमच भेट दिली. ते जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी 'असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रिस्टाईलपैकी एक आहेत. भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे हा माझा उद्देश आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी पोदार एज्युकेशन नेटवर्कचे संचालक हर्ष पोदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

# चार महिन्यापूर्वी 'पाला'वरून अपहरण झालेला ७ वर्षाचा बालक दिल्लीत सापडला.!

## अंबड पोलिसांच्या शर्थीच्या प्रयत्नांना अखेर यश; अंबड पोलिसांचे पथक बालकाला सोबत घेऊन दिल्लीहून जालन्याकडे रवाना

अबंड/ तालुक्यातील रवना -पराडा दर्ग्याजवळच असलेल्या गोंधळवाडी येथील पारधी वस्तीवरील पालावरून चार महिन्यांपूर्वी जुलै २०२४मध्ये सोमनाथ वनेश शिंदे हा ७ वर्षाचा मुलगा अचानक गायब झाला होता सदर मुलाचा नातेवाईकांनी परिसरातील पारधी समाजाच्या वस्त्यांसह जिल्ह्यात सर्वत्र शोध घेतला होता, मात्र तो सापडत नव्हता दरम्यान याप्रकरणात अंबड पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून, आई-वडिलांपासून पारखे झालेल्या या मुलाच्या शोधासाठी पोलिसांनी तपासचक्रे गतीने फिरविली अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे आणि पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी पोलीस हवालदार विष्णू चव्हाण यांच्यासह एक पथक स्थापन केले

संपूर्ण महाराष्ट्रासह परराज्यात सर्व पोलिसांना या मुलाच्या छायाचित्रांसह माहिती कळवून,अशा वर्णनाचा मुलगा सापडल्यास संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले होते आई-वडीलासह पालावर राहत असल्याने आणि एका ठिकाणी कायम वास्तव्य नसल्याने या मुलाचे आधारकार्ड बनविण्यात आलेले नव्हते, त्यामुळे त्याचा शोध घेण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते

चार महिन्यापासून या मुलाच्या शोधासाठी शर्थीचे प्रयत्न करीत असतानाच दिल्लीच्या हजरत निजामुद्दीन रेल्वेस्थानकात एक मुलगा दीड महिन्यांपूर्वी बेशुद्धावस्थेत आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती या त्रोटक माहितीच्या आधारे पोलिसांनी दिल्ली येथील बालकल्याण समितीच्या अधिकार्यांशी संपर्क करून, त्या मुलाची माहिती घेत त्याचे छायाचित्र मागवून घेतले असता, तो सोमनाथ हाच असल्याचे स्पष्ट झाले

त्यानंतर पोलीस हवालदार विष्णू चव्हाण, पोलीस अंमलदार हिरामण फलटणकर यांनी सोमनाथच्या मामा आणि मामीला सोबत घेऊन काल दिल्ली गाठली दिल्ली येथील न्यायालयात कायदेशीर ताबा घेण्यासाठी पोलीस पथक गेले असतांना बालकल्याण समितीच्या अधिकार्यांच्या वाहनातून आलेल्या सोमनाथने पळत येऊन मामाला मिठ्ठी मारताच त्याठिकाणी असलेल्या पोलीस आणि अधिकार्यांना अक्षरशः गहिवरून आले दीड महिन्यांपूर्वी सोमनाथ हा दिल्लीत निजामुद्दीन रेल्वेस्थानकात बेशुद्धावस्थेत आढळून आल्यानंतर त्याला बालकल्याण समितीने सामाजिक संस्थांच्या मदतीने एका रुग्णालयात दाखल केले होते. सोमनाथ याच्यावर तब्बल ८ दिवस आयसीयूमध्ये उपचार केल्यानंतर जवळपास दिडमहिना त्याच्यावर त्याच रुग्णालयात साधारण वार्डात उपचार सुरू होते, अशी माहिती बाल कल्याण समितीच्या अधिकार्यांनी दिली आहे

सोमनाथच्या मदतीसाठी देवासारखे धावून आलेले दिल्ली येथील बालकल्याण समितीच्या प्रीती गुप्ता, त्यांचे अधिकारी आणि अंबड पोलिसांच्या शर्थीच्या प्रयत्नामुळे चार महिन्यापासून आई-वडीलापासून दुरावलेल्या सोमनाथला अखेर आपले मायेचं छत्र मिळालं आहे. सोमनाथ यास दिल्लीहून घेऊन पोलीस पथक रेल्वेने जालनाकडे रवाना झाले आहे ही कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस आयुष नोपाणी, अंबडचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली अंबडचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस हवालदार विष्णू चव्हाण, पोना. हिरामण फलटणकर यांनी ही कामगिरी केली आहे

दरम्यान, सोमनाथ हा दिल्लीपर्यंत कसा पोहोचला..? त्याचे अपहरण झाले की तो गायब झाला..? हे तो सध्या अत्यंत भांबावलेल्या अवस्थेत असल्याने त्याला नीट सांगता येत नाही

## जिंतूर मतदारसंघात तिरंगी लढत; आघाडीत बिघाडी

### वंचीतच्या मताधिक्याची भिती कोणाला?तर वंचीतला विजयाची खात्री



सेलू : सेलू-जिंतूर विधानसभा मतदारसंघात तिरंगी लढत होणार असून महायुतीकडून उमेदवार आ. मेघना बोर्डीकर तर महाविकास आघाडीकडून माजी आ. विजय भांबळे तर सुरेश नागरे यांनी बंडखोरी करत वंचित बहुजन आघाडी कडून उमेदवारी मिळवत तिरंगी लढत रंगदार होणार आहे. सेलू-जिंतूर हा विधानसभा मतदारसंघ हा ओबिसी बहूल मतदार संघ आहे.यामध्ये वंजारी,धनगर,माळी व मायक्रो ओबीसी जातीचा समावेश आहे.लोकसभा निवडणूकीत वंचितला फारसा प्रभाव पाडता आला नसला तरी मात्र वंचीतच्या उमेदवारानी मतांची जूळवा जूळव केली होती. जिंतूर मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला सूटला आहे. यामूळे काँग्रेसला सोडून नागरे यांनी वंचीतची वाट धरली. दरम्यान माजी आमदार विजय भांबळे यांनी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे खासदार संजय जाधव यांना मतदार संघातून लिड दिली असल्याने तसेच मतदार संघात सर्वसामान्य मतदारात विजय भांबळे यांचा प्रभाव आहे.तर विद्यमान आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी मागील पाच वर्षात विकास कामे केली असल्याने त्यांचे विजयाचे समिकरण सूखकर होणार असल्याचा विश्वास आहे.दरम्यान मनोज जरांगे पाटील फॅक्टर सूद्धा महत्वाचा आहे मराठा समाजाच्या आरक्षणाचे भिजत घोंगडे यामूळे भारतीय जनता पार्टीवर समाजाची तिव्र नाराजी ही लोकसभेत दिसून आली. विधानसभा निवडणूकीत सूद्धा ही नाराजी कितीपत मतपेटीतून तिव्र होते हा प्रश्न आहे.तर सेलू व जिंतूर शहरात मूस्लीम मतदारांचे प्राबल्य आहे.जातीनिहाय मतविभागणीचे गणित उमेदवार कितपत हाताळण्यात यशस्वी होतात त्यावर विजयाचे समिकरण जूळणार आहे.मात्र सन २०१९ च्या विधनसभा निवडणूकीत माजी आमदार विजय भांबळे यांच्या पराभवास वंचीतचे उमेदवार मनोहर वाकळे हे कारणीभूत ठरले असल्याची चर्चा होती.विद्यमान आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी विजय संपादन केला होता.मात्र या निवडणूकीत परिस्थिती बदलली आहे.शेती मालाला हमिभाव मिळत नसल्याने शेतकरी त्रस्त तर लाडकी बहिण आनंदी आसल्याचे चित्र आहे.वंचीत बहूजन आघाडी चे उमेदवार निवडणूक दरम्यान किती मतदार आकर्षीत करणार यावर विजयाचे गणित जूळून येणार आहे.भाजपाच्या आमदार मेघना साकोरे बोर्डीकर व वंचीत बहूजन आघाडी चे उमेदवार सूरेश नागरे हे २८ आँक्टोंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून माजी आमदार विजय भांबळे हे २९ आँक्टोंबर रोजी उमेदवारी अर्ज भरणार आहेत.दरम्यान वंचीतच्या मताधिक्याची भिती कूणाला ?हा येणारा काळच सांगेल.तर काँग्रेसचे सचिव सूरेश नागरे यांनी बंडखोरी केल्याने पक्ष काय?कार्यवाही करेल हे ही महत्वाचे ठरणार आहे.

## तेजस सोनाळकरची तेजस्वी कामगिरी

टेंभुर्णी - येथील श्रीमती.जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा हरहुन्नरी अष्टपैलू खेळाडू विद्यार्थी तेजस सोनाळकर याने नुकत्याच झालेल्या विभागीय स्तरावरील- शालेय सायकलिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून तेजस सोनाळकर याची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजी नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४/१०/ २०२४.रोजी- छत्रपती संभाजी नगर शेंद्रा येथे झालेल्या विभागीय स्तरावरील-क्रीडा स्पर्धा पार पडल्या , या स्पर्धेत सायकलिंग क्रीडा प्रकारात श्रीमती.जे.बी.के. नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर याने चमकदार कामगिरी केली आहे ,त्यामुळे त्याची राज्यस्तरावरील स्पर्धे साठी निवड झाली. त्याच्या या निवडीचे नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव.सत्यनारायण सोनी, जेष्ठ संचालक मधुकर निकम, संचालक सुभाष राठी, ड.प्रेमसुख काबरा,विष्णू सांगुळे,प्रा.दत्ताराव देशमुख, प्रदिप काबरा, प्रदिप मुळे, सर्व संचालक मंडळ तथा प्राचार्य.नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराणे, सांस्कृतिक मंडळाचे प्रमुख एस.बी.बोरकर, क्रीडा अधिकारी, तसेच सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेचे पदाधिकारी श्री. चंद्रशेखर घुगे सर, क्रिडा विभाग प्रमुख कैलास भूतेकर, क्रिडा मार्गदर्शक राजेश शेवाळे,व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने हार्दिक अभिनंदन करून तेजस सोनाळकर यास राज्यस्तरीय होणा-या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## जालन्याच्या राजकारणात राजकीय भूकंप, भाजपाचे सुनिल आर्दड जालना विधानसभा लढणार

जालना/प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदार संघात आणखी एक राजकीय भुंकप झाला. त्यात जालन्याचे माजी नगराध्यक्ष व भाजपाचे नेते सुनिल आर्दड यांनी जालना विधानसभा मतदार संघात अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याची तयारी केली आहे. याबाबत त्यांनी २४ ऑक्टोंबरला पत्रकार परिषद घेवून घोषणाही केली.

जालना येथील अंबड रोडवरील मातोश्री निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे अकुशराव बोबडे, रमेश काळे, कैलास शेळके, अर्जुन मालोदे, प्रकाश गहिरे,प्रकाश जायभाये, मधुसूदन दंडारे आदिंची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना सुनिल आर्दड म्हणाले की, महायुतीमध्ये जालना विधानसभा मतदार संघाची जागा शिवसेना शिंदे गटाला सुटली. असे असले तरी जालना विधानसभा मतदार संघात माझे समाजपयोगी व विविध कामे आहेत. शहरातील प्रतिष्ठीत डॉक्टर, वकील, इंजिनिअर व इतरांनी मला जालना विधानसभत्त निवडणूक लढवावी अशी आग्रही मागणी केली आहे. त्यानुसार जनतेचा रेटा लक्षात घेवून., त्यांची मते जाणुन घेतल्यानंतर जालन्याहून निवडणूक लढविणार असल्याचे ते म्हणाले.

सन २००१ मध्ये जालन्यात नगरसेवक म्हणून निवडून आलो. राजकीय क्षेत्रात नगरसेवक, नगराध्यक्ष, भाजयुमो , जिल्हाध्यक्ष आदि पदांच्या माध्यमातून आपण भरीव काम केले. सामाजिक क्षेत्रात देखील आपण योगदान देण्याचे काम केले. शहरातील मातोश्री लॉन्समध्ये गत ३ वर्षापासून मोफत योग वर्ग भरवला आहे. श्री गणेश महासंघाच्या अध्यक्षपदाची जवाबदारी पार पाडून, समाजपयोगी काम केले. यासह रक्तदान शिबीर, कराटे प्रशिक्षण, आत्महत्याग्रस्त ३५ शतकर्यांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदत असे अनेक उपक्रम जालना शहरात राबविले असल्याचे सुनिल आर्दड यांनी सांगितले.

# चाकूचा धाक दाखवून वाटमारी करणाऱ्या दोन आरोपींना शिक्षा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ ऑक्टोबर –शहरातील खांडसरी परीसरातून घरी जात असताना तीन चोरट्यानी पदचाऱ्यास अडवून चाकूचा धाक दाखवून वाटमारी केल्या प्रकरणी दोन आरोपींना कन्नड न्यायालयात शिक्षा सुनावण्यात आली तर एकाची निर्दोष मुक्तता केली आहे. आकाश उर्फ भल्ला राजू सावंत वय १९ रा सर्मथनगर , अरबाज फेरोज शहा उर्फ काल्या वय १९ वर्ष, रा.टिळकनगर असे आरोपीचे नावे असून फिर्यादी जनार्दन काशिनाथ गायके रा. शिवनगर यांना वरील आरोपींनी चाकूचा धाक दाखवून गायके यांच्या गळ्यातील सोन्याचा पत्ता व त्याच्या खिशातील मोबाईल बळजबरी काढून घेतला व तिथून पळ काढला. या प्रकरणी प्रथमवर्ग न्यायाथीश श्रीमती अ. इ.आवटी यांच्या न्यायालयात सुनावणी होऊन आरोपी आकाश यास सहा महिने सश्रम कारावास व एक हजार रुपये द्रवदंडाची शिक्षा

आरोपी अरबाज शहा यास दोन महिने सश्रम कारावास व तिसरा आरोपी मनोज छब्बू साळवे, वय३५ रा. साठेनगर याची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड कन्नड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी व पोलीस अंमलदार विजय चौधरी यांनी केला होता.सरकारी वकील पी आर कुलकर्णी व एस व्ही देशमुख यांनी काम पाहिले तर भैरवी अधिकारी म्हणून पोलीस नाईक एस.डी. सुरवडे यांनी काम पाहिले.

# कुशल रोजगारनिर्मितीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे अभूतपूर्व पर्यटन करार

## रॉयल गोल्ड क्लब हॉस्पिटीलिटी प्रायव्हेट लिमिटेड दापोली आणि स्मिता हॉलिडेज प्रायव्हेट लिमिटेड छत्रपती संभाजीनगर यांचा सामंजस्य करार

छत्रपति संभाजीनगर – रॉयल गोल्ड क्लब रिसॉर्ट, दापोली आणि छत्रपती संभाजीनगर येथील स्मिता हॉलिडेज यांनी आज एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (चजण) साईन केला. या कराराचा उद्देश दोन्ही संस्थांमधील भागीदारीला अधिक बळकट करणे आहे. तसेच व्यवसाय विस्तार आणि सामंजस्य सहकार्याच्या माध्यमातून एकमेकांच्या क्षमता आणि तज्ञतेचा लाभ घेण्याची संधी निर्माण करणे आहे. यासह मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणे हा मुख्य उद्देश असल्याचे स्मिता हॉलिडेस चे संचालक जयंत गोरे यांनी सांगितले.या वेळी रॉयल गोल्डफील्ड क्लब चे कप्तान सचिन सुंदर,मिलिंद कोलते,स्मिता गोरे उपस्थित होते.




भारतातील मनुष्यबळ जगात सर्वोत्तम आहेत. अशा सामंजस्य करारांमुळे रोजगार आणि पर्यटनाला उद्योग समूहाशी थेट संबंध साधता येतो. काळानुसार पर्यटनाची संकल्पना बदलत आहे, यामध्ये क्लब कल्चर अग्रेसर आहे. अशा बदलत्या संकल्पनेची डोळसपणे दखल घेऊन रॉयल गोल्डफिल्ड क्लब रिसॉर्ट आणि स्मिता हॉलिडेजने हे कौतुकास्पद पाऊल उचलले आहे.

या माध्यमातून छत्रपती संभाजीनगरच्या पर्यटनाच्या कक्षा अधिकच रुंदावणार आहे. याद्वारे तब्बल ७२ विविध देशातील १३ परदेशी रिसॉर्ट क्लब महाराष्ट्रासोबत जोडणे हा उद्देश आहे. पर्यटन संस्था व रिसॉर्ट यांच्यात असे करार करण्याची गरज असून पर्यटनास हवा असलेला उद्योगाभिमुख रोजगार अशा करारांमधूनच मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. कोकण आणि मराठवाड्यातील पर्यटन याद्वारे एकत्र येत असून महाराष्ट्रातील पर्यटनाची ही नांदी ठरावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

रॉयल गोल्डफिल्ड क्लब रिसॉर्ट (ठऋछठ) हा एक खाजगी सदस्यांचा क्लब आहे जो क्रीडा, आदरातिथ्य, करमणूक आणि सामूदायिक सहभागाच्या माध्यमातून पर्यटन आणि उत्कृष्टतेचा कायम शोध घेत आलेला आहे. अत्याधुनिक सुविधा आणि परिपूर्ण जीवनशैली म्हणून डिझाईन केलेला हा क्लब सदस्यांना त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी योग्य वातावरण प्रदान करतो याद्वारे आपण आपले कुटुंब, नातेवाईक तसेच मित्र यांच्यासह जागतिक स्तरावर संलग्न नेटवर्कच्या सहवासात मानसिक शांती आणि समाधानाचा अनुभव घेतात.रॉयल गोल्ड क्लब रिसॉर्ट आणि स्मिता हॉलिडेज यांच्या या सहकार्यामुळे अतिथ्यसेवा आणि पर्यटन क्षेत्रात नव्या वाटा निर्माण होतील. या करारातून छत्रपती संभाजीनगरच्या औद्योगिक विकासासाठी फायदा होईल आणि उद्योगभिमुख नोकरी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना, रॉयल गोल्ड क्लब रिसॉर्ट आणि स्मिता हॉलिडेजचे अधिकारी उपस्थित होते. या कराराने दोन्ही संस्थांना एकमेकांच्या संसाधनांचा आणि तज्ञतेचा उपयोग करून अधिक प्रभावीपणे कार्य करण्याची संधी मिळाली आहे. स्मिता हॉलिडेज आणि रॉयल गोल्ड क्लब रिसॉर्ट यांचा हा सहकार्य करार उद्योगातील नवा टप्पा दर्शवणार आहे आणि दोन्ही संस्थांच्या भविष्यातील यशासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

# अग्रसेन विद्या मंदिरात दिवाळी स्नेहमिलन उत्साहात साजरे

ईटखेडा / प्रतिनिधी – अग्रसेन विद्या मंदिर शाळेत दिवाळी आनंद मेळ्याचे आयोजन अतिशय उत्साह आणि आनंदात करण्यात आले. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी व पालकांमार्फत आपआपल्या आवडीनुसार वस्तुंचे तसेच विविध स्वादिष्ट खादयपदार्थांचे अनेक स्टॉल लावण्यात आले. मेळ्यास भेट देणार्या विद्यार्थी व पालकांनी खाण्याबरोबरच गेमझोनमधील (खेळक्षेत्र) विविध खेळाद्वारे आनंद घेतला व दिवाळीनिमित्त आनंद द्विगुणीत करणार्या या उपक्रमात आपला सक्रीय व उत्साही सहभाग नोंदवला.

दि. २४ व २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता शाळा समितीचे अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला व शाळा समितीच्या सचिव निधीजी अग्रवाल यांच्या हस्ते छत्रपती अग्रसेन महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर ८ वाजेपर्यंत विद्यार्थी व पालकांनी आनंदाची लयलूट केली. शाळेचे संगीत शिक्षक नेहा नेरळकर व सुप्रिया खरात यांच्या गायनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. तसेच नृत्य शिक्षक विक्रम शर्मा व दिव्या गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थीनींनी सादर केलेल्या नृत्याद्वारे कार्यक्रमात रंगत आली. या प्रसंगाचे औचित्य साधून पालकांनीही आपल्या सुप्त कला गुणांना वाव दिला व कार्यक्रम अधिकच मनोवेधक बनला. कार्यक्रमास शाळा समितीचे विश्वस्त केशवजी लीला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळा समितीचे इतर सदस्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शिस्तबद्ध आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधीक्षक अजय सोनुने यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी सर्व विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या सजग व हजरजबाबी सूत्रसंचालनाद्वारे वैशाली खरात व दिव्या गुप्ता यांनी कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला.

# नॅक पिअर अध्यक्षांनी सोपवला कुलगुरुंकडे अहवाल

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मनॅक मूल्यांकनासाठी आलेल्या मपिअर टीमची व्हिजिट गुरुवारी पूर्ण झाली. समितीचे अध्यक्ष तथा मनॅकफ्चे माजी संचालक प्रा.ए.एन. राय यांनी कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्याकडे समितीच्या अहवालाची प्रत सुपूर्द केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मनॅक पिअर टिममने २२ ते २४ ऑक्टोबर दरम्यान भेट दिली. भेटीच्या अखरेच्या दिवशी गुरुवारी (दि. २४) महात्मा फुले सभागृहात मएक्झिट मिटिंगफ घेण्यात आली. यावेळी नॅक पिअर टिम चे अध्यक्ष प्रा.ए.एन. राय यांच्यासह सदस्य उपस्थित होते. प्रा.राय हे नॅक चे माजी संचालक असून मिझोरम विद्यापीठ व नॉर्थ इंस्टन हिल युनिर्व्हसिटी या दोन विद्यापीठात कुलगुरु म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. तसेच समिती सदस्य प्रा. विमला एम, प्रा. विशाल गोयल, प्रा. रोव्हरु नागराज, प्रा. ग्यानेंद्र कुमार रौत, प्रा. साबियासाची सारखेल व प्रा. के. एस. चंद्रशेखर यांचा सदस्य म्हणून समावेश होता. प्रकुलगुरु डॉ. वाल्मिक डॉ. प्रशांत अधिष्ठाता, संचालक सरवदे, कुलसचिव अमृतकर यांच्यासह आयक्युएसीचे डॉ.जी.डी. खेडकर यांच्यासह सदस्य, विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.

काटेकोरपणे मुल्यांकन : प्रा.राय

मनॅकफ मुल्याकंनासाठी विद्यापीठाने स्वयं मूल्यांकन अहवाल (एसएसआर) यापुर्वीच सादर केलेला आहे. संख्यात्मक अहवाल (क्वांटिटेटिव्ह रिपोर्ट) पुर्वीच दाखल झालेला आहे. तर समितीने तीन दिवसांच्या भेटीनंतर दिलेला हा अहवाल गुणात्मक (क्वालिटेटिव्ह रिपोर्ट) आहे. या संपूर्ण काळात तीनही दिवसाचे वेळापत्रक अत्यंत काटेकोरपणे पाळले. तसेच मा. कुलगुरु व सर्व सहकारी यांनी उत्तम सहकार्य केले, असे समितीचे अध्यक्ष प्रा.ए.एन.राय म्हणाले. मपिअर टिममने दिलेल्या हा अहवाल व अभिप्राय विद्यापीठ प्रशासन अत्यंत सकारात्मकतेने घेणार आहे, असे यावेळी मा. कुलगुरु डॉ. विजय फुलारी म्हणाले. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. जी.डी. खेडकर, सल्लागार डॉ.एम. डी जहागीरदार यांच्यासह डा गिरीश काळे, रोहन गावडे यांनी या नियोजनासाठी प्रयत्न केले.

# चितेगाव येथे बिडकीन पोलीसांनी दोन तरुणांना तलवार सह केले अटक

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि .२६ ऑक्टोबर सध्या सार्वत्रिक महाराष्ट्र राज्यामध्ये विधानसभा निवडणूक २०२४ ची सुरू असल्याने आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून, या आचारसंहिता मध्ये चितेगाव येथे दोन तरुणांकडून पोलीसांनी तलवार जप्त करून आरोपींना अटक केले आहे.



पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की दि २५ ऑक्टोबर शुक्रवार रोजी बिडकीन कर्तव्यदक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांना गुप्त माहिती मिळाली की चितेगाव व पांगरा येथील दोन तरुणाकडे बेकायदेशीर व विनापरवाना धारदार तलवार असल्याची माहिती मिळाल्या वरून ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ .विनयकुमार राठोड,अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार,पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांच्या आदेशावरून कर्तव्यदक्ष अधिकारी बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे,बीट जमादार दिलीप साळवे, आप्पासाहेब माळी, विष्णू गायकवाड, योगेश वाघमोडे,चालक सचिन म्हस्के, यांनी चितेगाव येथून आरोपी समाधान विजय नचन वय १८ रा. चितेगाव,रोहन बाळू गावांदे वय २२,रा पांगरा, दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता यांच्याकडे धारदार तलवार ताब्यात घेण्यात आल्या आहे, पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे यांच्या फिर्यादीवरून भारती हत्यार कायदा सह कलम १३५,४,२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी समाधान विजय नचन,रोहन बाळू गावांदे यांना अटक करण्यात आले असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घुगे बीट जमादार दिलीप साळवे आप्पासाहेब माळी तपास करीत आहे.

# श्री.क्षेत्र कचनेर वार्षिक यात्रा महोत्सवाच्या पंचरंगी पत्रिकेचे विमोचन संपन्न



छत्रपती.संभाजीनगर – लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर येथे दिनांक १४ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४रोजी वार्षिक यात्रा महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन या यात्रेसाठी देशभरातुन लाखो भक्त येत असतात. या यात्रा महोत्सवात विविध कार्यकमाची रुपरेषा असलेली पंचरंगी पत्रिकेचे विमोचन नुकतेच उत्तमचंद ठोले जैन छात्रावास येथे करण्यात आले.

यावेळी पत्रिका सौजन्य भरत सौ.सपना चि.सम्मेद कु. सुर्या पापडीवाल महाप्रसाद दाता , कचनेर क्षेत्राचेमॅनेजिंग ट्रस्टी सुरेशकुमार कासलीवाल, कार्यकारिणी अध्यक्ष ऋषभकुमार गंगवाल, महामंत्री विनोदकुमार लोहाडे, सहमंत्री मुकेशकुमार कासलीवाल विश्वस्थ प्रमोदकुमार कासलीवाल, एम. आर. बडजाते, ललितकुमार पाटणी, भरतकुमार ठोळे, प्रवीणकुमार लोहाडे, महेंद्रकुमार ठोळे, हेमंतकुमार बाकलीवाल, निलेशकुमार काला, मनोजकुमार साहुजी, संदीपकुमार ठोले, अनुपकुमार पाटणी, विपीनकुमार कासलीवाल, जितेंद्र पहाडे किरण मास्ट संतोष पापडीवाल, नितीन गंगवाल जयेशकुमार काला, सर्व विश्वस्थ, कार्यकारिणी सदस्य आदि मान्यवरांच्या हस्ते या पंचरंगी पत्रिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी सभेची सुरुवात नमोकार महामंत्राने करण्यात आली. यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन प्रवीणकुमार लोहाडे, तर प्रास्ताविक विनोदकुमार लोहाडे यांनी केले.

# नवभारत अभियान चार जागा लढवणार

छत्रपती संभाजीनगर : नवभारत अभियान सामाजिक संघटनेच्या वतीने भारतीय लोकशाही दृढ व्हावी याकरीता चार मतदार संघातून उमेदवार विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतील भारत देश घडविण्यासाठी व शेवटच्या मानसास केंद्रीभूत मानून व त्याचा सर्वांगीण विकास डोळ्यासमोर ठेवुन २०२४ विधानसभा निवडणुकीमध्ये नवभारत अभियानच्यावतीने चार मतदार संघात उमेदवार निवडणुक रिंगणात उतरविण्यात येणार आहेत. त्यात औरंगाबाद मध्य आणि फुलंब्री मधून ॲड. जगन साळवे, औरंगाबाद पश्चिममधून नंदकुमार हिवाळे, आणि भोकरदन जाफ्राबाद येथून पी. आर. भिसे हे निवडणूकीच्या मैदानात उतरणार आहेत.

# त्या अभियोक्त्यांना नियुक्ती देण्याचे आदेश

छत्रपती संभाजीनगर : शासनाच्या ५३१ सहायक शासकीय अभियोक्त्यांसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या अंतरिम आदेशात दुरुस्ती करून याचिकेच्या अधीन राहून उमेदवारांना नियुक्ती देण्याचे आदेश न्यायमूर्ती मंगेश पाटील व न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे यांनी दिले आहेत.

शासनाने ५३१ सहायक शासकीय अभियोक्त्यांच्या नियुक्ती आदेशाला प्रशासकीय न्यायाधीकरणाने (मॅट) पूर्वी एका आठवड्याकरिता स्थगिती दिली होती. या निर्णयाला काही उमेदवारांनी याचिकांद्वारे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले. त्यावर यापूर्वी न्या. रवींद्र घुगे व न्या. वाय. जी. खोब्रागडे यांनी प्रतिवादी महाराष्ट्र शासन, एमपीएससी व संबंधित उमेदवारांना नोटीस बजावण्याचे आदेश देत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने ७३१ सहायक शासकीय अभियोक्त्यांची नवीन शिफारस यादी तयार करण्याचे अंतरिम आदेश दिले होते. त्यानुसार आयोगाने सहायक शासकीय अभियोक्त्यांच्या नियुक्त्यांसाठीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने सर्व प्रक्रिया पूर्ण करून ता. १० ऑगस्ट २०२३ रोजी ५३१ वकिलांच्या नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस केली होती.

या शिफारशीविरुद्ध बाधित वकिलांनी मॅटमध्ये मूळ अर्जाद्वारे आव्हान दिले होते. न्यायाधीकरणाने सुरवातीला नियुक्त्यांना स्थगिती दिली होती. त्यानंतर २८ जून २०२४ ला मॅटच्या औरंगाबाद खंडपीठाने शिफारशींबाबत मूळ अर्ज अंशतः मंजूर करून वयाच्या अटीत शिथिलता प्राप्त केलेल्या आरक्षित उमेदवारांची राज्य लोकसेवा आयोगाने नवीन शिफारस यादी तयार करावी आणि शासनाने नियुक्ती आदेश

द्यावेत, असा आदेश दिला होता.

त्यानंतर मात्र एमपीएससीने शासनाला शिफारस करताना मागासवर्गीय उमेदवारांच्या नावाची शिफारस केली नाही, असा आक्षेप घेत पुन्हा खंडपीठात आव्हान देण्यात आले. याचिकेच्या सुनावणीदरम्यान पूर्वीच्या खंडपीठाच्या आदेशात दुरुस्ती करत नव्याने अंतरिम आदेश देण्यात आले.

त्यानुसार ५३१ उमेदवारांना याचिकेच्या अधीन राहून नियुक्त्या देण्यात याव्यात, नियुक्त्या देताना उच्च न्यायालयाच्या आदेशाचा स्पष्ट उल्लेख करावा, याचिकेचा निर्णय उमेदवारांना बंधनकारक राहील असे हमीपत्र घ्यावे, असे खंडपीठाने आदेशात म्हटले आहे. याचिकाकर्त्यांतर्फे ॲड. महेश देशमुख, अविनाश देशमुख, ॲड. सिद्धेश्वर एस. ठोंबरे, ॲड. प्रशांत कातनेश्वरकर, ॲड. योगेश पाटील, ॲड. उमेश गिते, ॲड. अनुज फुलपगर आदींनी बाजू मांडली

# शहरात तलवार घेऊन फिरणाऱ्या आरोपीच्या आवळल्या मुसक्या

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ ऑक्टोबर – शहरात विना परवाना बेकायदेशीरपणे सुमारे २ फूट लांबीची तलवार घेऊन शहरातील ऊर्स मैदानात फिरुन दहशत निर्माण करणाऱ्या आरोपी विरोधात कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या संदर्भात कन्नड शहर पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी की, २५ ऑक्टोंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास,कन्नड शहरातील उर्स मैदानात सय्यद रेहान अफरोज अली (वय २५ ) राहणार खासाब का बंगला, कन्नड हा स्वतःच्या हातात सुमारे दोन फूट लांबीची लोखंडी पाते आणि सोनेरी मुठ असलेली जुनी वापरात असलेली तलवार घेऊन, शहरातील उर्स मैदानात फिरला, एका ठिकाणी उभा असताना मिळून आला. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विजय चौधरी यांच्या फिर्यादीवरुन आरोपी विरोधात कन्नड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस नाईक मोईस बेग हे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



## हाजी अब्दुल रऊफ सेठ यांचे निधन

कन्नड –दि.२६ ऑक्टोबर – शहरातील प्रसिद्ध व्यापारी माजी नगरसेवक हाजी अब्दुल रऊफ सेठ अब्दुल रहेमान सेठ यांचे, आज शनिवार २६ ऑक्टोंबर रोजी दुपारी ३ वाजता दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर रात्री ९ वाजता अंतिम संस्कार करण्यात आले. शहरातील प्रसिध्द व्यापारी बबलू सेठ यांचे ते सासरे तर माजी नगरसेवक शेख इफ्तेखार उर्फ बाबा सेठ यांचे ते वडील होत. हिंदू – मुस्लीम समाजात मनमिळावू स्वभाव असलेल्या हाजी अब्दुल रऊफ सेठ यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# २० ते २३ डिसेंबरदरम्यान छ. संभाजीनगर येथे रोटरीतर्फे महाएक्सपोचे भव्य आयोजन

## विविध क्षेत्रातील २५० पेक्षा अधिक स्टॉल्स राहणार; व्यापार व उद्योग या विषयावर मान्यवरांची चर्चासत्रे; रक्तदाब, मधुमेह निदान, एनिमीया मोफत तपासणी शिबिर

छत्रपती संभाजीनगर – जागतिक पातळीवर सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक क्षेत्रात गेल्या ११९ वर्षापासून कार्य करणाऱ्या रोटरीकडून देशाचा आर्थिक विकास व उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, त्याचाच एक भाग म्हणून रोटरी प्रांत–३१३२ चे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्या संकल्पनेतून मराठवाड्याची औद्योगिक राजधानी छत्रपती संभाजीनगर येथील सेंट फ्रान्सिस स्कूलच्या मैदानावर २० ते २३ डिसेंबरदरम्यान रोटरीतर्फे चार दिवसीय भव्य महाएक्सपोचे आयोजन करण्यात आले असून, त्यात सर्व क्षेत्रातील २५० पेक्षा अधिक स्टॉल राहणार आहेत. उद्योग आणि व्यापार क्षेत्रावर आधारित विविध चर्चासत्रही होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेला प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, निमंत्रक सतिश लोणीकर, सुनील रायठठ्ठा, माजी प्रांतपाल डॉ. प्रफुल्ल मिरजगावकर, सुहास वैद्य, रुखमेश जखोटिया, रोटरी क्लब संभाजीनगरचे अध्यक्ष सुरज डुमणे, समन्वयक जे.सी. फ्रान्सिस, जिल्हा संचालक मंडळाचे पदाधिकारी, एक्स्पोच्या विविध आयोजन समित्यांवर काम करणारे माजी अध्यक्ष, रोटरी सदस्य उपस्थित होते.

या महा एक्सपोसंदर्भात अधिक माहिती देताना रोटरी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू आणि निमंत्रक सतीश लोणीकर यांनी सांगितले की, सामाजिक कार्यासाठीच रोटरीची स्थापना झालेली जागतिक पातळीवर अखंडितपणे गेल्या ११९ वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रात कार्य सुरू आहे. सामाजिक आणि आर्थिक विकास होण्याच्यादृष्टीने उद्योगाला चालना देण्याचा प्रयत्न म्हणून चार दिवसीय महाएक्सपोचे



आयोजन करण्यात आले असून, त्यात बियाणे, स्टील कंपन्या, औद्योगिक कंपन्या, संसाधन व उत्पादक कंपन्या, वाहन उत्पादक, इलेक्ट्रिकल वाहन उत्पादक, बिल्डर्स, कन्स्ट्रक्शन मटेरियल, आर्किटेक्चरल अँड इंटिरियर सर्विसेस, सोलार एनर्जी प्रोडक्ट्स, गृहउपयोगी उत्पादने, इलेक्ट्रॉनिक उत्पादने, होम अँड किचन अप्लायन्सेस, फर्निचर अँड हार्डवेअर, फूड प्रोसेसिंग, शेती अवजारे व उत्पादने, तसेच फायनान्शिअल अँड बँकिंग सर्विसेस आणि इंडस्ट्रियल सप्लायर्स इत्यादी क्षेत्रातील कंपन्या, वितरक, सेवा पुरवठादार, सहभाग नोंदवणार आहेत. स्वादिष्ट फूड पार्क व किड्स एरिया, मनोरंजन हे या महाएक्सपोचे विशेष आकर्षण राहणार आहे. महिला बचत गटामार्फत उत्पादित माल आणि उत्पादनांना या महाएक्सपोमध्ये स्टॉलसाठी विशेष प्राधान्य दिले जाणार असून, महिला सक्षमीकरणाची संकल्पना अधिक दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे. सामाजिक, आर्थिक विकास या रोटरीच्या उपक्रमाअंतर्गत या एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. व्यवसाय व मनोरंजनासोबतच रक्तदाब, मधुमेह निदान, एनिमीया या रोगांची मोफत तपासणी शिबिर हे विशेष वैद्यकीय उपक्रमसुद्धा रोटरी या उपक्रमात राबवणार आहे, अशी माहिती यावेळी डॉ. साबू व निमंत्रक श्री. लोणीकर यांनी दिली.

छत्रपती संभाजीनगर हे भविष्यातील महानगर म्हणून उदयास येत आहे. नुकत्याच झालेल्या मोठ्या औद्योगिक गुंतवणुकीमुळे जागतिक पातळीवर छत्रपती संभाजीनगरची ओळख निर्माण होत असल्याने या महानगरात जागतिक दर्जाच्या पायाभूत सोयी–सुविधा तसेच व्यवसाय व उद्योग स्नेही वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने लघु उद्योग, व्यापार वृद्धिंगत होण्यासह सेवा क्षेत्राचा विस्तार होण्यासाठी उद्योजक, व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी, वैज्ञानिक, अभियंता, नागरिक यांच्या सहभागाने परिपूर्ण असा भव्य दिव्य रोटरी महाएक्सपो भरविण्याचे नियोजन सुरू आहे. महाएक्सपोला वेगवेगळ्या औद्योगिक व व्यापारी संघटना जसे मकिया, औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघ, एमसिटीसी, आयसा, लघु उद्योग भारती यांचा प्रामुख्याने पाठिंबा लाभल्याचे प्रांतपाल डॉ. साबू म्हणाले.

शाळकरी मुलांना शाळेचे ओळखपत्र दाखविल्यास मोफत प्रवेश दिला जाणार आहे. या प्रदर्शनास उद्योजक, व्यापारी, शिक्षणप्रेमी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांनी भेट देऊन महाएक्सपो यशस्वी करावा आणि अधिक माहितीसाठी हेमंत लांडगे ९८९०४५०७८३ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री रामचंद्र प्राथमिक विद्या मंदिरच्या विद्यार्थ्यांनी केले मतदान जनजागृती



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२६ ऑक्टोबर – कन्नड शहरातील माळीवाडा परीसरातील श्री रामचंद्र प्राथमिक विद्या मंदिर यात शाळेतील विदयार्थ्यांनी, दीपावली आणि लोकशाहीचा उत्सव विधानसभा निवडणूक या दोन्हींचा आकर्षक मध्य साधत,आकाश कंदिलांची निर्मिती केली आहे. या कंदिलांवर मतदार राजा जागा हो– लोकशाहीचा धागा हो, सोडा सर्व काम– चला करूया मतदान,जागरूक मतदार – लोकशाहीचा आधार अशी मतदरांना मतदानासाठी प्रेरित करणारी घोषवाक्ये लिहून मतदार जनजागृतीचा अनोखा उपक्रम राबवून, मतदारांची जनजागृती केली आहे. शाळेतील सर्वच विद्यार्थी आपल्या घरावर मतदान जनजागृती घोषवाक्य लिहीलेला आकाश कंदील लावण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.हा उपक्रम संस्थेचे सचिव संदीप शिरसे व संचालिका कल्याणी गवळी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत आहे. या मतदान जनजागृती उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक किशोर घुगे, सहशिक्षक प्रशांत बडगुजर,संदीप सनंसे,गणेश देवरे, रंजना तावडे आदी परिश्रम घेत आहेत.